पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक १० वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ जानेवारी २०२३






# हे महापुरुषांनो दुर्बलांना घ्या समजून...

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।

अंक १० । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ जानेवारी २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट 8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाउंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010


**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**


वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** हे महापुरुषांनो दुर्बलांना घ्या समजून... – ३ / राज्यघटना, नोटबंदी आणि न्यायपालिका – **देविदास तुळजापूरकर** – ५ / महाराष्ट्र आणि वर्ष २०२३ – **अनंत बागाईतकर** – ८ / **उजवे उत्खनन :** कृपया उजव्या बाजूने जावे... – **जयदेव डोळे** – ११ / धर्म-संस्कृतीची मूलतत्त्वे आणि स्त्री)– **शशिकला राय** –१२ / शोध स्वातंत्र्याचा – **बी.जी. वाघ** –१६ / भय, अस्वस्थतेचे पर्व... – **भास्कर नाशिककर** – १९ / हिंदू राष्ट्र संकल्पना : एक संकट – **विमल शेंडे** – २२ / भ्रष्ट राज्यकर्ते- धनदांडगे- व्यावसायिकांना कोण आवरणार? – **प्रा. एच. एम. देसरडा** – २७ / पृथ्वी आणि माणूस – **सुधीर फाकटकर** – ३० / **नामांतर आठवण :** विद्यापीठ नामांतर आणि पँथर : **ॲड. मिलिंद सर्पे** – ३२ / राज्यपालांच्या गडबडी – **प्रतिनिधी** – ३३ / **ग्रंथ परिचय :** बौद्ध संस्कृतीचा परिचय घडवून देणारा ग्रंथ – **नागसेन बागडे** –३४ / **आज–कालचे प्रश्न :** ३६ – पांढऱ्या हत्तीसाठी समाजानं एवढं थोडं करायलाच हवं... । कवाडेंची पाखरं निघाली चाऱ्याच्या शोधात / **कविता :** आणि वाघ शेपूट हलवू लागले – **श्रीपाद भालचंद्र जोशी** । नोंदणी – **देविदास सौदागर** – ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय







# हे महापुरुषांनो दुर्बलांना घ्या समजून...

कदाचित महाराष्ट्र हा जगातील एक अपवादात्मक प्रदेश असेल, की जो वर्तमानातील समस्यांना न भिडता भूतकाळातील घटना उकरून आणि महापुरुषांना अधिक, अधिक महान ठरवण्याच्या शर्यतीत भाग घेतो आहे. कोणत्या महापुरुषाला कोणते विशेषण वापरावे हे 'महा'राष्ट्रातील 'लघु'राजकारणातील लघु बनू पाहणारा माणूस ठरवतो आहे. गेल्या पाच-सहा महिन्यांत महापुरुषांवरून ज्या काही झुंजी सुरू झाल्या आहेत, त्या महाराष्ट्राला, तेथील पुरोगामी परंपरांना आणि माफ करा..... महापुरुषांच्या कर्तृत्वालाही खुज्या ठरवणाऱ्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि सामाजिक न्यायाचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज आदींच्या भोवती नवे राजकारण सुरू आहे. कोणीही महापुरुषांच्या कर्तृत्वाविषयी, तत्त्वज्ञानाविषयी बोलत नाही. महापुरुषांचे विचार घेऊन महाराष्ट्राला जातिअंताकडे, विकासाकडे, आत्महत्यामुक्त प्रदेशाकडे, धर्मनिरपेक्षतेकडे घेऊन जाऊ असे सांगत नाही. कारण तेवढे बळ या राजकारणात नाही. खुज्या माणसांनी आपल्या लांब सावल्या टाकाव्यात त्याप्रमाणे प्रत्येकजण जणू काही संशोधक बनला आहे. स्वतःलाच महापुरुषांचा सच्चा वारसदार समजू लागला आहे आणि दुसऱ्याला महापुरुषांचा दुष्मन समजू लागला आहे. महापुरुषांचे विचार जागवण्याची, त्यांचा प्रसार करण्याची हिंमत कुणाकडेच राहिलेली नाही. महापुरुषांच्या विचारांचा नव्हे, तर प्रतीके मिरवण्याचा काळ या राजकारणाने सुरू केला आहे. कुणाचा पुतळा किती उंच बांधायचा, कुणाचे स्मारक कसे करायचे, कुणाचे फोटो कुठे मिरवायचे, अती महाजयंत्या करून कोट्यवधीचा चुराडा आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करायचा, आपल्या सोयीच्या राजकारणात महापुरुषांना कसे चिकटवायचे, आम्हीच मावळे आणि आम्हीच एकमेव भक्त हे ठासून कसे सांगायचे, यावर सारे राजकारण बेतले आहे.

गेल्या पाच-सहा महिन्यांपासून महाराष्ट्राचे राजकारण फंदफितुरीचे, फोडाफोडीचे, विश्वासघाताचे आणि अस्थिर बनले आहे. जनतेच्या जळत्या प्रश्नांशी कुणालाच काही देणेघेणे नाही. जनतेला कोणी जबाबदार नाही आणि तिला जुमानत नाही. पक्ष फोडू की नको, विरोधी विचारांशी आघाडी करू की नको, चाळीस आमदार घेऊन पळू की नको, वेळी-अवेळी शपथ घेऊ की नको, यापैकी कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत कोणी जनतेला गिणत नाही. 'किस झाड की पत्ती' म्हणून तिला दूर लोटायचे आणि या साऱ्यांवर पांघरुण घालण्यासाठी सतत इतिहास उकरायचा, सोयीचा इतिहास मिरवायचा, वास्तवाकडे पाठ फिरवायची असा प्रकार सुरू आहे. इतिहास सांगण्यासाठी हिंमत लागते. छत्रपती शिवाजी महाराज यांना शूद्र ठरवून कोणी राज्याभिषेक नाकारला होता? पंचगंगेच्या काठावर राजर्षी शाहू महाराज यांना शूद्र ठरवणारे कोण होते, शाळेला जाणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर शेण-दगड फेकणारे कोण होते, सातारच्या छत्रपतींवर वर्ण शोधण्याची वेळ कोणी आणली होती, बाबासाहेबांच्या राज्यघटनेला कोण चोची मारते आहे, पुरोगामी-क्रांतिकारी महापुरुषांना प्रातःपूजेत कोण घेऊन जात आहे? एवढेच नव्हे, तर असे असंख्य प्रश्न आहेत, की ज्यांचे उत्तर कोणी देऊ शकत नाही. या सर्व महापुरुषांना कोंडीत पकडण्याचे काम कोणता धर्म करत होता आणि छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यरक्षक की धर्मवीर, असा वाद कोण निर्माण करते आहे, हेही सर्वांनाच दिसते आहे, ठाऊक आहे आणि कळते आहे; पण समाजात अधोरेखित सांस्कृतिक कलह सुरू करायचा असेल, तर असेच विषय चर्चेसाठी

मुद्दामहून आणले जातात. एकदा का सामान्य माणसाला संस्कृतीत चिकटवले, की तो सारे काही विसरतो. त्याचे प्रश्न मौनात जातात. महागाई का, बेकारी का, महिलांवर वाढते अत्याचार का, दलितांवर अन्याय का, शेतकरी आत्महत्या का करतो आणि कुपोषित आदिवासी बालकांचे मृत्यू का वाढतात, हे सारे प्रश्नही लोक विसरून जातात. ते विसरतील अशीच परिस्थिती निर्माण केली जाते. हे केवळ एकाच पक्षात चालले आहे, असे समजण्याचे कारण नाही. सर्वच प्रश्नांचा अजेंडा सारखा झाल्यासारखे आहे. क्रियावादी आणि प्रतिक्रियावादी टोकाला गेले, की प्रतिकांची उगवण असते जिचे आपल्याकडे अंकुर दिसत आहेत.

अगोदर हनुमान, श्री राम, श्री ज्ञानेश्वर आदी काही देव आणि भक्तांवर वाद झाले. या वादाने आंदोलनाचे रुप धारण केले. काही ठिकाणी पातळी सुटली. मूळ विषय बाजूला राहिला आणि परस्परांची कुळीमुळी काढायला सुरुवात झाली. लोकांची श्रद्धास्थाने असलेल्या कोणत्याही गोष्टींवर अनावश्यक टिपणी सुरू झाली, की लोक हळवे आणि पुढे आक्रमक बनतात. कुणाच्या तरी हातातील बाहुले बनतात. ज्याला फुटपाथवरही जागा नसते तोही कुणाच्या तरी धर्मस्थळाच्या नावाने घोषणा देतो. कधी बांग विरुद्ध आरती, कधी हनुमान चालिसा या साऱ्यांचा अर्थ काय आहे? कुणालाच तो सांगता येत नाही आणि ज्यांना सांगता येतो त्यांच्या तोंडावर कायद्याने चिकटपट्ट्या चिकटवल्या जातात. कर्मवीर, धर्मवीर यांसारखे शब्द ओढून ओढून राजकारणात खेळवले जातात. यापूर्वी काही तुरुंगात गेलेले नेते आपल्या नावामागे आपल्या मोटारीवर 'कर्मवीर' ही उपाधी लावतात, काही जण गाड्यावर छत्रपती लिहितात, तडीपार होता होता वाचलेले काही आपल्या नावामागे धर्मवीर उपाधी घेऊन मिरवताहेत. महापुरुषांविषयी रोज चौकात गळा काढणाऱ्यांना या गोष्टी कधी दिसल्या नाहीत काय? इतिहासात अतिशय दुर्मीळ महापुरुषांसाठी वापरलेल्या उपाध्या कोणीही घेऊन कसे फिरते, याचा शोध निदान ईडीने तरी घ्यायला हवा होता; पण तसे घडलेले नाही.

महापुरुषांना नागड्या राजकारणात पत्त्यांसारखे वापरणे आणखी निर्लज्जपणाचे आहे. विवस्त्र फिरणाऱ्यांचे जग वाढते आहे आणि वस्त्र परिधान करणे जणू काही गुन्हा घडतो आहे. या सर्वांतून जो काही जन्माला येत असतो त्यालाच तर सांस्कृतिक युद्ध म्हणतात, मूलतत्त्ववादाने फणा काढणे म्हणतात. आम्हीच खरे हिंदुत्ववादी आहोत, असा दावा-प्रतिदावा करणे हाही त्यातलाच एक भाग. कोणत्या शाळेत जाऊन कोणते हिंदुत्व शिकला आणि हिंदुत्व शब्द तरी नीट लिहू शकता का, असा जर प्रश्न जनतेला आणि आरतीतल्या हिंदुत्ववाद्याला विचारला तर काय घडेल, याची कल्पनाच केलेली बरी.

समाज दुबळा होतो किंवा दुबळा केला जातो, राजकारणात नैतिकतेच्या चिंध्या होतात, प्रदेशातला एखादा घटनात्मक प्रमुखच महापुरुषांचे तिरके विश्लेषण करायला लागतो तेव्हा समजावे, की नैतिकतेवर अनैतिकतेचे पांघरुण वाढते आहे. गेल्या सहा महिन्यांत नेत्यांची भाषा बदलत बदलत ती तळ कसा गाठते आहे, परस्परांवर टीका करताना जहरिले शब्द कसे येत आहेत, थंडीत कुडकुडणाऱ्यांवर शाल पांघरण्याऐवजी वस्त्रांच्या आकारांवर चर्चा कशी होत आहे, विनयभंगाच्या व्यवस्थेवरही राजकारणाचे थेंब कसे उडत आहेत, नथुराम कसा मिरवला जातो आणि म. गांधी कसा पुन्हापुन्हा चिरडला जातो आणि विशेष म्हणजे, माध्यमांना पुतना मावशीसारखाही पान्हा फुटत नाही. या साऱ्या गोष्टी हातात हात घालून पिंगा खेळू लागल्या, की अराजकाची चाहुल लागते. महापुरुषांवरील श्रद्धेपोटी हा चाललेला राजकीय खेळ थांबवायला नेते कदाचित तयार असणारही नाहीत; पण सामान्य माणसांनी हळवे होऊन अशा गोष्टीत लक्ष घालता कामा नये. विचार भ्रष्ट करणे,



विचाराला वेगळे वळण देणे आणि कंत्राटी राजकारणाचा ते भाग बनवणे यामुळे सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक संबंधांनाही तडे जाण्याचा धोका असतो. तसे न करता क्रिया-प्रतिक्रियांवर ओठांवर-नाकावर माशा गोळा होतील असे बोलत राहणे म्हणजे समाजाला महापुरुषांकडे नव्हे, तर काळोखाकडे नेणे होय. याला आध्यात्माच्या भाषेत पाप म्हणतात. आपल्या राजकारणाने असे पाप करू नये, अशी सामान्य माणसांची धारणा असणार.

श्रद्धेची नशा करून सामान्य माणसाला त्यात कोंडून ठेवण्याने वाईटाशिवाय काहीच घडणार नाही. महापुरुषांच्या प्रतिमा आणि विचार यात खूप अंतर आहे. नावावर येणारा पसाभर गहू किंवा कोणती तरी थाळी खाऊन हे अंतर कापण्याची क्षमता तयार होत नाही, तर महापुरुष कधीच राजकारण्यांचे नव्हते, तर सामान्य माणसांचे होते, हे लक्षात ठेवणे म्हणजेच सांस्कृतिक लढाई जिंकणे होय. •••

# राज्यघटना, नोटबंदी आणि न्यायपालिका



देविदास तुळजापूरकर

**नोटबंदीच्या अंमलबजावणीला सहा वर्षे लोटली आहेत. हे पाऊल उचलताना जी उद्दिष्टे समोर ठेवण्यात आली होती, त्यातील एक काळा पैसा बाहेर पडला का? चलनातील खोट्या नोटा कमी झाल्या का? दहशतवाद्यांना विदेशातून पुरविण्यात येणाऱ्या पैशाची रसद कमी झाली का? तर या तीनही प्रश्नांचे उत्तर निसंदिग्ध नाही, असे आहे. ५०० आणि १,००० रुपयांच्या चलनी नोटा रद्द करताना जास्त किमतीची २,००० रुपयांची नोट काढून सरकारने काय साध्य केले? ५०० आणि १,००० रुपयांच्या चलनी नोटा रद्द करताना जो युक्तिवाद मांडला जात होता, त्याला हे परस्परविरोधी नाही काय?**

आठ नोव्हेंबर २०१६ भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रात्री आठ वाजता राष्ट्राला उद्देशून भाषण करताना 'मित्रों' म्हणत सरकारने घेतलेला निर्णय, चलनातील रुपये ५०० तसेच रुपये १००० च्या नोटा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला आणि हे करत असताना त्यामागची उद्दिष्टे स्पष्ट केली. अर्थव्यवस्थेतील काळा पैसा बाहेर काढणे, चलनातील खोट्या नोटा बाहेर काढणे, विदेशातून दहशतवाद्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत थांबविणे. या तीनही उद्दिष्टांबाबत देशावर प्रेम करणाऱ्या कुठल्याही नागरिकाचे दुमत असण्याचं काहीच कारण नाही.

या बाद चलनी नोटा बँकांच्या खात्यात भरण्यासाठी, त्या नोटा बदलून घेण्यासाठी मुदत होती ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत. यानंतर देशात चलन कल्लोळच माजला. दिनांक नऊ नोव्हेंबर रोजी बँका तसेच एटीएम बंद ठेवण्यात आली होती. दिवसभरात बँकेने नोटा बदलून देण्याची पद्धती प्रसिद्ध केली आणि मग १० नोव्हेंबर रोजी नोटा बदलून देण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. बँकांच्या शाखांसमोर लांबच लांब रांगा आणि त्यात 'पळा, पळा कोण पुढे पळतो' यासाठीची तीव्र स्पर्धा. यातून गोंधळाची नव्हे, तर अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. बँकेचे कर्मचारी या प्रचंड गर्दीतून मार्ग काढत आपापल्या जागेवर जाऊन बसू पाहत होते; पण चेहरा नसलेली गर्दी त्यांना अटकाव घालत होती. नोटा बदलून घेण्यासाठी अवलंबिलेल्या पद्धतीबाबत रिझर्व बँक, बँक व्यवस्थापन तसेच कर्मचारी सगळ्यांजवळच गोंधळलेली परिस्थिती होती. दरदिवशी रिझर्व बँक नवनवे फतवे काढत होती. दिवसागणिक रांगांची लांबी वाढतच होती. रांगेत हातावर पोट असणारे असहाय्य, हतबल, नागरिक उद्वेगाने तासन्तास उभे राहत होते. यात महिला, वृद्ध सगळेच होते. दिवसाच्या अखेरीस त्यांच्याजवळील ३,००० रुपये बदलून मिळतील याची त्यांना खात्री नव्हती तरीही ते रांगेत उभे होते. यातील काही लोकांना रांगेतच आपले प्राण गमवावे लागले होते. बँकेतील कर्मचारी घड्याळाच्या काट्याकडे न बघता




अगदी मध्यरात्रीपर्यंत काम करत होते. मुंबईसारख्या महानगरात तर कर्मचारी, यात महिलादेखील आल्या, या बँकेतच उत्तररात्री कधीतरी झोपून सकाळी उठल्यावर पुन्हा कामाला लागत होत्या, त्या काऊंटरवरच्या असहाय्य, हतबल चेहऱ्याकडे पाहून. त्यांचं जगणं त्या बदलण्यात येणाऱ्या नोटांवर अवलंबून होते. या नोटबंदीत ८६% रकमेच्या नोटा रद्द झाल्यामुळे निर्माण झालेली चलनी नोटांची चणचण यामुळे परिस्थिती दिवसागणिक आणखीच गंभीर होत

होती. एरवी मानवीय, सामाजिक दृष्टिकोन ठेऊन असहाय्य, हतबल जनतेच्या मदतीसाठी धाऊन येणाऱ्या संघटना ना गर्दीतल्या जनतेच्या ना बँक कर्मचाऱ्यांच्या मदतीसाठी धाऊन येत होत्या. या काळात प्रधानमंत्र्यांनी बेळगाव तसेच गोवा येथील जाहीर सभेत बोलताना आवंढा गिळत, डोळ्यात अश्रू आणत लोकांना आवाहन केले होते, की त्यांनी एका मोठ्या उद्दिष्टासाठी थोडी कळ सहन करावी व ते खोटे ठरले तर भर चौकात त्यांना फटके मारावेत! सत्ताधारी पक्ष, त्यांचे समर्थक, अंधभक्त तर सरकारच्या या निर्णयाची भलावणच करत होते. मोठ्या उद्दिष्टांकडे पाहताना देशप्रेमाचे भरते येत होते. यापुढे असहाय्य, हतबल नागरिकांच्या हालअपेष्टा दखलपात्र नव्हत्या.

**नोटबंदीची फलनिष्पत्ती**

ओघानेच याचा परिणाम शेती, छोटा उद्योग, छोटा व्यवसाय यांवरदेखील होऊ लागला होता. कारण सगळे व्यवहारच थंडावले होते. हळूहळू छोटे उद्योग, व्यवसाय, किरकोळ क्षेत्र, सेवा, उद्योग बंद पडू लागले होते. त्यावर अवलंबित लोक रोजगार गमावून बसले होते, ज्या असंघटित क्षेत्रात रोजगार आहे ९४% एवढा. यामुळे ग्राहकांच्या हातातील क्रयशक्ती घटली होती. मालाला उठाव कमी झाला होता. उत्पादन आणि सेवांची मागणी घटली होती. त्यामुळे रोजगार घटला. याचा एकत्रित परिणाम सकल घरेलू उत्पादन घटण्यात, विकासाचा दर मंदावण्यात, बेरोजगारी वाढण्यात झाला होता आणि याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्था एका दुष्टचक्रात सापडली होती. ही झाली नोटबंदीची फलनिष्पत्ती! आता पाहू या उदात्त हेतूंची, ज्यासाठी नोटबंदीचे हे धाडसी पाऊल सरकारतर्फे उचलण्यात आले होते. अर्थव्यवस्थेतील काळा पैसा जेवढा चलनात असण्याबाबत बोलले जात होते, त्यापेक्षा कितीतरी पट अधिक काळा पैसा जमिनीच्या व्यवहारात, सोन्यात अधिक आहे, असे सरकारी आकडेवारी सांगते. पण सरकारने या नोटबंदीतच प्रथम हात का घातला? इतर दोन्हीलाही प्राथमिकता दिली असती, तर त्यात अंतर्भूत जनता तुलनात्मकदृष्ट्या सधन आहे, त्यांचा तुलनात्मकदृष्ट्या संख्येने कमी जनसमूहावर परिणाम झाला असता; पण तरी सरकारने हे दु:साहस का केले? आज आता नोटबंदीच्या अंमलबजावणीला सहा वर्षे लोटली आहेत. हे पाऊल उचलताना जी उद्दिष्टे समोर ठेवण्यात आली होती, त्यातील एक, काळा पैसा बाहेर पडला का? चलनातील खोट्या नोटा कमी झाल्या का? दहशतवाद्यांना विदेशातून पुरविण्यात येणाऱ्या पैशाची रसद कमी झाली का? तर या तीनही प्रश्नांचे उत्तर निसंदिग्ध नाही, असे आहे. ५०० आणि १,००० रुपयांच्या चलनी नोटा रद्द करताना जास्त किमतीची २,००० रुपयांची नोट काढून सरकारने काय साध्य केले? ५०० आणि १,००० रुपयांच्या चलनी नोटा रद्द करताना जो युक्तिवाद मांडला जात होता, त्याला हे परस्परविरोधी नाही काय?

**नोटबंदी सरकारचा फसलेला प्रयोग**

या पार्श्वभूमीवर नोटबंदी हा सरकारचा एक फसलेला प्रयोगच सिद्ध झाला आहे; पण या सगळ्या प्रक्रियेत सामान्य जनतेला, देशाला मोजावी लागलेली किंमत त्याचे काय? संसदीय लोकशाहीत सरकार हे संसदेला म्हणजे पर्यायाने जनतेला जबाबदार असते; पण या निकषावर जनतेने सरकारच्या दु:साहसाकडे दुर्लक्ष केले. म्हणूनच २०१६ नंतर, एकानंतर एक राज्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणुका आणि २०१९ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत विद्यमान सरकारकडे बहुमत कायम राहिले आणि यामुळेच सरकारची




अशी धारणा झाली आहे, की नोटबंदीचा आपला निर्णय कायदेशीर बनतो. या पार्श्वभूमीवर सुप्रिम कोर्टाच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने नोटबंदीवर बहुमताचा निर्णय देत असताना नोटबंदीला वैध घोषित केले आहे. नोटबंदीच्या प्रश्नावर आपला निर्णय देताना नोटबंदी जाहीर करतानाची उद्दिष्टे आणि त्या तुलनेत त्याची पूर्तता, नोटबंदी म्हणून देशाला, व्यक्तींना मोजावी लागलेली किंमत हे विषय तथ्य आणि वास्तविकतेला धरून चर्चिले नाहीत. तर आर्थिक धोरणांच्या प्रश्नावर आपल्याजवळ कौशल्य नाही असे म्हणत न्यायपालिकेने काढता पाय घेतला आहे, तर परिणामांविषयी बोलताना काही व्यक्तींना त्रास सहन करावा लागला म्हणून हे धोरण चुकीचे होते असा निष्कर्ष काढता येणार नाही, असे मत मांडले. याचाच अर्थ, सरकारच्या या निर्णयातील गाभ्याच्या प्रश्नांशी न्यायपालिका भिडलीच नाही.

या पाच न्यायाधीशांच्या पीठापैकी एका न्यायाधीशाने आपला

स्वतंत्र निर्णय दिला आणि विसंवादाचा सूर काढला. यात मुख्य मुद्दा उपस्थित केला गेला तो रिझर्व बँकेच्या भूमिकेचा. रिझर्व बँकेने याप्रश्नी विचार करून भूमिका घेतली नाही. याचा अर्थ रिझर्व बँकेने आपल्या भूमिकेपासून पळ काढला. सरकारने, रिझर्व बँकेने स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा अशी सोय ठेवलेली नाही. सरकारनेदेखील हा निर्णय घेताना प्रशासनिक अधिकार वापरले; पण कायदेमंडळाला विश्वासात घेण्याची सरकारला गरज वाटली नाही. आपला विसंवादाचा सूर मांडताना हा निर्णय फिरवणे, त्यातून निर्माण होणारी अनागोंदी लक्षात घेता योग्य होणार नाही, असे म्हणत असतानाच त्यांनी यापुढे असे निर्णय घेताना जी प्रक्रिया अवलंबिली गेली पाहिजे यावर आपले मत मांडले. असहमती मत व्यक्त करणारा हा निर्णय अधिक जबाबदार, संवेदनशील वाटतो.

या पार्श्वभूमीवर नोटबंदी हा सरकारचा एक फसलेला प्रयोग सिद्ध झाला आहे. नोटबंदीच्या प्रश्नावरील या विवादातून काही अव्वल दर्जाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रशासन, न्यायपालिका आणि कायदेमंडळाच्या परस्पर संबंधांविषयी, त्यांच्या भूमिकांशी ते निगडित होते, तसे रिझर्व बँकेसारख्या स्वायत्त यंत्रणेच्या भूमिकेशी ते निगडित आहेत. यापेक्षादेखील गंभीर बाब जर कुठली असेल, तर न्यायपालिकेची आर्थिक धोरणाविषयीची भूमिका. न्यायपालिकेने आपणास या प्रश्नात गती नाही असे म्हणत या आणि अशा प्रश्नांशी भिडण्यास नकार देणे हे फक्त नोटबंदी याच प्रश्नावर झाले आहे असे नाही, तर जेव्हा-जेव्हा आर्थिक धोरणाशी निगडित प्रश्न उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या दरवाजात जातात, तेव्हा-तेव्हा न्यायपालिकेने आपल्या या भूमिकेत सातत्य ठेवले आहे. किंबहुना एकानंतर एक महत्त्वपूर्ण निर्णय देताना या आपल्या भूमिकेची री ओढली आहे.

**राज्यघटनेचे अवमूल्यन!**

भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना, मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत हक्क यांचे जतन करणे, त्यातील भाषा आणि त्यामागचा अर्थ शोधताना जर आर्थिक धोरणांच्या प्रश्नांकडे पाठ फिरवली गेली, तर न्यायपालिका आपल्या कर्तव्यापासून दूर पळून जात आहे, असा त्याचा अर्थ होत नाही काय? भारतीय राज्यघटना समतेविषयी बोलते, ती काही फक्त सामाजिक प्रश्नांना लागू आहे असे नाही, तर आर्थिक प्रश्नांनादेखील लागू आहे. भारतीय राज्यघटना मार्गदर्शक तत्त्वात समाजवादाचा पुरस्कार करते, त्याप्रती जाणारे आर्थिक धोरण कुठले असायला हवे? भारतीय राज्यघटना लोककल्याणकारी राज्याचा पुरस्कार करते, यासाठी कुठले आर्थिक धोरण असायला हवे? भारतीय राज्यघटना प्रत्येक नागरिकाला एक चांगलं आयुष्य बहाल करण्याचा वादा करते. ते चांगले आयुष्य देण्यासाठी कुठले आर्थिक धोरण असायला हवे? यावर भूमिका कोण घेईल?

भारतीय राज्यघटना ही लोकांनी, लोकांशी, लोकांसाठी केलेला करार आहे. ही राज्यघटना प्रशासन, कायदेमंडळ, न्यायपालिका यांना भूमिका देते, अधिकार देते ते समन्वयाने चालवावेत या अपेक्षेने आणि यातील जो कोणी आपल्या भूमिकेपासून ढळेल, त्याला जागेवर आणण्यासाठी इतर दोन यंत्रणांनी आपली भूमिका बजावत रस्त्यापासून भटकणाऱ्या या यंत्रणेला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करायला हवा! हेच भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत आहे; पण आज या यंत्रणातील समतोल, समन्वय, ढळताना दिसत आहे. या यंत्रणा आपली भूमिका आणि कर्तव्य, जबाबदारी टाळताना दिसत आहेत आणि असे झाले तर ते अराजकाला आमंत्रण ठरू शकते. नोटबंदीत प्रशासनाने अविवेकी निर्णय घेऊन अंमलबजावणीच्या प्रक्रियेत सामान्य जनतेवर आपला वरवंटा चालवला. कायदेमंडळाने या प्रश्नांवर निर्माण झालेल्या दुरवस्थेकडे डोळेझाक करत प्रशासनाची




पाठराखण केली.

या परिस्थितीत जनतेला आशा होती ती न्यायपालिकेकडून; पण सुप्रिम कोर्टाने दिलेल्या निर्णयानंतर सामान्यजनांची घोर निराशा झाली आहे. सरकार येतील आणि जातील. ते कुठल्या पक्षाचे आहे, असा प्रश्न नाही, तर मानवी जीवनाच्या उत्क्रांतीत धर्मगुरूंची जागा राजेशाहीने घेतली ती आता लोकशाहीने घेतली आहे. ही लोकशाही मानवता, शांतता, मैत्री या मूल्यांचा पुरस्कार करते. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व याचा पुरस्कार करते. त्या मूल्यांपासून का आपण ढळणार आहोत? इतिहासाची चाके पुन्हा उलट्या दिशेने आपण फिरवणार आहोत का? या व्यापक संदर्भासह नोटबंदीच्या निमित्ताने निर्माण झालेल्या प्रश्नांशी भिडताना आपण अधिक गांभीर्याने विचार करायला हवा अन्यथा आजची यंत्रणा मृत व्यक्तींना नुकसानभरपाई, त्यांचे स्मारक, त्यांच्यावर अवलंबित व्यक्तींना रोजगार अशी भाषा करत यातून उत्पन्न परिस्थितीवर पांघरूण टाकेल आणि दरवर्षी आपण या नोटबंदीचे वर्षश्राद्ध करत राहू. समाज म्हणून या प्रश्नाकडे पाठ फिरवणे, यापासून पळ काढणे हा नक्कीच त्यावरचा उपाय होऊ शकत नाही! ●●●

**(लेखक बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत.)**

# महाराष्ट्र आणि वर्ष 2023



अनंत बागाईतकर

**महाराष्ट्रातील वर्तमान राज्यकर्ते या केंद्राच्या हातातल्या कळसूत्री बाहुल्या आहेत आणि केंद्र सरकारच्या तालावर नाचणारे असल्याने महाराष्ट्रापुढे मोठे राजकीय संकट उभे राहिले आहे. जोपर्यंत केंद्रात महाराष्ट्रद्वेष्टी राजवट व राज्यकर्ते सत्तेत असतील, तोपर्यंत महाराष्ट्राचे भले होणार नाही.**

आपण नव्या वर्षात पदार्पण करीत आहोत. ते करताना आगामी वर्षभरातील आव्हानांचा आढावा घेणेही उचित ठरणार आहे. हे वर्ष राजकीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे राहणार आहे. कारण या वर्षात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांनीच २०२४ च्या पहिल्या सहामाहीत होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांसाठीची वातावरणनिर्मिती होणार आहे. वेळापत्रकाप्रमाणे महाराष्ट्रात २०२४ च्या दुसऱ्या सहामाहीत निवडणुका होणार असल्या तरी लोकसभेबरोबरच महाराष्ट्रातही विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. २०२३ मध्ये नऊ राज्यांच्या विधानसभा निवडणुका होणार आहेत. छत्तीसगढ, राजस्थान, मध्य प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या पाच मोठ्या राज्यांबरोबरच त्रिपुरा, मेघालय, नागालँड आणि मिझोरम या ईशान्येकडील चार राज्यांमध्ये निवडणुका होतील. जम्मू-काश्मीरमध्ये निवडणूक घेण्याचा सरकारने निर्णय केल्यास ती दहावी निवडणूक ठरू शकेल; परंतु नऊ राज्यांमध्ये लोकसभेच्या ११६ जागांचा समावेश होतो आणि त्यामुळेच या निवडणुका या २०२४ मधील लोकसभा निवडणुकीसाठीची रंगीत तालीम किंवा उपांत्य फेरी असतील. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे २०२३ मधील राजकारण अवलंबून राहील, हे निश्चित आहे.



### हिंदुत्वाच्या शक्तीवर भाजपचा दावा

महाराष्ट्रात सध्या भाजप आणि शिवसेनेतील फुटिरांचा एक गट यांचे संयुक्त सरकार सत्तेत आहे. मुख्यमंत्रीपद फुटीर गटाचे नेते एकनाथ शिंदे यांच्याकडे असले तरी खरे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. अर्थात, त्यांनी तूर्तास उपमुख्यमंत्रीपदाचा बुरखा पांघरला आहे. या दोघांमधील ही युती कितीकाळ टिकेल असा प्रश्न आहे. त्याचे उत्तर एकच आहे व ते म्हणजे जोपर्यंत भाजपला आवश्यकता किंवा गरज आहे तोपर्यंत! त्यामुळेच कदाचित लोकसभेबरोबर म्हणजे २०२४ च्या सुरुवातीला म्हणजे मार्च ते मे महिन्याच्या दरम्यान होणाऱ्या निवडणुकांबरोबर महाराष्ट्रही निवडणुकीला सामोरा जाऊ शकेल. याचे कारण स्पष्ट आहे, की भाजपला ही शिंदेशाही फार काळ अंगावर बाळगणे राजकीयदृष्ट्या शक्य होणारे नाही. शिवसेनेचे अस्तित्व संपविणे भाजपला शक्य नाही. कारण राजकीय पक्ष संपत नसतात; परंतु त्यांना पंगू करण्याचे भाजपचे प्रयत्न चालूच राहतील. महाराष्ट्रात भाजपरुपी हिंदुत्वाची एकच शक्ती किंवा फोर्स अस्तित्वात असला पाहिजे हे भाजपचे स्वप्न किंवा महत्त्वाकांक्षा आहे. त्यासाठी ते सतत प्रयत्नशील आहेत हे सध्याच्या अनेक घटनांवरुन सिध्द झालेच आहे. त्यामुळेच तूर्तास एकनाथ शिंदे हे भाजपच्या संगतीत कितीही खुशीत गाजरे खात असले, तरी लवकरच त्यांची गाजरे कडवटही होतील आणि त्याचे अपचनही होऊ लागेल. भाजपचे आतापर्यंतचे प्रादेशिक असो किंवा राष्ट्रीय राजकारण असो हे संधीसाधू राहिले आहे. ज्या राज्यात जो स्थानिक किंवा प्रादेशिक पक्ष प्रबळ असतो, त्याच्याबरोबर प्रारंभी हातमिळवणी करायची, दुय्यम भूमिका स्वीकारायची आणि हळूहळू स्वतःचा विस्तार करायचा आणि मग योग्य वेळी त्या स्थानिक पक्षाला धोबीपछाड देऊन स्वतःकडे नेतृत्व घ्यायचे अशी रणनीती भाजपने अनेक ठिकाणी अवलंबिली व यशस्वीपणे अमलात आणली. याला पिग्गिबॅकिंग पॉलिटिक्स किंवा दुसऱ्याच्या पाठीवर बसून राजकारण करायचे असे म्हटतात. 'भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी' अशी मराठीत म्हण आहे, तीच भाजपची रणनीती राहिली आहे. त्यामुळेच चाणाक्ष राजकीय नेते नवीन पटनाईक, ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रीय पातळीवर एकेकाळी भाजपशी हातमिळवणी केली; परंतु त्यांना राज्यात मात्र दूर ठेवले व ते यशस्वी झाले. बिहारमध्ये नितीशकुमार यांना दुसऱ्यांदा भाजपबरोबरची आघाडी तोडून बाहेर पडावे लागले ही बाब येथे ध्यानात घ्यावी लागेल. महाराष्ट्रात त्यांनी शिवसेनेवर हाच प्रयोग केला. पंजाबमध्ये त्यांनी अकाली दलाशीदेखील असा प्रकार केला आणि आता हे दोन्ही पक्ष भाजपपासून दूर झाले आहेत. उत्तर प्रदेशातही भाजपने बहुजन समाज पक्षाचा राजकीय शिडी म्हणून उपयोग-वापर करून घेतला होता हे येथे विसरता येणार नाही. महाराष्ट्रात

शिवसेनेने काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर हातमिळवणी करून भाजपला शह दिल्याने चवताळलेल्या भाजपने कोणताही विधिनिषेध न बाळगता शिवसेनेत फूट पाडून महाराष्ट्र विकास आघाडीचे सरकारही पाडले. त्यामुळे शिंदे यांचे भवितव्य किती अनिश्चित आहे हे वरील दाखल्यांवरून स्पष्ट व्हावे. भाजपने हे सूडाचे किंवा धडा शिकविण्याचे राजकारण केले याची कबुली दस्तुरखुद्द आणि 'खरे' मुख्यमंत्री देवेंद्रपंत फडणवीस यांनीच दिली आहे. देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री केवळ नावाला आहेत. त्यांचा खरा हुद्दा किंवा पद हे 'खरे' मुख्यमंत्री असाच असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात पुढच्या विधानसभा निवडणुकीपर्यंत उध्दव ठाकरे व त्यांच्या गटाचे अस्तित्व संपविण्यासाठी भाजपने कंबर कसलेली आहे. त्यामुळेच नागपूर अधिवेशनाच्या निमित्ताने कोणते ना कोणते कारण पुढे करून उद्धव व आदित्य ठाकरे यांना लक्ष्य (टार्गेट) करण्यात आले. सुशांतसिंग राजपूत या अभिनेत्याच्या आत्महत्या प्रकरणातील दिशा सालियन या तरुणीच्या आत्महत्येचे प्रकरण उकरून काढण्यात येऊन आदित्य ठाकरे यांच्या विरोधात पुन्हा एसआयटीची स्थापना करावी अशी मागणी नितेश राणे यांनी केली. गृहमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ती तत्काळ मान्यही केली. दुसरीकडे, महाराष्ट्राच्या राजकारणातील राजकीय दांपत्य खासदार नवनीत राणा आणि त्यांचे पती रवी राणा यांनी उमेश कोल्हे खून प्रकरणात उद्धव ठाकरे यांच्याविरुध्द एसआयटीची मागणी केली व ती गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी मान्य केली. खिरापत वाटावी त्याप्रमाणे एसआयटीच्या स्थापनेच्या घोषणा सुरू आहेत. अर्थात, ही भाजपची संस्कृती आहे. केंद्र सरकार असो किंवा उत्तर प्रदेशातले भाजप सरकार असो, त्यांच्या चुका काढणाऱ्या पत्रकारांविरुध्द थेट देशद्रोहाचे अपराध व गुन्हे दाखल करण्याच्या खुनशी संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारी ही विचारसरणी आहे. त्यानुसारच महाराष्ट्रातील कारभार सुरू आहे. विरोधी पक्षांना खोट्यानाट्या प्रकरणांमध्ये गुंतवून ठेवायचे, प्रचारकी टोळ्यांकरवी त्यांची रोजच्या रोज निंदानालस्ती करीत राहायची आणि त्यातून वातावरणनिर्मिती करून निवडणुकांना सामोरे जाऊन विरोधी पक्षांवर मात करण्याचा प्रयत्न करायचा, हे या डावपेचांचे साधारण स्वरूप आहे. दिशा सालियान या तरुणीच्या मृत्यूप्रकरणी तिच्या आईवडिलांनी थेट राष्ट्रपतींची भेट घेऊन तिच्या मृत्यूचे राजकारण न करण्याची विनंती केली होती आणि तपासातही आदित्य ठाकरेंच्या विरोधात काही निष्पन्न झालेले नव्हते; परंतु नारायणपुत्र नितेश राणे यांनी आदित्य ठाकरेंची नार्को चाचणी करण्याचीही मागणी करून टाकली आहे. हे सर्व एका पुरस्कृत किंवा प्रायोजित कार्यक्रमानुसार केले जात आहे. याचे प्रायोजक दिल्लीत बसले आहेत आणि त्यांच्या इशाऱ्यावर महाराष्ट्रातील नेते नाचत आहेत. त्यांना स्वत्वाचे, स्वाभिमानाचे भान उरलेले नाही.

पण, अचानक हे सर्व काही होण्याचे कारण काय? याचे स्पष्ट कारण म्हणजे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जेव्हा आधीच्या सरकारमध्ये नगरविकासमंत्री होते तेव्हा त्यांनी नागपूरमधील झोपडपट्टी विकासासाठी राखीव भूखंड परस्पर खासगी लोकांना दिले, अशी माहिती प्रकाशात आली आहे. भाजपच्याच मंडळींनी हा भूखंड घोटाळा उघडकीस आणल्याचा दावा केला जात आहे; परंतु उच्च न्यायालयाने या प्रकरणी ताशेरे झाडले आहेत. प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही शिंदे यांनी हे भूखंड खाजगी लोकांना कसे दिले, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यावर शिंदे यांनी संबंधित सचिवांनी ही बाब निदर्शनास आणून दिली नव्हती असा न पटणारा खुलासा केला आहे आणि एव्हाना तो व्यवहार रद्द केल्याचे जाहीर केले आहे. प्रकरण गंभीर आहे आणि त्यामुळेच अडचणीत आलेल्या या सरकारने प्रत्युत्तरादाखल जुनीपुराणी प्रकरणे उकरण्याचा धंदा सुरू केला आहे.

अडचणीत आल्यानंतर सत्तेचा (गैर)वापर करून विरोधकांची तोंडे बंद करण्याची राजकारणातली प्रथा नवी नाही, ती ऐतिहासिक आहे. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो यात्रे'ला प्रतिसाद मिळत असल्याचे पाहिल्यानंतर अचानक मोदी सरकारला करोनाची लाट पुन्हा येत असल्याचे जाणवू लागले. राहुल गांधी यांनी यात्रा थांबवावी असे पत्रही त्यांना केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी पाठविले. चीनमध्ये करोनाच्या नव्या विषाणूने हाहाकार उडवल्याच्या बातम्या प्रसिध्द होऊ लागल्यानंतर भारतातही करोनाचे प्रतिबंध कसे लावता येतील यासाठी सरकारने विचार सुरू केला; परंतु रॉयटर्स या प्रतिष्ठित वृत्तसंस्थेने या अपप्रचाराचा पर्दाफाश केला. नवा विषाणू ऑमिक्रॉनसारखाच सौम्य आहे आणि त्याचा फारसा त्रास लोकांना जाणवणारही नाही असे त्यांनी अमेरिकेसह सिंगापूर आणि अन्य नामवंत विषाणू संशोधन संस्थांचा हवाला देऊन बातमी दिली. त्यामुळे सरकार व राज्यकर्ते अडचणीत आल्यानंतर या चलाख्या करीत असतात, त्याच महाराष्ट्रातले वर्तमान सत्ताधारी करीत आहेत.

**केंद्रसरकार पुरस्कृत महाराष्ट्र विरोध**

केंद्र सरकार आणि तिथले राज्यकर्ते यांच्याकडून पुरस्कृत राजकारण महाराष्ट्राच्या मंचावर खेळले जात आहे. त्याचा एकमेव उद्देश महाराष्ट्राला खिळखिळे करणे हा आहे. म्हणूनच महाराष्ट्राचे लचके तोडण्याच्या हालचाली करण्यापर्यंत भाजप व भाजपपुरस्कृत शक्तींची मजल गेली आहे. कर्नाटकाने जत, सोलापूर यांसह अनेक गावांवर हक्क सांगितला आहे, तर चंद्रपूर जिल्ह्यातील गावांनी तेलंगणात जाण्याची इच्छा बोलून दाखविण्यास सुरुवात केली. उत्तर महाराष्ट्रात सुरगणा तालुका आणि काही खेड्यांनी गुजरातमध्ये जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. हे असे प्रकार अचानक कसे सुरू होतात, याचा अर्थ ध्यानात घेण्याची आवश्यकता आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना अचानक काहीतरी उपरती झाली आणि त्यांनी महाराष्ट्राच्या विरोधात तोंडाला येईल ते बोलायला सुरुवात केली. हे विनाकारण नाही. त्यांचा बोलवता धनी वेगळाच आहे आणि तो धनी कुठे बसून या कळी फिरवतोय हे न समजण्याइतकी मराठी जनता खुळी नाही. कर्नाटकात भाजपची अवस्था अत्यंत वाईट आहे. भ्रष्टाचार, अनागोंदी यांनी बजबजपुरी माजलेली आहे. बोम्मई यांना राज्यकारभार करणे तर दूरच; पण तो सांभाळणे अशक्यप्राय होऊन बसले आहे. प्रशासनावर त्यांची पकड राहिलेली नाही. त्यामुळे कर्नाटकात २०२३ च्या मे महिन्याच्या आसपास होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भाजपला यशाची फारशी आशा उरलेली नाही. प्रगती व विकास नावाची गोष्ट नावालाही नाही. केवळ हिंदू-मुस्लिम कार्ड खेळण्याचा पर्याय उरलेला आहे; परंतु तोही कितपत प्रभावी ठरेल याची शाश्वती राहिलेली नाही. त्यामुळेच कर्नाटकी अस्मितेचा मुद्दा पुढे आणण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि त्याचाच भाग म्हणून महाराष्ट्रातील गावांवर हक्क सांगून

वातावरणनिर्मिती केली जात आहे. भाजप व संघ परिवार हे त्यांच्या श्रीमुखाने देश एकत्र करणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांचा जप करीत असतात; परंतु पटेलांनी भारतातील राज्यांचे तुकडे केले नव्हते. त्यांनी सर्व राज्ये भारतीय गणराज्यात सामील करून घेतली होती. भाजप मात्र सरदार पटेल यांचे नाव घेत त्यांनी निर्माण केलेल्या भारतीय एकजुटतेवरच आघात करीत सुटला आहे.

या ठिकाणी आणखी एका मुद्याचा उल्लेख विशेषत्वाने करावा लागेल. कर्नाटकात व महाराष्ट्रात एकेकाळी काँग्रेस पक्षाचीच सरकारे असत. त्यावेळीही सीमाप्रश्न अस्तित्त्वात होता; परंतु तो वाद अशा रितीने विकोपाला नेला गेला नव्हता. या ठिकाणी हेही नमूद करावे लागेल, की कर्नाटकातील भाजप सरकारच्या काळात म्हणजे जगदीश शेट्टार हे अल्पकाळ मुख्यमंत्री असताना त्यांनी बेळगावात विधानसभा अधिवेशन घेण्यासाठी तेथे विधानभवन बांधण्याचा भूमिपूजन समारंभ केला होता. बेळगावात विधानसभेचे एक अधिवेशन घेण्याचा संकल्प भाजप सरकारने केला होता. त्यामुळे बसवराज बोम्मई हे भाजपची तोडफोडीची, फाटाफुटीची राजकीय संस्कृतीच पुढे चालवीत आहेत. ज्यांना नवनिर्मिती करता येत नाही ते आधीपासून प्रस्थापित असलेल्या प्रतीके व चिन्हांची मोडतोड करीत सुटतात हा भाजपचा वारसा आहे व तोच बोम्मई चालवीत आहेत. कदाचित कर्नाटकात या खोट्यानाट्या कर्नाटक अस्मितेच्या मुद्याच्या आधारावर भाजपला विजय मिळून पुन्हा सत्ता मिळालीच तर हा मुद्दा ते चालू ठेवतील काय हेच पहावे लागेल. त्यामुळे तूर्तास विधानसभा निवडणुकीसाठीचा हा कन्नड अस्मितेचा उन्माद फैलावण्याचाच प्रकार दिसतो.

**राज्यपालांचा हस्तक्षेप बिनबुडाचा!**

या सर्व प्रकरणांत भाजप राजवटीने नेमलेल्या राज्यपालांची भूमिकाही प्रश्नचिन्हांकित आहे. याचे कारण यापूर्वी कधीही अशा स्वरुपाच्या राजकीय विवादांमध्ये सक्रीय भूमिका घेतल्याचे उदाहरण आढळत नाही; परंतु महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत मध्यंतरी महाराष्ट्राचे कृष्णटोपीधारी आणि वादग्रस्त राज्यपाल भगतसिंग कोश्यारी आणि कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी बैठक केली होती. या ठिकाणी पूर्वीच्या राजवटींची आठवण आणि तुलना मनात आल्याखेरीज राहत नाही. पूर्वी कधी राज्यपालांनी अशा रितीने हस्तक्षेप केलेला नव्हता. केंद्र सरकारने फक्त सहकार्याचा हात पुढे करून दोन्ही राज्यांनी आपसात बसून सीमाप्रश्न सोडवावा, अशी भूमिका घेतलेली आहे. एवढेच नव्हे, तर न्यायालयांमध्येदेखील या भूमिकेचा पुनरुच्चार केलेला होता. यासंदर्भात संसदेतदेखील असंख्य प्रश्न विचारले गेले आहेत आणि त्या प्रश्नांच्या उत्तरातदेखील वेळोवेळच्या केंद्र सरकारांनी सीमाप्रश्न सोडविण्यासाठी आपले सहकार्य (गुड ऑफिसेस) देण्याच्या भूमिकेवरच भर दिलेला होता. आता काहीतरी वेगळेच घडत आहे. राज्यपाल जणू काही त्यांच्या हातात निर्णायक अधिकार दिल्यासारखे या प्रकरणात भूमिका निभावू लागले आहेत. महाराष्ट्र व कर्नाटकातील सीमाप्रश्न अनेक वर्षे चालू आहे व त्यास एक पार्श्वभूमीदेखील आहे. त्यासंदर्भात काही आयोगांची स्थापनादेखील करण्यात आली होती. त्यांनी आपापले अहवाल देखील दिलेले आहेत. आता तर हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे आणि दोन्ही राज्यांतर्फे युक्तीवाद सुरू आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे, प्रकरण न्यायप्रविष्ट असूनही कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी हा विनाकारण वाद उत्पन्न केला आहे.

हे प्रकरण येथेच थांबत नाही. याला आणखी गंभीर वळण मिळाले आहे आणि ही बाब दुर्दैवाने सजग समजल्या जाणाऱ्या माध्यमांच्याही बहुधा लक्षात आलेली नसावी. ज्याप्रमाणे महाराष्ट्र व कर्नाटकचे राज्यपाल सीमाप्रश्नाबाबत परस्परांना भेटले, त्याचप्रमाणे अगदी अलीकडेच महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाचे राज्यपाल (मंगूभाई पटेल) एकमेकांना भेटले आहेत. यासंदर्भात ज्या बातम्या प्रसिद्ध झाल्या, त्यानुसार या दोन्ही राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्र व मध्य प्रदेशाच्या सीमेलगतच्या गावांबाबत व विकासाबाबत चर्चा केली. वरवर ही माहिती निरुपद्रवी वाटण्यासारखी आहे; परंतु एका बाजूने कर्नाटक, नंतर तेलंगणा व त्यानंतर गुजरात यांनी महाराष्ट्राच्या त्यांना लागून असलेल्या सीमा भागातील गावांचे लचके तोडण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्याच मालिकेत मध्य प्रदेशानेही आत तशी तयारी सुरू केली आहे काय, अशी शंका आल्याखेरीज राहत नाही. विशेषतः अमरावती जिल्ह्याच्या परिसरातील गावांच्या विकासाबाबत या दोन्ही राज्यपालांनी चर्चा केल्याची माहिती मिळते. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आहेत आणि त्या व त्यांचे पती रवी राणा(आमदार) यांच्या सध्याच्या राजकीय हालचाली पाहता, या प्रकरणात शंका आल्याखेरीज रहात नाही. मुळात हा विषय राज्यपालांच्या अधिकारात कसा येतो हा प्रश्न आहे. राज्यपालांनी यामध्ये विशेष रस घेऊन पुढाकार घेणे हे खटकणारे आहे. दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांकडे त्याबाबत प्रमुख भूमिका असते; परंतु जेव्हा राज्यपाल पुढाकार घेऊ लागतात तेव्हा शंका येण्याचे एकमेव कारण म्हणजे ते केंद्राचे प्रतिनिधी म्हणून राज्यांमध्ये काम करीत असतात. म्हणजेच त्यांची सक्रियता ही केंद्र सरकारपुरस्कृत असल्याची बाब आपोआपच स्पष्ट होते. तसे काही असेल तर मग ही बाब अधिक गंभीर होते. भाजप व संघ परिवाराच्या विचारसरणीत लहान राज्ये व प्रबळ केंद्राची संकल्पना मांडलेली आहे. त्यामुळेच वाजपेयी सरकारने तीन राज्यांचे विभाजन केले; परंतु भाजपशासित उत्तर प्रदेशाचे विभाजन करण्यास अद्याप भाजप नेतृत्व धजावलेले नाही. म्हणजेच त्यांची विचारसरणी ही ढोंगावर आधारित आहे. महाराष्ट्रासारख्या राज्याचे लचके तोडणे, तुकडे करून महत्त्व कमी करणे हा या विचारसरणीचा भाग आहे. म्हणूनच संघ-जनसंघ-भाजपने नेहमीच वेगळ्या विदर्भाला पाठिंबा दिलेला आहे. महाराष्ट्रातील वर्तमान राज्यकर्ते या केंद्राच्या हातातल्या कळसूत्री बाहुल्या आहेत आणि केंद्र सरकारच्या तालावर नाचणारे असल्याने महाराष्ट्रापुढे मोठे राजकीय संकट उभे राहिले आहे. जोपर्यंत केंद्रात महाराष्ट्रद्वेष्टी राजवट व राज्यकर्ते सत्तेत असतील, तोपर्यंत महाराष्ट्राचे भले होणार नाही. प्रकल्पांची पळवापळवी (चोरी) ते राज्याचे लचके तोडून महाराष्ट्राला दुर्बल करणे, मुंबईचे महत्त्व कमी करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे या सर्व गोष्टी चालूच राहतील. त्याच्या बरोबरीने महाराष्ट्राच्या स्वाभिमान व अस्मितेच्या प्रतीकांवर सतत आघात करण्याचे प्रकारही नियोजनबद्ध रितीने सुरूच आहेत. हे महाराष्ट्र व मराठी माणसांच्या विरोधा तील एक व्यापक षड्यंत्र आहे. त्याचा मुकाबला कसा करायचा हे महाराष्ट्रापुढील सर्वात मोठे राजकीय आव्हान या वर्षात असेल. ●●●

**(लेखक जेष्ठ पत्रकार आहेत.)**



जयदेव डोळे

# कृपया उजव्या बाजूने जावे...

**कल्याणकारी योजना मोडून टाकणे, सरकारी संस्था दुबळ्या करणे, अनेक सेवा आणि निर्णयप्रक्रिया यांचे केंद्रिकरण करणे, खाजगी व्यक्ती व कंपन्या यांनाच उत्तम मानणे, भ्रष्टाचाराचे आरोप करून लोकप्रतिनिधी आणि लोकशाहीचा कारभार या विरुद्ध लोकांच्या मनात तिरस्कार निर्माण केला जात आहे.**

दर दोन-चार महिन्यांनी अंबानी किंवा अदानी यांची नावे आणि त्यांचा जगातल्या श्रीमंतांच्या यादीतला क्रमांक याच्या बातम्या का झळकतात, माहितेय तुम्हाला? महापुरुषांचा अवमान झाला म्हणत रान उठवण्याच्या बातम्या एवढ्या कशा आल्या, सांगता येईल तुम्हाला? 'बेशरम रंग' हे फिल्मी गाणे असो, उर्फी जावेद नामक एक प्रदर्शनप्रिय तरुणी आणि चित्रा वाघ असोत किंवा लव्ह जिहादच्या नावाखाली जमवलेला मुसलमानद्वेषाचा मोर्चा असो, का प्रसिद्धी दिली जातेय अशा विषयांना? जाणता तुम्ही?



उजव्या विचारांचे पक्ष सत्तेत आले, की अशा बातम्या जीवन-मरणाचे प्रश्न बनवले जातात. म्हणजे २०१४ पूर्वीच्या बातम्या माणसाला आवश्यक असणाऱ्या सेवा आणि उत्पादने यांनी भरून जात असत का? तर नाही. त्याही आधी दहा-बारा वर्षे निव्वळ थिल्लर, उथळ व प्रक्षोभक बातम्या टीव्ही देऊ लागला होता. तो देतो म्हणून वर्तमानपत्रेही देत चालली. कूपनलिकेत पडलेला मुलगा, समुद्राच्या तळाशी झालेले लग्न, उंच शिखरावर जाऊन गायलेले गाणे, कैलासावर यतीच्या वास्तवाचा घेतलेला शोध, बेडकांची आराधना किंवा कुत्र्यांचा वाढदिवस अशा कितीतरी विचित्र घटना बातम्या म्हणून जागा व्यापू लागल्या.

त्यांनी कोणाची जागा हडपली? संघटित व असंघटित श्रमिकांची दिवसेंदिवस बदत्तर होणारी परिस्थिती कोणी दाखवेना. शोषण आणि पिळवणूक यांचे नवनवे आविष्कार या माध्यमांना दिसतात. मोर्चे, सत्याग्रह, धरणे, घेराव यांचे महत्त्व जाणीवपूर्वक त्यांच्याकडे दुर्लक्ष करून घटवले गेले. बेकारी, महागाई, दारिद्र्य, कामाचे वाढवलेले तास, कामाच्या ठिकाणची असुरक्षितता व मिळणारा बोनस, गटारात बुडून व गुदमरून मरणारे कष्टकरी, कर्जबाजारी होऊन स्थलांतर करणारे ग्रामीण असे किती तरी विषय बातम्यांमधून गायब झाले. स्त्रियांवरचे गुन्हे फक्त भयंकर अपराध म्हणून पुढे आणले जाऊ लागले. जातीधर्म यांच्या कार्यक्रमांची जोरदार प्रसिद्धी होत चालली. शिक्षण महाग होत चालले आणि खाजगी शिकवण्यांच्या वर्गांची अमाप प्रसिद्धी जाहिरातींमधून केली जाऊ लागली. जे जे स्वस्त, सार्वजनिक व हक्काचे असेल त्याची बदनामी होईल, अशा घटना पुढे येत चालल्या. खाजगीकरणाचे सर्व उपाय उत्कृष्टतेचे रूप लेवून सादर होऊ लागले.

ही उदाहरणे एकंदर उजवा आर्थिक-सामाजिक विचार काय असतो, हे स्पष्ट करतात. १९८० च्या दशकात इंग्लंडमध्ये मार्गारेट थॅचर व अमेरिकेत रोनाल्ड रेगन यांनी सत्ता मिळवून जो नवा उजवा म्हणजे 'न्यू राईट' विचार रुजवला, तो काही वर्षांतच भारतात उगवला. तो जोजावला राजीव गांधी, नरसिंह राव यांनी आणि त्याचा राक्षस केला नरेंद्र मोदी व भाजप यांनी. सुरुवातीपासूनच भाजप (जुना जनसंघ) उजवा पक्ष राहिला. मात्र, समाजवादाचा प्रभाव असल्याने तो खूप वर्षे डाव्यांसारखी भाषा व वर्तन करीत होता. मोदी मात्र पक्के उजवे आणि अभिजनवादी ठरल्याचे आपण पाहत आहोत. कल्याणकारी योजना मोडून टाकणे, सरकारी संस्था दुबळ्या करणे, अनेक सेवा आणि निर्णयप्रक्रिया यांचे केंद्रिकरण करणे, खाजगी व्यक्ती व कंपन्या यांनाच उत्तम मानणे, भ्रष्टाचाराचे आरोप करून लोकप्रतिनिधी आणि लोकशाहीचा कारभार या विरुद्ध लोकांच्या मनात तिरस्कार निर्माण करणे, गरीब-श्रीमंत आणि सवर्ण-दलित असे भेद मिटवून ते धार्मिक अंगाने पुढे आणणे, राज्यघटनेतली तत्त्वे बाजूला टाकून रा.स्व. संघाचे राजकीय सांस्कृतिक कार्यक्रम प्रमाण मानणे असा ठोक उजवा कट्टर मोदींच्या नेतृत्वाखाली गेली आठ वर्षे देश पाहतो आहे.

उजवा विचार क्रांती, परिवर्तन, उलथापालथ यांच्या विरोधात असतो. आहे ती व्यवस्था टिकवण्याची त्याची खटपट सदैव चालते. स्वातंत्र्य, लोकशाही, हक्क, न्याय यांच्याबाबत तो एकनिष्ठ नसतो. संधी मिळेल तशी धरसोड तो वरील गोष्टींची करतो. हिटलर-मुसोलिनी यांपासून सद्दाम, खोमेनी, गद्दाफी, पुतीन, शी जिनपिंग यांना तो ताकद देत आला आहे. अगदी ताजी उदाहरणे घेऊ : निवडणुकांत पराभव होऊनही तो न जुमानणारे आणि त्यासाठी संसदेत आपल्या पाठीराख्यांना घुसवणारे मोदींचे दोन्ही मित्र भारताचे सन्माननीय पाहुणे म्हणून येऊन गेले. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेत तर जेर बोल्सोनारो हे ब्राझीलियन अध्यक्ष धटिंगणशाहीचे प्रतीकच; परंतु त्यांना मोदी यांनी मित्रवत वागवले. दोघेही कट्टर उजवे. उद्धट, उर्मट, बेदरकार, बेफिकीर आणि केवळ भावनिक प्रक्षोभ घडवणारे हे नेते असल्याचे अवघे जग जाणून होता; पण उजवे उजवे एकत्र येऊन आपले बळ लोकशाही देशात दाखवू लागले आणि अखेरीस धुळीस मिळाले. त्यांचा पराभव म्हणजे उजवा विचार माघारला असे नाही. तो असतो कसा, वागतो कसा अन् झिरपतो कसा याचा मागोवा घेत राहू. म्हणजे शत्रूपक्ष ओळखू आणि तो पराजित कसा होईल याचा उपाय शोधू. उजव्यांचे उत्खनन करीत त्यांचे उच्चाटन जमते का ते पाहू. भेटत राहू. ●●●


**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**

# धर्म - संस्कृतीची मूलतत्त्वे आणि स्त्री

**मनू फार नुकसान केलंस आमचं, अजूनही करत आहेस. जयपूरच्या स्थानिक न्यायलयात तुझी मूर्ति न्यायाच्या कोणत्या व्याख्येसाठी लावलीय कळत नाही! ‘मनुस्मृती’चं दहन केलं गेलं, पण मनू तर पितृसत्ताक सत्तेचं बीजतत्त्व आहे, चिरंजीवी ज्याला आग लागू शकत नाही, न वारा उडवून देऊ शकतो.**
**बलात्कार पुरुष करतो आणि चारित्रहीन बाई ठरते. तिहार जेलमधील बलात्कारी पुरुषांच्या मुलाखतीवरून कळून येतं, की त्यांना आपल्या कृत्याचा जराही पश्चाताप नाहीये. उलट प्रश्नरुपी आरोप होतो, की असले कपडे का घातले? निर्जन जागी कशाला गेली? हे निंदनीय आहे.**

**डॉ. शशिकला राय**

स्त्री बनण्याच्या सामाजिक प्रक्रियेत स्त्रीच्या जीवनापेक्षा रितिरिवाज, तथाकथित मूल्य, धर्म व संस्कृती महत्त्वाची झाली. पितृसत्तात्मकतेच्या क्रूरतेत भारत, पाकिस्तान, अथेन्सच्या भूमीत काही फरक राहिला नाही. हवा असो, श्रद्धा वा असातीरी सगळ्यांची व्यथा ती आणि तशीच. जेव्हा मी या प्रवासात सहभागी होण्यासाठी चालू लागले तेव्हा लेखणी अपली वाट विसरून गेली, जे काही पाहिलं-जाणवलं ते सगळं एकत्रित मांडण्याच्या प्रक्रियेत एक विश्रृंखल कोलाज बनलं. ज्यामध्ये जागोजागी काळे-निळे डाग उमटले, जिथं शरीर काळ्या-निळ्या डागांपासून वाचलं तिथं आत्म्यावर हे डाग दिसायला लागतात. इथं १ ‘सारा लोहा भी उन्हीं का है और धार भी उन्हीं की?’ सिमोन विचारते ‘स्त्री काय कशी असते?’ पण त्याही आधी प्रश्न‘स्त्री आहे का?’ जनसंख्येच्या अर्धा हिस्सा असताना ही स्त्री माता असते, बहीण असते, पत्नी, प्रेमिका, कन्या असते. पण ‘स्त्री’असते का?



(गावात जेव्हा एखादी बाई रेल्वेखाली येऊन चिरडून मरते तेव्हा पंचायत बसते. बायांना सहनशीलता नाही-घर म्हटलं, की छोट्या-मोठ्या गोष्टी होतच असतात. हे चांगलं, की ती मुलाला सोडून गेली. आमच्या गावचं वैशिष्ट्य हे, की दरवर्षी पाच-सात केसेस होतात. पण पोलिस चौकीचं नाव नाही. बायांना काय कमी, दुसरी आणू.)

हे धर्माच्या मूलगामी तत्त्वांच्या मजबूत धाग्यांनी विणलेलं समाजशास्त्र आहे. नैतिकता, संस्कृती, मूल्ये व रूढी या बेड्यात जखडलेली ती काय स्त्री आहे? तिच्यासाठी उर्ध्वगामी होण्याची कोणती व्यवस्था आहे का? चांगल्या मुलीची तुलना भारतीय समाजात गाईशी केली जाते. अगदी गरीब गाईसारखी आहे हो! आत्मभान (अस्तित्व) नसणं म्हणजे गाय असणं. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच स्त्री-देह हा सांप्रदायिक विमर्शाचे महत्त्वाचे सूत्र म्हणून वापरला जाऊ लागला. हिंदू महिलेकडे शक्तिशाली हिंदू संतती जन्माला घालू शकण्यास सक्षम समर्थ ‘गर्भाशया’च्या रुपात पाहिलं जाऊ लागलं. ती फक्त ‘गर्भाशयधारी’ होती, त्या व्यतिरिक्त तिची काही किंमत नव्हती. तिच्यासाठीची आदर्श मूल्ये ‘कल्याण’चे अंक निश्चित करू लागले. ‘रजोदर्शनानंतर बराच काळ स्त्रियांना काम व मातृत्वाच्या अवयवांचा उपयोग करू न दिल्यामुळे त्यांच्यात वैफल्य निर्माण होऊन ते काही आजारांनाही निमंत्रण देते.’ ही भूमिका मांडणाऱ्या अशा नैतिकतावाद्यांनी बालविधवा विवाहाला मात्र विरोध केला-का ती तरुण होत नाही? रजस्वला होत नाही? सगळं ढोंग व फसवणूक! आणि आश्चर्य म्हणजे हे ढोंग स्त्रीला भूषणावह असणारी मूलगामी तत्त्व निश्चित करते. लज्जा स्त्रीचं आभूषण आहे. पहिल्यांदा हे निश्चित झाल्यावर मग स्त्रीनं आपले रूप, गुण व बुद्धी यांविषयी लाज बाळगावी, ही अपेक्षा केली जाते. जर तसं नाही केलं तर तिला डाकिण ठरवलं जाईल. विनय, संयम, तप, समाधान, क्षमा, वीरता, धैर्य, गंभीरता, सहिष्णुता, स्वच्छता, कष्टाळूपणा, कुंटुब वत्सलता, भक्ती, साधेपणा, सतीत्व, पातिव्रत्य, कर्मबंधन हे

स्त्रीला 'स्त्री' बनवते. हेच धर्माचं सांगणं आहे. हे झुगारून देण्याचा प्रयत्न 'नारी जागृति' नाही, 'नारीमरण' म्हटलं जाऊ शकतं. स्त्रीची दूषणं कुठली–कलह, निंदा, हिंसा, ईर्ष्या, फूट, विलासिता, हौस–मौज, वायफळ खर्चिकपणा, गर्व, देखावा, वाचाळता, व्यभिचार, हास्य–विनोद आणि म्हणून ती नरकाचं द्वार आहे. त्यासाठी'मार–झोडी'च्या लायकीची आहे.

**'नारी सुभाऊ सत्य सब कहहिं, अवगुण आठ सदा उर रहहिं ।' – तुलसीदास**

(सर्वांचे म्हणणे बरोबर आहे की, नारीच्या मनात सतत आठ अवगुण असतात)

स्वभावतःच अपवित्र–अर्थात स्त्री जात्याच अपवित्र असते. कितीही चांगली असली तरी तिच्यात आठ अवगुण हे असणारच, असे तुलसीदास म्हणतात. ज्यांच्यासाठी सगळं जग 'सियाराममय' आहे. (सियाराममय सब जग जानी) तरी ही स्त्री अपवित्र असते. तर मी पण अशीच स्त्री आहे आठ अवगुणी! पण मी तुलसीदासांवर नाराज नाहीये, का माहीत आहे? कारण एकट्याचा आवाज प्रातिनिधिक नाही मानला जाऊ शकत. तुलसीदास एकटे नाहीयेत. त्यांच्या तोंडून सगळा पितृसत्ताक समाज बोलत आहे. कबीर ही असंच काहीसं म्हणून जातात –

**नारी की झाईं पडत अंधा होत भुजंग**
**कबीरा तिनकी कवन गति जो नित नारी संग–**

(स्त्रीची सावली पडल्यावर भुजंग आंधळा होतो, मग त्यांची काय गत जे नित्य स्त्रीसोबत असतात. असे कबीर म्हणतो.)

तर आता कबीर बाबू ईश्वर–भेटीसाठी तुम्हाला तीच स्त्री बनण्याची आस का लागली होती?

**तन रत कीन्हीं मन रत कीन्हीं**
**पंचतत बाराती रामदेव मोरे पाहुन**
**आये मैं यौवन मद्माती–**

सीतेनं लक्ष्मणरेषा ओलांडली, लक्ष्मणरेषा म्हणजे मर्यादा. ही मर्यादा कोण ठरवणार? पुरुष? स्त्रियांनी ती मर्यादा ओलांडता कामा नये, त्यांनी स्वतः काही निर्णय घेऊ नयेत. पतिव्रतेला सृष्टितील सर्वात शक्तीशाली स्त्री म्हणून गौरवलं गेलं. पतिव्रता शांडिलीसारखी असते. कुष्ठरोगी पतीचं वेश्येवर मन बसलं, तर ती त्याचं वेश्येशी मिलन घडवून आणते आणि आपलं शास्त्र ह्याला धार्मिक कार्य समजतं.

**तुलसीदांनी लिहिलंय –**
**बुद्धी रोग सब जडमति हीना**
**अंध बधिर क्रोधी अति दीना**
**ऐस हूँ पति कर अपमाना**
**नारि पावे दुरव यमपुर नाना.**

(पती किती दुर्गुणी असला तरी त्याचा अपमान करणारी स्त्री यमयातना भोगेल.)

वाईटातल्या वाईट–दुर्गुणी पतीचा अपमान पतिव्रतेनं करता कामा नये. डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'नवरा दारू पिऊन आला तर त्याला जेवायला देऊ नका.' आणि सिनेमा दाखवतो, की अशा पतीचे स्वागत करून त्याचे जोडे उतरून त्याला पांघरून घाला. त्याच्या शिव्या खा आणि भारतीय स्त्री परंपरेच्या 'आदर्श फ्रेम'मध्ये शोभायमान व्हा.

असमानतेवर बेतलेल्या या नैतीक (?) रचनेच्या आधारावर होणार स्त्रियांची अग्निपरीक्षा! या संदर्भात राम व बेबी कांबळे यांच्या आत्मकथेत वर्णिलेला 'पति' यामध्ये काहीच फरक नाही. 'मनुस्मृती' ग्रंथ म्हणतो–पत्नी आपल्या इच्छेने सोडून गेल्यानंतर परत आली तर तिला पत्नी मानू नये. तिला मृत घोषित करून तिचं श्राद्ध केलं जावं; परंतु पती कुमार्गी असला तरीही त्याचा त्याग करू नये. त्याला समजवावे–मंदोदरीसारखं! सगळी मूल्यं स्त्रीच्या ठायी असवी. कारण ती संस्कृतीची रक्षक असते. स्त्रीवर समाधान, क्षमा, संयम, त्याग, समर्पण हे नैतीक दबावाखाली लादलं जातं, जेणेकरून पुरुषसत्तेची अराजकता, मनमानी जशीच्या तशी कायम राहील. आत्मसंयम म्हणजे सामाजिक दास्यातून रचलेल्या व्यवस्थेपुढे संपूर्ण समर्पण! एंगेल्स म्हणतात, कुटुंब संस्थेच्या स्थापनेचा अर्थ, स्त्रीलिंगासाठी सतीत्वाची कल्पना ज्याने स्त्रियांना वैयक्तिक संपत्तीच्या स्वरुपात बदलून टाकले. ताराबाई शिंदेनी लिहिले, की त्या काळातील ऋषींबाबत काय बोलावं–कोणी हरिणाच्या, कोणी गाईच्या, कोणी पक्षिणीच्या पोटातून जन्माला येतो, असं म्हणणाऱ्यांचं पुढे 'वेदवाक्य' ठरलं? आणि ते भोगायला लागलं स्त्रियांना! सभांमध्ये लांबच लांब भाषणं ठोकून मिशांवर पीळ देत परतणं हे यांचं शौर्य! शास्त्रकारांची वक्रदृष्टी स्त्रियांवरच का? सतीत्वाच्या कल्पनेप्रमाणेच चारित्र्याच्या कल्पनेनेही स्त्रियांचं जीवन दुःखाच्या खाईत लोटलं, बदफैली तर पत्नीच असतात. पती म्हणजे परमेश्वर! स्त्रिया–पुरुषांना आपल्या मोहजालात ओढतात. मनू तर असंही म्हणतो– स्त्रिया पुरुषांचं रंग, रुप, वय या कशाचाही विचार न करता जो पुरुष लाभेल त्याच्याशी भोगरत होतात. सृष्टीनिर्मात्यानं काम, क्रोध, बेईमानी, चरित्रहीनता सगळे दुर्गुण स्त्रीत ठासून भरून ठेवलेत. मनू फार नुकसान केलंस आमचं, अजूनही करत आहेस. जयपूरच्या स्थानिक न्यायलयात तुझी मूर्ति न्यायाच्या कोणत्या व्याख्येसाठी लावलीय कळत नाही! 'मनुस्मृती'चं दहन केलं गेलं, पण मनू तर पितृसत्ताक सत्तेचं बीजतत्त्व आहे, चिरंजीवी ज्याला आग लागू शकत नाही, न वारा उडवून देऊ शकतो.

बलात्कार पुरुष करतो आणि चारित्रहीन बाई ठरते. तिहार जेलमधील बलात्कारी पुरुषांच्या मुलाखतीवरून कळून येतं, की त्यांना आपल्या कृत्याचा जराही पश्चाताप नाहीये. उलट प्रश्नरुपी आरोप होतो, की असले कपडे का घातले? निर्जन जागी कशाला गेली? आताच फेसबुकवर एका मित्राची पोस्ट वाचली, ते माझी स्तुती याकरता करत होते, की मी कट्टर हिंदुत्वाचा विरोध केला. पण तेच आपल्या पोस्टमध्ये लिहितात–'रहेगी तुम नकाब में, तो मर्द रहेगा औकात में।' वा रे पुरुषांना मर्यादेत ठेवण्यासाठी बाईच्या कपड्यांवर नियंत्रण! चार वर्षाच्या मुलीवरही बलात्कार होतो, इतकंच काय–जयपूरच्या जवळ कबर खोदून बाईला बाहेर काढून बलात्कार केला गेला. नागराज मंजुळे म्हणतात, की लहानपणी आम्हीही नेहमी पहात आलोय– खिडकीतून दिसणारं हॉस्पिटलच्या शवागारातील दृश्य!

गीतेत म्हटलंय, की शरीर मिथ्या व नश्वर आहे, आत्मा अमर आहे. मग आता सांगा, बलात्कार शरीरावर झाला म्हणायचा, की

आत्म्यावर? मूसूवी यहूदी शरीअत यशबिन लिहितात– 'बाईमुळेच गुन्हा सुरू होतो आणि आम्ही मरतो. अंथेन्स आधुनिक लोकशाही आणि कलांचं उद्‌भव स्थान आहे. एकेकाळी तिथे पत्नी आजारी असेल किंवा बाळंतपणानंतर सुधारत असेल, त्या काळात पतीला त्याची प्रेमिका किंवा वेश्या शय्यासोबत करत असे व त्या दरम्यान पत्नीला एखाद्या खोलीत कोंडून ठेवले जात असे. कायद्याने कठोर मनाई केली जायची व विशेष मॅजिस्ट्रेट तिच्यावर नजर ठेवायचे. तामिळनाडूमध्ये कट्टरपंथी ब्राह्मण दलित स्त्रीशी संग केल्यावर आपलं जानवं तोडून टाकून पवित्र स्नान करून नवीन जानवं घालून पुन्हा ब्राम्हण होत असे. दलित स्त्रियांवर बलात्कार म्हणजे यौनहिंसेंच्या माध्यमातून केलेलं प्रभुत्वाचं प्रदर्शन असतं. असं असूनही न्यायाधीश म्हणतात, 'ब्राह्मण दलित महिलेवर बलात्कार करत नाही.' ब्राह्मणा (पंडित)चा धर्मभांड्यांच्या बाबतीत भेद करतो, शय्येच्या बाबतीत नाही. मनूनं म्हटलंय –मृत बालकाला जन्म देणाऱ्या महिलेला दहाव्या वर्षी व आई बनू न शकणारीला अकराव्या वर्षात सोडून द्यावं; परंतु तिला स्वतंत्र न ठेवता घरात दासीसारखं ठेवावं. तिनं पळून जाण्याचा प्रयत्न केला तर दोरीनं बांधून ठेवावं. हे सगळं भूतकाळात जमा झालंय असं समजू नये. सिनेमा व टी.व्ही. बराच काळपर्यंत हीच प्रतिमा जपत आणि पुष्ट करीत आला आहे, की घराबाहेर काम करणाऱ्या बायका–मुली पुरुषांना आपल्या मोहजालात ओढतात. मार्क्सनं म्हटलंय, स्त्रीचे स्वाभाविक गुण व लादलेली नैतिकता तिला दासी बनवण्यास कारणीभूत ठरते. मार्क्स आयुष्यभर पितृसत्तेच्या श्रेष्ठत्वातून उद्‌भवणाऱ्या दास्यत्व व शोषणाचा विरोध करत राहिला. मार्क्सवादी तत्त्वज्ञानानेच 'अगस्त बैबल'कडून 'स्त्री आणि समाजवाद' पुस्तक लिहून घेतले. फ्रान्सच्या क्रांतीनंतर महिला संघटना निर्दयपणे दाबून टाकण्यात आल्या. राजकारणात भाग घेणाऱ्या महिलांना देशातून बाहेर काढण्यास भाग पाडलं. (जलावतनी) सन १९७० मध्ये जेव्हा फ्रान्सच्या समाजवादी व मार्क्सवादी महिलांच्या एका गटाने युनिव्हर्सिटीच्या विरोधात आंदोलन केलं, तेव्हा त्याबाबत अत्यंत तीक्ष्ण व कटू प्रतिक्रिया रॅडिकल पुरुषांची होती, जे स्वतः फ्रेंच सरकारच्या विरोधात लढत होते.

सन १९८५ मध्ये रख्माबाई केसच्या विरोधात लढणाऱ्यांमध्ये बाळ गंगाधर टिळकांसारखेही होते. हिंदू कोड बिलाचा विरोध करणाऱ्यांमध्ये त्या काळातील प्रखर नेतेही होते. रख्माबाईच्या बाजूने दिलेल्या निकालात मुख्य न्यायाधीशांसमवेत दोन जणांच्या बेंचने बदल केला. रख्माबाईंनी आपल्या मैत्रिणीला लिहिलेल्या पत्रात म्हटलंय–'आम्ही कोर्टाच्या निकालाने इतकं आश्चर्यचकित नाही झालो. आमच्यासाठी आश्चर्याची गोष्ट ही आहे, की प्रबळ हिंदू कायदे, बलाढ्य सरकार जवळपास तेरा कोटी पुरुष आणि तेहतीस कोटी देव–देवता या सर्वांनी रख्माबाईंना नेस्तनाबूत करण्यासाठी कट रचला व रख्माबाईसारख्या असहाय्य, सामान्य महिलेनं विरोध केला. रख्माबाईंच्या या विरोधी आवाजाने बायकांचं जग बदलून टाकलं. 'सीमंतनी उपदेश' लिहिणारी अज्ञात स्त्री लिहिते– 'अर्धांगिनी– यातलं अर्ध अंग दुःखात पिचत राहील आणि अर्ध मौज–मजा करेल.' स्त्रियांसाठी पतिव्रता धर्म व पुरुषांसाठी कोकशास्त्र. हिंदू देवदेवतांशी लग्न लावलं जातं स्त्रियांचं. यालाच कुराण शरीफमध्ये 'हके बख्शाई' म्हटलं जातं. मला जाणून घ्यावं वाटतं, की ज्या मंदिर व मस्जिदींचे दरवाजे स्त्रियांसाठी बंद असतात, त्या देवता व धर्मग्रंथांशी स्त्रियांची लग्नगाठ घालताना या लोकांना लाज–शरम वाटत नाही!

रूशन्दरी देवी यांचं 'आमार जीवन' सन १८७६ मध्ये येतं, ताराबाई शिंदे यांचं 'स्त्री–पुरुष तुलना' सन १८८२ मध्ये व रमाबाईंचं 'द हाई कास्ट हिंदू विमेन' सन १८८६ मध्ये प्रकाशित होतं. त्या काळापासून स्त्रिया त्यांच्या प्रश्नांबाबत, समस्यांबाबत जागृत होत्या व त्यावर विचार करत होत्या. 'अशी कोणती बाब आहे, जी विधवेला अपवित्र व सतीला शुभ बनवते?' मीरा नंदा यांच्या या प्रश्नाच्या संदर्भात स्त्रियांची स्थिती समजून घेता येईल. हिंदू धर्मात नवऱ्याच्या मृत्यूला पत्नीला जबाबदार मानलं जातं. याला पत्नीच्या कर्माचा भोग मानतात. सती होऊन ती आपल्या दुष्कर्मांचे प्रायश्चित घेणे अशी समजूत असे. गांधीजी म्हणतात, 'अनिष्ट आणि दूषणावह प्रथांच्या बळावर मूर्खतेला मूर्ख व अयोग्यतेला अयोग्य पुरुषही स्त्रियांवर प्रभुत्व गाजवत आले आहेत.' पंडित नेहरुंनी लिहिलंय– 'पुरुषांनी निर्माण केलेले रितीरिवाज व कायद्यातील जुलमांतून स्त्रीने स्वतःची सोडवणूक करून घ्यायला हवी.' अंध संस्कारांचे कारखाने बनलेल्या बाहुल्यांशी खेळण्याचे भयानक दृश्य ज्यांनी पहिलं, जाणलं तोच त्याच्याविरोधात उभा राहू शकतो. द्रौपदी, मीरा, ललद्द, अक्क–महादेवी, शकुंतला, सावित्रीबाई, रख्माबाई, रमाबाई, गांधी, नेहरु, ई.व्ही. आर. पेरियार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स, स्टुअर्ट मिल, सिमोन, जाहिदा, हीना, तहमीना दुर्रानी, तस्लिमा हे सारे एक चांगलं जग निर्माण करण्यासाठी लढा देणारे योद्धे होते. दुसरीकडे, किशोरीदास वाजपेयींसारखे भाषाशास्त्री असं म्हणतात, 'उच्च शिक्षण स्त्रियांसाठी हानिकारक आहे. मुलींना विज्ञान नाही. गृहविज्ञान शिकवलं पाहिजे. आजचं शिक्षण स्त्रियांमधील स्वाभाविक मातृत्व, सतीत्व, सुगृहिणी, शिष्टाचार स्त्रियोचित हार्दिक सौंदर्य– माधुर्य हे गुण नष्ट करीत आहे. सौंदर्य आणि माधुर्य ही सनातनी स्त्रीची सर्वापरी गुणवत्ता मानली गेली आहे. मुलांबरोबर शिकल्यावर मुली आपलं चारित्र्य–शील पवित्र राखू शकणार नाहीत.' प्रश्न हा आहे, की चारित्र्य हा शब्द पुरुषांबरोबर का जोडला जात नाही? ते बलात्कार करूनही पवित्र आणि केवळ संशयावरून स्त्रीची हत्या किंवा ती आत्महत्या करते. जाहिदानं सांगितलंय, 'एका पतीनं पत्नीचा यासाठी खून केला, की तिनं त्याच्याशी स्वप्नात बेईमानी केली.' एखादी स्त्री तुमच्या ताब्यात, हुकुमात राहत नसेल तर तिचं चारित्र्यहनन करा, पतीत बायांबाबत काय बोलायचं. पतीत कोण? हे ठरवणारे लोक याबाबत मौन राखतात.

या देशाचा गौरव म्हणजे सीता आणि पद्मिनी. त्यांनी तुमची मान गर्वाने उंचावली व जगण्याची इच्छा करणाऱ्यांनी तुम्हाला शरमेने मान खाली घालायला लावली. एक साधा–सरळ प्रश्न विचारू– सीतेला ज्या अग्नीनं जाळलं नाही, त्यानं पद्मिनीला जाळून कसं टाकलं? आणि मग दोन्ही खरं कसं? बलात्कार पीडितेचं नाव लपवलं जातं, ती समाजात तोंड दाखवायला लायक रहात नाही. सिनेमातही नायिका म्हणते– मी तुझ्यालायक नाही राहिले! कुणाला तोंड दाखवण्यालायक नाही राहिले. याचा अर्थ काय? शारीरिक शुचिता म्हणजे नेमकं काय? सन १९७९ मध्ये पाकिस्तानमध्ये कायदा झाला,




की शिक्षा बलात्कारित स्त्रीलाही व्हावी. यानुसार आंधळ्या साफिया बीबीच्या तोंडावर थापडा मारण्यात आल्या व वीस फटके मारण्यात आले. इस्लामी ऑर्डनसने पुरुषांना उभं करून व स्त्रियांना खाली बसवून फटके मारावेत, असा कायदा पास केला. झिया उल हक यांना इसलाम धर्माचे रक्षक मानले गेले. हे सन १९७७ मध्ये 'जिना मेड पाकिस्तान'ला निरोप दिला गेला. सन १९४४ मध्ये जिनांनी आपल्या एका भाषणात म्हटलं होतं, माणुसकीच्या विरोधातला हा एक गुन्हा आहे, की आपल्या स्त्रियांनी घराच्या चार भिंतींमध्ये कैद्यासारखं जीवन जगावं, आपल्या बायका नाईलाजानं ज्या प्रकारचं लज्जास्पद जीवन जगत आहेत, ते कोणत्याही दृष्टीनं उचित नाही. तुम्ही जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात त्यांना कॉमरेडसारखं आपल्याबरोबर वावरू द्या; परंतु स्वातंत्र्याच्या जिनांच्या भाषणासंदर्भात जाहिदा हीना लिहितात– 'त्यात पाकिस्तानमध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन यांच्या धार्मिक स्वातंत्र्याचा उल्लेख आहे. दगड-विटांनी बनलेल्या मंदिर-मस्जिदींचा उल्लेख आहे. पण स्त्रियांसाठी एकही शब्द नाहीये.' बस हेच आहे स्त्रियांचं स्थान. ज्ञान व राष्ट्रवादाच्या राजकारणामध्ये भारतात असो किंवा पाकिस्तानात, रख्माबाईसारख्या स्त्रिया कुठं आहेत?

बांगड्या भरून बसलाय काय? पुरुषासारखा पुरुष असून रडतोस काय? बाईच्या जातीला हे शोभतं का? असं म्हणणही भेदभाव आणि अन्यायकारक आहे. तरीही आम्ही दैनंदिन जीवनात याचा वापर करतो. मुलगी बिघडली याचा अर्थ तोच होत नाही, जो मुलगा बिघडला याचा होतो.

मीरा गाते –

**म्हरो मण-मगण स्याम लोक कह्या भटकी**
**मीरा गिरधर हाथ बिकाणी लोक कह्या बिगडी**
**काजल टीकी राणा त्यागे भगवी चादर पहर**

(माझं मन कृष्णात रमलं-लोकं म्हणाले ही वाट चुकली, मी त्याला वाहून घेतलं- लोक म्हणाले ही बिघडली. काजळ, टीका सोडले, भक्तिण झाली.)

'वीर भोग्या वसुंधरा'- आता समजतंय, की स्त्रीला धरणी का म्हटलं जातं. असल्या या वीरांच्या विरोधात युद्धाचा शंखनाद मीरेने केला होता. सहजी कळून येईल, की एक स्त्री कोणत्या दुर्गम उंचीवर पोहोचल्यावर म्हणू शकते –

**राणाजी म्हाने बदनामी लगे मीठी**
**कोई निंदो कोई बिंदो चाल चलूंगी अनूठी**
**गिरधर गास्या और सती नही होय्यां**

(राणाजी कितीही बदनामी करा, मला ती गोड वाटेल, कोणी निंदा वा वंदा मी अनोख्या वाटेवरच चालेन, कृष्णाचे गायन करत राहीन, सती नाही जाणार.)

गल्लीत जातीच्या व घरात पितृसत्ताक वर्चस्वाच्या समन्वयातून 'दलित स्त्रीवादा'चा जन्म झाला. गोपाळ गुरू आणि सुंदर रुक्काई यांच्यातील संवादाचा एक भाग म्हणजे – दलित आंदोलनात पितृसत्तांचा विद्रूप चेहरा व स्त्री आंदोलनातील जातीभेदाचे विकृत रूप पाहून दलित स्त्रियांनी आपली वेगळी संघटना सुरू केली.' दलित आणि स्त्री या दोन्ही अभिशापाच्या संघर्षयात्री आहेत. त्यांचा आपल्या साथीदारांना प्रश्न आहे –

**दामन पे कोई छींट न खंजर पर कोई दाग**
**तुम कल करे हो कि करामात करे हो।**

(कपड्यावर शिंतोडा नाही, न खंजरवर डाग, तू खून करतोयस की करामत!)

एकीकडे सांस्कृतिक हुकुमशाहीचा कपटी धारू होतो नितळ कांति, रुप-रंग आणि गोऱ्या कातडीबाबत आणि दुसरीकडे, मार्केटिंग विशेषज्ञांची मागणी-उन्मुक्त भोग-उपभोग नारीमुक्तीचे पर्याय व्हावेत. दिल्लीच्या व्यापार मेळाव्यात काम करण्यासाठी निवडलेल्या मुलींना मोबदला, त्या जेवढं शरीर प्रदर्शनासाठी तयार असतील त्या आधारावर दिला गेला. तीनशे रुपये साडी नेसणारीला व तीन हजार मिनीस्कर्ट घालणारीला. पुराणापासून आजच्या बाजारापर्यंत स्त्रियांसाठी ज्या निती ठरल्या, त्या छळ-कपटाच्याच आहेत. शरशय्येवर पडलेले भीष्म पितामह आठवा. महाभारतातील 'शांतिपर्वात' ते कौरव-पांडवांना जेव्हा राजनीतिचे धडे देत होते, तेव्हा द्रौपदी हसली. स्त्रियांचं असं हसणं रहस्यमय असतं. ते समजून घ्यायला हवं. विनोद पदरज यांच्या प्रस्तुत ओळींसह – ●●●

**उसका हँसना युद्ध**
**पूरी सदी के विरुद्ध**

---

**(मुळ लेख हिंदी डॉ. शशिकला राय. लेखिका ज्येष्ठ विचारवंत असून सा.फु.वि.पु. येथे हिंदी विषयाच्या प्राध्यापक आहेत.)**
**मराठी अनुवाद – डॉ. जया परांजपे**


# शोध स्वातंत्र्याचा



डॉ. बी.जी. वाघ

**व्यक्ती आणि समाज यांतील संबंध परस्परविरोधी असतात आणि तेच माणसाचे स्वातंत्र्य निश्चित करतात. माणसाला मिळालेले निसर्गदत्त अधिकार व त्यावर समाजाने घातलेली बंधने असे त्याचे स्वरूप असते. सामाजिक, राजकीय वा धार्मिक मान्यतेशिवाय स्वातंत्र्य असू शकत नाही. तथाकथित धार्मिक रिती, नितीनियम, परंपरा म्हणजे धर्माने माणसाच्या स्वातंत्र्यावर घातलेली बंधनेच होत. या बंधनांना नाकारण्याचे नैतीक सामर्थ्य अंगी असणे म्हणजेच स्वातंत्र्य होय.**

फ्रॅक्चर्ड फ्रीडम (Fractured Freedom) या पुस्तकावर नुकताच वाद झाला. पारितोषिकपात्र पुस्तकाला सरकारने ऐनवेळी पुरस्कार नाकारला. हे पुस्तक म्हणजे न्याय, कायदा, स्वातंत्र्य, समान व्यवस्था, प्रशासन व्यवस्था याची चिरफाड करणारे होते. भारतात घटना आहे; परंतु तिची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करणारी यंत्रणाच अस्तित्वात नाही. येथे वर्षानुवर्षे निव्वळ संशयावरून एखाद्या व्यक्तीला जर तो स्वातंत्र्य, समता आदी मूल्यांसाठी संघर्ष करत असेल तर तुरुंगात डांबता येते. कोबाड गांधी यांचे पुस्तक या व्यवस्थेचा एक आरसा आहे. या देशाला स्वातंत्र्य मिळाले; परंतु या देशातील कोट्यवधी साधनहीन व्यक्तींना स्वातंत्र्य अद्यापही मिळालेले नाही. त्याला या स्वातंत्र्याचा शोध लागला नाही. भ्रष्टाचार, जातीयता, धर्मांधता, अमानुष प्रशासकीय यंत्रणा, कायद्याचे भय नसलेली राजकीय यंत्रणा अशी अनेक ग्रहणे या स्वातंत्र्याला लागलेली आहेत. ती नजीकच्या काळात सुटतील अशी आशा नाही. कारण त्यासाठी आमुलाग्र परिवर्तनाची आवश्यकता आहे. देशात पराकोटीची विषमता आहे. त्यामुळे मते विकली जातात, विकत घेतली जातात. या व्यवस्थेत कुणीही प्रामाणिक माणूस निवडून येणे अशक्य असते. आपली लोकशाही शांततामय मार्गाने आमुलाग्र परिवर्तन घडवून आणू शकत नाही. स्वातंत्र्यासाठी, समतेसाठी संघर्ष करण्याची सामान्य माणसाची प्रवृत्ती नाही. आपल्या धार्मिक व जातीय अस्तित्त्वासाठी त्याने अनेकवेळा संघर्ष केला आहे. थोडक्यात, येथील मूल्यव्यवस्था आणि घटना यात मूलतःच संघर्ष आहे. त्यामुळे या संकल्पनांचा, येथील मानसिकतेचा मुळापासून शोध घ्यावा लागेल. समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता ही तत्त्वे मूलतःच भारतीय नाहीत. एक बुद्ध काळ सोडला, तर येथील हिंदूव्यवस्था मूलतः समता, स्वातंत्र्य, न्याय यांना नाकारणारी आहे. विषमतेलाच धर्म मानणारी आणि सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याला नाकारणारी ही व्यवस्था आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे स्वातंत्र्य म्हणजे सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्य. या स्वातंत्र्याबरोबरच देशात आर्थिक, सामाजिक, राजकीय,




धार्मिक स्वातंत्र्यही आवश्यक आहे. या सर्व संकल्पनांचा विकास मोठ्या लोकचळवळीतून, धर्म, विज्ञान, तत्त्वज्ञान यांच्या संघर्षातून, घुसळणीतून, प्रबोधनातून झाला आहे. माणूस हा मुळात कळपात राहणारा प्राणी आहे. बर्ट्रांड रसेलने म्हटले आहे, कळपाचे संरक्षण करणे हाच आदिम नितीव्यवस्थेचा पाया राहिला आहे. त्यामुळे कळप (बहुसंख्याक) जे म्हणेल तेच सत्य, अशी माणसाची धारणा असते. व्यक्ती आणि समाज यांतील संबंध परस्परविरोधी असतात आणि तेच माणसाचे स्वातंत्र्य निश्चित करतात. माणसाला मिळालेले निसर्गदत्त अधिकार व त्यावर समाजाने घातलेली बंधने असे त्याचे स्वरूप असते. सामाजिक, राजकीय वा धार्मिक मान्यतेशिवाय स्वातंत्र्य असू शकत नाही. तथाकथित धार्मिक रिती, नितीनियम, परंपरा म्हणजे धर्माने माणसाच्या स्वातंत्र्यावर घातलेली बंधनेच होत. या बंधनांना नाकारण्याचे नैतीक सामर्थ्य अंगी असणे म्हणजेच स्वातंत्र्य होय. माणूस जन्मतःच स्वतंत्र आहे; परंतु तो सगळीकडे साखळदंडांनी बद्ध आहे, हे रुसोचे वचन प्रसिद्धच आहे. कार्ल मार्क्सवरदेखील रुसोचा प्रभाव होता. आर्थिक स्वातंत्र्य असल्याशिवाय सामाजिक स्वातंत्र्य येऊ शकत नाही. भारतीय समाजव्यवस्थेत तर सामाजिक व धार्मिक विषमतेतूनच आर्थिक विषमता निर्माण झाली आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्याय यांच्या परस्पर संबंधांवर, त्यांच्यातील अंगभूत आंतर्संघर्षावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांइतके सखोल चिंतन कुठल्याही भारतीय विद्वानाने केलेले नाही. माणूस हा निव्वळ व्यवस्थेने गुलाम नसतो, तर तो मनानेही गुलाम झालेला असतो.

ही गुलामगिरी मूलतः धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक वा जातीय कारणांनी आलेली असते. भारतीय माणूस जातीपासून मुक्तच होऊ शकत नाही. हे केवळ सामान्य माणसाचे दुर्दैव नाही, तर भारतीय संत, विचारवंत, आध्यात्मिक गुरू, महान नेतेही त्यातून मुक्त झालेले नाहीत. धार्मिक सहिष्णुता, सामाजिक विद्वेष, जातीय व धार्मिक पूर्वग्रह माणसाला या व्यवस्थेपासून मुक्त होऊ देत नाहीत. माणूस कितीही शिकला तरी इतिहासाच्या ओझ्यापासून तो मुक्त होत नाही.

परंपरेतून आलेल्या जातीय व धार्मिक कर्मठतेपासून त्याची सुटका होत नाही. स्वातंत्र्याचा विचार करताना अशा अनेक अंगांनी विचार करावा लागतो. माणूस निसर्गाचे अपत्य आहे. आंधळ्या मातेचा डोळस पुत्र, असे त्याचे वर्णन बर्ट्रांड रसेलने केले आहे; परंतु इम्मॅन्युअल कांटने म्हटले आहे, की माणूस साखळीने बांधलेल्या कुत्र्यासारखा आहे. त्याला साखळीपासून मुक्त केले, तरी तो कंपाऊंडच्या बाहेर उडी घेण्यास घाबरतो. एका अर्थाने तो स्वातंत्र्यालाही घाबरतो. माणूस मुळात आपल्या पाशविवेकापासूनही मुक्त झालेला नाही. त्याला आपण विवेकी (Rational Animal) म्हणतो; परंतु खरंच तो तसा आहे का? माणूस आपल्या पाशविक अवस्थेपासून मनाने अद्याप मुक्त झालेला नाही. दुसऱ्याला छळणे, दुर्बलांच्या वस्तू, व्यक्ती, संपत्तीवर हल्ला चढवणे, आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करणे, दुसऱ्याला आपल्या दबावाखाली ठेवणे, वेळोवेळी हिंसेचा वापर करणे, ही त्याची लक्षणे त्याच्या मूळ पाशवी अवस्थेकडे निर्दे श करतात. अलीकडील राजकीय नेत्यांकडे पाहिले, तर त्यांची वृत्ती, प्रवृत्ती हुप्प्या माकडांसारखीच असते. युद्ध मानसिकता (Impulse Aggression) हीदेखील एक नैसर्गिक प्रवृत्ती समजली जाते. तिला कधी धर्माचे वा राष्ट्राचे अधिष्ठान देऊन गौरविले जाते. राष्ट्रवाद मुळात हिंसक मानसिकताच असते. त्याला धर्माची, वंशाची जोड मिळाली तर हिटलरसारखे राष्ट्रपुरुष निर्माण होतात. ते सामान्य माणसांच्याच संमतीने असंख्यांचा विनाश घडवून आणतात. या प्रवृत्ती इतिहासात नेहमीच दिसून आल्या आहेत. प्राचीन धर्मातही हिंसा आणि क्रूरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात होते. माणसाचा बळी दिला जात होता. पुढे तो पशूंचा देण्यात येऊ लागला. त्यामुळे धर्मांध होणे म्हणजे सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याला विरोध करणे होय. सर्व धर्मांत स्त्रीला दुय्यम स्थान आहे; परंतु अशा धर्माच्या रक्षक मुळात स्त्रियाच असतात. स्त्रीला लैंगिक स्वातंत्र्य नाहीच. अगदी विवाहसंस्थेचा जन्म झाला नव्हता तेव्हाही ते नव्हते. कळपाचा रक्षणकर्ता हाच स्त्रियांचाही मालक असे. समूहाच्या हितासाठी स्त्रियांना नेहमीच बळी जावे लागले आहे. स्त्रिया समूहाच्या मालकीच्या होत्या, म्हणजे गुलामच होत्या. समूहसत्ता (Collectivism) नेहमीच स्वातंत्र्याला प्रतिरोध निर्माण करते. समूहसत्तावाद ही अलिकडील निर्मिती आहे. म्हणजे जे काही आहे ते राष्ट्राचेच, व्यक्तीचे काहीही नाही, हा विचार मार्क्सवादातून आला. त्यामुळे समता प्रस्थापित होऊ शकते, स्वातंत्र्य नाही. सत्ता आणि स्वातंत्र्य यात नेहमी संघर्ष असतो. निसर्गाने निर्माण केलेल्या विविध प्रेरणा आणि प्रवृत्ती समजून घेतल्याशिवाय 'सत्ता' आणि स्वातंत्र्य यातील संघर्ष आपल्याला कळणार नाही. माणसाला भय असते, म्हणूनच तो सत्तेला शरण जातो. स्वातंत्र्यापेक्षा त्याला सुरक्षिततेचे महत्त्व अधिक वाटते. यातून अनेक विचारधारा निर्माण झाल्या आहेत. स्वातंत्र्याचे भय वाटणे, ही कल्पना अलिकडची.

**स्वातंत्र्याची सुरक्षा महत्त्वाची**

स्वातंत्र्य एक जबाबदारी निर्माण करते. ती पेलण्याची क्षमता व्यक्ती वा समाजात नसते. त्यामुळे ते सत्तेला सुरक्षिततेसाठी शरण जातात. प्रसिद्ध राजकीय तत्त्वज्ञ हॉब्जने आपल्या ग्रंथात लिहिले आहे, की माणसाच्या नैसर्गिक अवस्थेत प्रत्येकाचे प्रत्येकाशी निरंतर युद्ध चालू होते. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन असे ठरवले, की सरकार असावे. त्यापुढे त्यांनी असा करार राज्यव्यवस्थेशी केला आणि आपले स्वातंत्र्य त्याला अर्पण केले. फक्त एकच अट घातली, की राज्याने प्रत्येकाचे जीवित आणि वित्ताचे रक्षण करावे. जगात असा करार कोठे झालेला नाही. तथापि, राज्यव्यवस्थेचे मूळ स्वरूप त्यातून प्रगट होते. सामान्य माणसाला स्वातंत्र्यापेक्षा सुरक्षिततेचे महत्त्व अधिक वाटत असते. माणसाच्या या अंगभूत दुर्बलतेचा राज्यकर्ते बरोबर फायदा उठवतात. ते जनतेच्या मनात आधी भय निर्माण करतात आणि जनतेचे महान रक्षणकर्ते म्हणून सत्तेवर येतात. या व्यवस्थेत जनतेला स्वातंत्र्य देण्याचा प्रश्नच येत नाही. कधी आपले राष्ट्र, कधी आपला धर्म तर कधी वंश धोक्यात आहे, असा पद्धतशीरपणे प्रचार केला जातो. भयग्रस्त माणसे मग अशा राज्यकर्त्यांना भरभरून मतदान करतात. दुर्बलांना शक्तीशाली नेत्यांची गरज भासते. त्यामुळे कर्मठ, दुराग्रही, धंचोर, उद्धट, कुठलीही नितीमूल्ये न मानणारे लोक सत्तेवर येतात. कारण ते चारित्र्यसंपन्न नेत्यांपेक्षा अधिक ताकदवान आहेत, असे सामान्य लोकांना वाटत असते. लोकांच्या या भेकडपणातूनच हुकूमशाहीचा जन्म होत असतो. समाज आणि व्यक्ती त्यांच्यातील आंतर्संबंध उत्क्रांतीच्या अनेक टप्प्यांतून विकसित झाले आहेत. असे असले तरी या नैसर्गिक वृत्ती, प्रवृत्ती मूलतः बदललेल्या नाहीत. माणसाच्या देवकल्पना वा धर्मकल्पनांमागेदेखील माणसाचे शाबित भय आहे. शेतीचा शोध आणि बोधात्मक क्रांती यामुळे समाजव्यवस्था प्रगल्भ झाली. व्यक्तीला आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली. धर्म आणि देव कल्पनांचा विस्तार झाला आणि कळप मानसिकतेतून बाहेर पडून तो वैश्विक विचार करू लागला. असे असले तरी कुठल्याही देवाने वा धर्माने माणसाच्या स्वातंत्र्याची, समतेची घोषणा केली नाही. याला बौद्ध धर्म अपवाद आहे. स्वातंत्र्याचा अर्थ शेवटी बौद्धीक, मानसिक, नैतीक स्वातंत्र्य व स्वयंप्रज्ञता (Intellectual Independence) हाच आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य त्यानंतर येते. निर्भय समाजच स्वातंत्र्याची साधना करू शकतो. देव, धर्म, संस्कृतीविषयीची आंधळी अस्मिता ही मानसिक गुलामीची लक्षणे आहेत. बौद्ध धर्माचा पाडाव करण्यासाठी तत्कालीन वैदिकांनी माणसाचे मूलभूत अधिकार नाकारले. त्यानंतर वर्णव्यवस्थेच्या जोखडात त्यांना अडकवले. हे बौद्धीक षड्यंत्र होते. देव, धर्म या वर्णव्यवस्थेचे क्रूर समर्थक होते. त्यातून निर्माण झालेली संस्कृती म्हणजे क्रूरतेचे अस्थायिकीकरण (Spiritualization of cruelty) होते. मग ते ग्रंथ रामायण, महाभारत, गीता, उपनिषदे असोत, त्यांनी माणसांच्या गुलागिरीचे तत्त्वज्ञान निर्माण केले. त्यांचा आदर्श मनुस्मृतीच होता. मनुस्मृतीच ईश्वरप्रणित, वेदप्रणित होती, असा त्यांचा दावा होता. वेद ब्रह्माच्या मुखातून निर्माण झाले होते. या सर्व थोतांडालाच ते वेदांत म्हणत होते. इतर धर्मात अशी थोतांडे नसली, तरी माणसाच्या मूलभूत स्वातंत्र्यालाही त्यांनी नाकारलेच होते. समता होती; परंतु बौद्धीक स्वातंत्र्य नव्हते. मार्टिन ल्यूथरच्या विद्रोहापासून धर्माची चिकित्सा सुरू झाली. हा संघर्ष विज्ञान विरुद्ध धर्म असाच होता. त्यामुळे युरोपात प्रबोधनाची पहाट उगवली. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता अशी मूल्ये या चळवळींतून झळाळून

(उर्वरित .. पान नं. २१ वर)

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

# वार्षिक वर्गणीदारांना

## २०% सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदारचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ९६० | ८०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ४८० | ४०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | २४० | २०० | |

(वार्षिक विशेषांक – ४) / (६ महिने – २)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : -------------------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : --------------------------------------------------पत्ता : ----------------------------

--------------------------------------------शहर : ----------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------- फोन नं. (घर) : --------------------

मो. नं. : ------------------------इ-मेल : ----------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा peoplespost.in

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

# भय, अस्वस्थतेचे पर्व...

**जगण्याच्या सर्व आघाड्यांवरील हे अस्वस्थ वर्तमान माणसाच्या जगण्याच्या उमेदीवर घाला घालत आहे. भवितव्याची चिंता, उद्याबाबतची अनिश्चितता, खाण्यापिण्याची भ्रांत, आर्टिफिशियल इंटेलिजन्ससह वाढणारे ऑटोमेशन आणि रोजगाराच्या समस्या, महागाईने चाळीस वर्षात गाठलेले टोक अशा कितीतरी कारणांनी ग्रासलेल्या माणसामाणसात चिंता घर करून राहिली आहे. त्या चिंतेने मानसिक समस्या वाढीला लागलेल्या आहेत. जगात इतर कोणत्याही आजारांपेक्षा मानसिक आजाराचे रुग्ण वेगाने वाढत आहेत.**

**भास्कर नाशिककर**

जगण्यातील अस्थिरता, अशाश्वतता, भयाची सदोदीत टांगती तलवार आणि या सगळ्या वातावरणातून येणारी अस्वस्थता आणि त्यातून निर्माण होणारे आव्हानात्मक प्रश्न या जटीलतेतून एकविसाव्या शतकातील आपली वाटचाल सुरू आहे. अमेरिकेतील ट्विन टॉवरवरील हल्ला, अफगाणिस्तानविरुद्धचे युद्ध, इराकवर अमेरिकेचे हल्ले, सद्दाम हुसेन यांची पदच्युती, मध्य पूर्वेतील सत्ताधाऱ्यांविरुद्धचा जनतेचा उठाव, २००८ ची मंदीची लाट ते कोरोनाचे अवतरण आणि त्याने पूर्ण जगाची विस्कटलेली आर्थिक, सामाजिक, प्रशासकीय घडी, त्यातून निर्माण झालेले प्रश्न, अशा एका दुष्टचक्रातून सगळ्यांची वाटचाल सुरू आहे. ते भेदण्याचे प्रयत्न कितीही केले तरी नवनवी आव्हाने त्यातील गुंतागुंत वाढवत आहेत. तेविसाव्या दशकातही ही समस्या घेऊनच आपल्याला प्रवेशावे लागले आहे. ढोबळमानाने पाहता, एक क्लायमेट चेंज किंवा हवामान बदल, दुसरे मानवी व्यवहार, अर्थकारण व प्रशासन आणि तिसरे मानवाचे आरोग्य अशा तीन प्रकारांत बऱ्यापैकी समस्यांची मांडणी करता येऊ शकते. त्यावर तुकड्यातुकड्याने उत्तरे शोधण्याएवजी त्याचा साकल्याने विचार करून साखळी स्वरुपात उत्तरांची फेरमांडणी केल्याशिवाय या समस्यांवर व्यापक हिताचा तोडगा निघू शकणार नाही, हेच खरे आहे.

**धोक्यात आले जीवनमान**

क्लायमेट चेंज किंवा हवामान बदलाने बघता बघता प्रत्येकाच्या जीवनात प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या प्रवेश केला आहे. शतकानुशतकाच्या ऋतुचक्रात व्यापक परिवर्तन प्रत्ययाला येत आहे. कधी पाहिले नाही एवढे टोकाचे वाढते उष्णतामान, पर्जन्यमान, शीतलहरी आणि जोडीला चक्रीवादळांची, विजावाऱ्यांची आवर्तनं यामुळे शेतीच्या परंपरागत व्यवस्थेला सुरूंग लागला आहे. परिणामी, शेतमालाच्या उत्पादनात घट येत आहे, शेतीचे अर्थकारण धोक्यात आले आहे. त्याने शेतकरी उद्ध्वस्त होत आहे. साऱ्या जगाची अन्नसुरक्षा धोक्यात आली आहे. वाढत्या तापमानाला रोखण्यासाठी विकसित आणि विकसनशील देशांत क्लायमेट चेंज परिषदांच्या निमित्ताने गेल्या पाच-सहा परिषदांत झालेली विद्वतचर्चा दर्जेदार असली तरी कृतिशून्यतेचा तिला शाप आहे. परिणामी, वास्तवाचे भान असले तरी कृतीच्या आघाडीवर शिमगा असल्याने जगाचे तापमान दीड अंश सेल्सिअसने वाढणे रोखता येणे कठीण दिसू लागले आहे. या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणून जगाच्या कुठल्या ना कुठल्या भागात कमालीचा दुष्काळ, महापुराची वाढलेली वारंवारिता, जंगलांना आगी, त्याने प्रदूषणात वाढ, हिमनगांचे वितळणे, सागरांच्या पाणीपातळीत वाढ आणि त्यामुळे प्रामुख्याने किनाऱ्यावरील महानगरांचे अस्तित्व धोक्यात येणे, विशेषतः बेटांच्या देशांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या सगळ्या घटकांमुळे जगण्याचा संघर्ष अधिक टोकदार होतो आहे. त्यातून अन्नसुरक्षा धोक्यात येणे, रोजगार, स्थलांतर, आरोग्याचे प्रश्न, मानसिक अस्वस्थता अशा प्रश्नांची तीव्रता अधिक भयावह होऊ लागली आहे. या सगळ्या गोष्टींचा प्रत्यय आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील, अगदी कोकणापासून विदर्भापर्यंत आणि उत्तरेपासून दक्षिण महाराष्ट्रातील माणसाला येतो आहे.

**अर्थकारणाला ब्रेक, लोकशाहीसमोर पेच**

जागतिक अर्थव्यवस्था २००८ मध्ये मंदीच्या छायेत आली. त्यातून ती कशीबशी बाहेर पडून दौडायला लागली होती. निर्मिती उद्योगासह अनेक आघाड्यांवर गुलाबी चित्र दिसू लागले होते. मात्र दोन वर्षांपूर्वी अवतरलेल्या कोरोना महामारीने त्यावर सगळे पाणी फेरले आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय पातळीपासून आरोग्यापर्यंतच्या सर्व आघाड्यांवर जगणे विस्कटले गेले. जेव्हा सामाजिक समस्या गंभीर रूप धारण करू लागतात, तेव्हा त्याचे फायदा घ्यायला समाजातील घटक अधिक सक्रीय होऊ लागतात. त्याचा अनुभव जगाच्या सगळ्या कोपऱ्यांत येत आहे. विशेषतः मोठ्या श्रमाने उभ्या केलेल्या लोकशाहीला नख लावणे, अपरिमित अधिकार महामारीवरील नियंत्रणासाठी आवश्यक आहेत, असे भासवून एकाधिकारशाहीकडे वाटचाल करणे, त्यातून विशेषतः मूलतत्त्ववादी किंवा उजव्या विचारसरणीला बळकटी येणे, देशप्रेम आणि देशद्रोह या नावाखाली सत्ताधारी व विरोधकांतील संघर्ष वाढीला लागणे असे कितीतरी प्रकार जगात वाढीला लागले. विशेषतः आर्थिक समस्या, चाळीस वर्षांत पहिल्यांदाच महागाईने टोकाची स्थिती गाठणे यामुळे जनता रस्त्यावर येण्याचे प्रसंग खूप घडले. सत्ताधाऱ्यांना त्यांच्या आंदोलनांनी जाग आणली. यूरोपातील बेल्जियम, जर्मनी, फ्रान्स, ब्रिटनसह आफ्रिका, आशियातील अनेक देशांत आंदोलने झाली. ४३ देशांत त्याचे सर्वाधिक पडसाद उमटले.

२०१६ नंतर हे चित्र अधिक उदासवाणे होऊ लागले आहे. जगातील ६२ टक्के जनतेचे रोजचे उत्पन्न दहा डॉलरपेक्षा कमी आहे. पंचवीस कोटींवर लोक टोकाच्या अन्नसुरक्षेच्या समस्येला तोंड देत आहेत. सध्याची स्थिती पाहता, २०३० पर्यंत भुकेवर मात करण्याचे जगाचे स्वप्न धुळीला मिळेल, असा जाणकारांचा अंदाज आहे.

या परिस्थितीचे प्रतिबिंब नागरी अस्वस्थता निर्देशांकात (सीयूआय) उमटत आहे. आजमितीला १९८ पैकी १०१ देशांत त्याची तीव्रता अधिक असल्याचे स्पष्ट होत आहे. युरोनियन महासंघासह श्रीलंका, पेरू, केनिया, इक्वेडोर, इराण, अल्जेरिया, युक्रेन, बोस्निया, स्वित्झर्लंडसह अनेक ठिकाणी त्याची प्रचिती येत आहे.

**श्रीलंका, कझाकिस्तानात सत्तांतर**

जनतेत अस्वस्थता वाढीला लागते तेव्हा सत्ताकारणाला हादरे बसू लागतात. त्यातून ते एकाधिकारशाहीकडे वाटचाल करून बळकट तरी होते किंवा खांदेपालट तरी होते. सरकार स्थिरता निर्देशांक त्याची तीव्रता मोजत असतो. त्यानुसार, ४२ सत्ताधाऱ्यांच्या खुर्च्या या अस्वस्थतेने धोक्यात आल्या, तर २७ सत्ताधारी आपले स्थान बळकट करू शकले आहेत. जनतेतील अस्वस्थता, वाढलेली महागाई आणि बेरोजगारी, धोक्यात आलेली अन्नसुरक्षा, रशिया-युक्रेन युद्धाने विस्कळीत झालेली अन्नसाखळी, पुरवठासाखळी आणि महत्त्वाचे म्हणजे साऱ्या जगाची धोक्यात आलेली ऊर्जासुरक्षा आणि त्यामुळे गतिमान झालेले महागाईचे आवर्तन, त्यातून येणारे मानसिक ताण आणि जन्माला आलेले आरोग्याचे विशेषतः मानसिक आरोग्याचे प्रश्न अशी समस्यांची लांबलचक साखळी आणि त्यातून अस्वस्थता असे दुष्टचक्र सतावू लागले आहे. या सगळ्यांचा परिणाम सरकारांच्या स्थैर्यावर झाला आहे. श्रीलंका या पर्यटनावर आधारित अर्थव्यवस्थेचे कंबरडे कोरोना महामारी आणि रशिया-युक्रेन युद्धाने निर्माण झालेल्या समस्यांनी मोडले. परिस्थितीसमोर हतबल सरकार आणि समस्यांनी त्रस्त जनता या स्थितीचा उद्रेक होऊन गोटाबाया आणि महिंदा राजपक्षे बंधूंना जनतेने सत्ताच्युत केले. असाच प्रकार जनतेच्या अस्वस्थतेचा झाला. तेथे एकोणीस वर्षे सत्ता असलेल्या नूर सुलतान नझरबायेव्ह यांना तेथील जनतेने सत्तेवरून पायउतार व्हायला भाग पाडले. पाकिस्तान त्याच वाटेने जाईल, अशी चिन्हे आहेत.

**अभिव्यक्तीची मुस्कटदाबी**

लोकशाहीची गळचेपी किंवा अभिव्यक्तीच्या मुस्कटदाबीचे प्रकारही या अस्वस्थतेत आणि अस्थिरतेत भर घालणारे ठरले. त्यातून उजव्या विचारसरणीची सरशी किंवा तिने उचल खाण्याचे प्रकार घडले. फ्रान्सच्या सार्वत्रिक निवडणुकीत अध्यक्ष इम्यॅन्युएल मॅक्रॉन पुन्हा सत्तेवर आले, पण त्यांच्याविरोधात उजव्या विचाराच्या मरीन ली पेन यांचे माताधिक्य प्रचंड वाढले. महिन्यापूर्वी जर्मनीत नाझीवाद्यांचा सरकार उलथवण्याचा कट हाणून पाडला गेला. ब्राझिलमध्ये उजव्या विचारांच्या, कोरोना काळात एकाधिकारशाहीने वावरणाऱ्या जेर बालसेनोरा यांना जनतेने नाकारले, तेथे डाव्या विचारांचे लुल्ला सत्तेवर आले. लॅटिन अमेरिकेतीलच चिलीमध्ये महाभियोगाने तेथील अध्यक्षांना पदच्युत केले गेले, तेथे सत्तांतर झाले. आज तेथे यादवीचे चित्र आहे, रोज हिंसाचाराचा उद्रेक होतो आहे, जनतेची उग्र निदर्शने सुरू आहेत. गतवर्षांत फिलिपाईन्स, इस्त्रायलमध्ये सत्तांतर झाले. तथापि, सरकार आणि सत्ताधाऱ्यांविरोधातील असंतोष, रोष प्रकट करण्यासाठी जनता रस्त्यावर उतरताना दिसून आली. अभिव्यक्ती आणि व्यक्तीगत मतस्वातंत्र्य यांचा संकोच करणारे उपाय सत्ताधाऱ्यांनी अंमलात आणले. ६६ देशांत त्या दिशेने सरकारांनी पावले उचलली, असे आकडेवारी सांगते.

**दहा कोटी स्थलांतरित**

परिणामी स्थलांतरितांचे जगणे वाट्याला आलेल्यांची




## महिला, मुलांची ससेहोलपट

या साऱ्या परिस्थितीचा सर्वाधिक विपरित परिणाम महिला आणि मुले यांच्यावर अधिक तीव्रतेने होत आहे. मुलांचे भवितव्य करपून जात आहे, तर महिलांच्या दुःखाला पारावर राहिलेला नाही, असे चिंताजनक चित्र आहे. इराणमध्ये हिजाबविरोधात आंदोलन पेटले, त्यात चारशेवर लोकांनी, विशेषतः महिलांनी प्राणाची आहुती दिली. आजही त्याची धग कायम आहे. आंदोलकांपुढे इराणचे सत्ताधारी नमले आणि त्यांनी विशेष पथकालाच विसर्जीत केले. तथापि, महिलांचे प्रश्न सुटलेले नाहीत. अफगाणिस्तानातील महिला पाषाणयुगीन जीणं जगत आहेत. त्यांना घराबाहेर पडणे, शिक्षण घेणे यावर बंधने आहेत. संघर्ष आणि नागरी अस्वस्थता यामुळे राजकीय गोंधळाची परिस्थिती अफगाणिस्तान, येमेन, सुदान, कोंगो, व्हेनेझुएला, पेरू, म्यानमार या देशांसह अनेक ठिकाणी आहे. त्यात महिलांची, मुलांची होरपळ होत आहे. १९४५ नंतर पहिल्यांदाच अशी विचीत्र स्थिती निर्माण झाल्याचे चित्र आहे.

संख्या दहा कोटींवर गेली आहे. त्याच्यातून स्थानिक विरोधी निर्वासित अशा संघर्षाच्या ठिणग्या उडत आहेत. त्यात महिला, मुलांच्या जगण्याला पारावर राहिला नाही. यातून मानवी तस्करी, त्यांचे लैंगिक छळ, अमली पदार्थांची वाहतूक, त्यातून खूनखराबा असले प्रकार वाढीला लागले आहेत.

कोरोनाने आरोग्याचे प्रश्न आणि व्यवस्थांचे तुटपुंजेपण यांच्या चिंधड्या उडवल्या आहेत. कोरोनाने आर्थिक समस्या अधिक गंभीर झाल्या आहेत. दारिद्र्यरेषेखाली कुटुंबे जाणे, त्यांचे उत्पन्न घटणे, त्यामुळे महिला आणि मुलांच्या पालनपोषण आणि त्यातून आरोग्याच्या समस्या वाढीला लागणे असे प्रकार कमालीचे वाढले आहेत. जगात शंभर कोटींवर जनता यातून निर्माण झालेल्या विविध प्रकारच्या समस्यांना तोंड देत जगत आहे. गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी अधिक रुंद झाली आहे. चीनमध्ये पुन्हा कोरोनाचा उद्रेक झाला आहे. तिथे अध्यक्ष शी जिनपिंग यांचे हात आणि सत्ता दोन्हीही अधिक बळकट झाले आहेत. चीनमध्येही कोरोनाबाबत कडक निर्बंध लादले गेले तेव्हा जनतेत मोठा उद्रेक झाला. परिणामी ते मागे घेणे भाग पडले. जागतिक राजकारणाचे ध्रुवीकरण होताना दिसत आहे. रशिया-युक्रेन युद्धात गुंतल्याने त्याच्या मर्यादा स्पष्ट होत आहेत. अमेरिका आणि चीन असे दोन ध्रुव भविष्यात जगात आकाराला येतील, असे दिसत आहे. तथापि, तसा ठोस निष्कर्ष आता तरी काढता येत नाही. त्याचे उत्तर काळच देईल. कारण कोरोनाची पावले आजही जगाला सतावत आहेत. आज आपल्याच देशातील ८० कोटी जनतेला रास्त दरात अन्नधान्य रेशनवर द्यावे लागत आहे. देशातील नव्वद टक्के जनतेचे मासिक उत्पन्न घटले आहे, नागरी बेरोजगारी कमी होण्याचे नाव घेत नाही, आरोग्यसेवेतील त्रुटी कोरोनाच्या साथीत समोर आलेले आहेत. मग इतर देशांतील स्थिती वेगळी असेल असे वाटत नाही. अमेरिका, ब्रिटन, इटलीसह युरोपातील अनेक विकसित देशांतील सरकारी यंत्रणा आणि आरोग्यसेवेचे वाभाडे कोरोना महामारीने काढले आहेत.

जगण्याच्या सर्व आघाड्यांवरील हे अस्वस्थ वर्तमान माणसाच्या जगण्याच्या उमेदीवर घाला घालत आहे. भवितव्याची चिंता, उद्याबाबतची अनिश्चितता, खाण्यापिण्याची भ्रांत, आर्टिफिशियल इंटेलिजन्ससह वाढणारे ऑटोमेशन आणि रोजगाराच्या समस्या, महागाईने चाळीस वर्षांत गाठलेले टोक अशा कितीतरी कारणांनी ग्रासलेल्या माणसामाणसात चिंता घर करून राहिली आहे. त्या चिंतेने मानसिक समस्या वाढीला लागलेल्या आहेत. जगात इतर कोणत्याही आजारांपेक्षा मानसिक आजाराचे रुग्ण वेगाने वाढत आहेत. जगात दहा व्यक्तिंमागे सात व्यक्ती मानसिक आजाराच्या बळी ठरत आहेत. ही आकडेवारी जगण्यातील काठिण्य किती सहनशीलतेपलीकडे जात आहे, हे अधोरेखित करत आहे.

**(लेखक समकालीन विषयाचे अभ्यासक आहेत.)**

**पान नं. १७ वरून...**

# शोध स्वातंत्र्याचा

पुढे आली. दुर्दैवाने भारतात धर्मविरोधी आंदोलने झाली; परंतु हिंदू मानसिकता बदलली नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे हिंदू मानसिकतेत रुजली नाहीत.

**धर्मश्रद्धा नसावी**

बुद्धाने धर्मग्रंथांचे प्रामाण्य नाकारले. ईश्वर, वर्णव्यवस्था, यज्ञसंस्था, पुनर्जन्म आदी मानवी विकासात अडथळे आणणाऱ्या सर्व संस्था, संकल्पना नाकारल्या. त्यामुळे माणसाचे अवकाश मुक्त झाले. स्वातंत्र्य ते हेच. बुद्धापासून सर्व प्रागतिक चळवळी सुरू झाल्या. विज्ञान, तत्त्वज्ञान बहरले. कला समृद्ध झाली. भारत जगातील ज्ञानसत्ता झाला. हे केवळ बौद्धीक, मानसिक स्वातंत्र्यामुळे शक्य झाले; परंतु त्यानंतर माणसाला मानसिकदृष्ट्या पंगू करणारी एक धर्मव्यवस्था, समाजव्यवस्था उभी झाली. तिने स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय ही बौद्धकालीन मूल्ये नाकारली. त्यामुळे भारत अनेक शतके सर्व प्रकारच्या गुलामगिरीत खितपत राहिला. राम, परशूराम हे कट्टर वर्णव्यवस्थेचे समर्थक; परंतु त्यांची मंदिरे बांधण्यासाठी येथल्या शूद्रांनी, अतिशूद्रांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय पाठबळ पुरवले. मानसिक गुलामगिरीचे यापेक्षा ठळक उदाहरण जगाच्या पाठीवर कुठेही आढळणार नाही. बौद्धीक, मानसिक व नैतीक स्वातंत्र्य हेच कुठल्याही लोकशाहीचे बलस्थान असते. त्याशिवाय लोकशाही टिकू शकत नाही. भयग्रस्त समाज फक्त हुकुमशहा निर्माण करतो. निर्भय समाजच सत्याची साधना करू शकतो; परंतु निर्भयता येते ती आत्मस्वातंत्र्यातून. विज्ञाननिष्ठ समाजच निर्भय असू शकतो. एकविसाव्या शतकातही भारत हा जगातील सर्वांत धर्मवादी देश आहे, हे भारताचे मोठे अपयश आहे. खऱ्या धार्मिकतेचा, सत्याचा, स्वातंत्र्याचा, सार्वजनिक जीवनमूल्यांचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. सत्तेचे भय, धर्माचे भय, धर्मग्रंथांची गुलामगिरी माणसाला मानसिक अपंगत्व आणते. विचारांची, व्यवस्थेची हुकुमशाही आपण अनेक अंगांनी अभ्यासतो. त्यापैकी मार्क्स, आंबेडकरवाद, गांधीवाद, उदारमतवाद, नवउदारमतवाद, नवमार्क्सवाद अशा अनेक विचारधारा माणसाला सर्वार्थाने मुक्त व निर्भय करण्याचे अनेक मार्ग दाखवतात; परंतु जोपर्यंत माणूस सत्तेला घाबरतो, धार्मिक दहशतवादाला शरण जातो, स्वातंत्र्यापेक्षा सुरक्षेला महत्त्व देतो तोपर्यंत भयमुक्त, भूकमुक्त, दुःखमुक्त समाजाची निर्मिती करता येणार नाही. 'द फिअर ऑफ फ्रीडम' या एरिक फ्रॉमच्या पुस्तकाची बरीच चर्चा आपण केली आहे. स्वातंत्र्याचे एक मूल्य असते आणि ते प्रत्येक समाजाने दिलेच पाहिजे. अन्यथा आपण हुकुमशहाच निर्माण करत राहू. भारतात लोकशाही केवळ तांत्रिक अंगाने अस्तित्वात आहे. बहुसंख्याकवाद, धार्मिक राष्ट्रवाद, अंधश्रद्धांनाच आपली सांस्कृतिक अस्मिता मानण्याची परंपरा आणि विचारी जनांचे भयावह मौन यामुळे आपण आपले स्वातंत्र्य गमावून बसलो आहोत. आपली जागरुकताच आपल्याला खऱ्या स्वातंत्र्याची वाट दाखवत असते.

●●● **(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**


# हिंदू राष्ट्र संकल्पना : एक संकट

**बहुतेक वेळा लोकप्रतिनिधी, पत्रकार, सामान्य माणसे आणि देशाचे प्रधानमंत्रीसुद्धा ज्यांना भारतीय संविधानाने उच्च पदावर विराजमान केले, तेसुद्धा त्यांच्या भाषणात 'हिंदुस्थान' हा शब्द प्रयोग वारंवार करताना दिसतात. मग हा राष्ट्रद्रोह नव्हे काय? हा देश म्हणजे आपण ज्या भूभागावर राहतो त्या भूभागाचं नाव जगाच्या नकाशावर 'भारत' असं आहे. स्वतंत्र भारत देशाचं संविधान भारतीय संविधान म्हणजेच CONSTITUTION OF INDIA आणि INDIA IS A BHARAT असा लिखित स्वरूपात उल्लेख आहे.**

**विमल शेंडे**

स्वतंत्र भारत देशामध्ये हल्ली हिंदुस्थान किंवा हिंदू राष्ट्र ही संकल्पना पुन्हा मोठ्या प्रमाणात जोर धरू लागली आहे. बहुतेक वेळा लोकप्रतिनिधी, पत्रकार, सामान्य माणसे आणि देशाचे प्रधानमंत्रीसुद्धा ज्यांना भारतीय संविधानाने उच्च पदावर विराजमान केले, तेसुद्धा त्यांच्या भाषणात 'हिंदुस्थान' हा शब्द प्रयोग वारंवार करताना दिसतात. मग हा राष्ट्रद्रोह नव्हे काय? हा देश म्हणजे आपण ज्या भूभागावर राहतो त्या भूभागाचं नाव जगाच्या नकाशावर 'भारत' असं आहे. स्वतंत्र भारत देशाचं संविधान भारतीय संविधान म्हणजेच CONSTITUTION OF INDIA आणि INDIA IS A BHARAT असा लिखित स्वरूपात उल्लेख आहे. भारतीय संविधानाची उद्देशिका 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांपासून सुरुवात झाली आहे. या शब्दांचा अर्थ सर्वसमावेशक असा आहे. देशाला कोणताही धर्म नाही. मूळ संविधानात 'इहवाद' म्हणजे धर्मनिरपेक्ष असा त्याचा अर्थ आहे. जात, धर्म, पंथ याला भारतीय संविधान वेगळी मान्यता देत नाही. 'माणूस' हा केंद्रबिंदू असल्यामुळे एकूणच भारतीय नागरिकाच्या कल्याणाचा सर्वंकष विचार संविधानामध्ये अंतर्भूत आहे.

हिंदुस्थान या शब्दाचा अर्थ ज्या भूभागावर फक्त हिंदू म्हणवून घेणारे लोक आहेत, केवळ त्यांचच वास्तव्य असलेला देश असा होतो. वास्तविक पाहता, भारत देशात शीख, इसाई, पारसी, मुस्लिम, जैन, बौद्ध असे अनेक धर्मांचे लोक असताना फक्त हिंदूंचाच देश कसा असू शकतो? याचाच अर्थ, या देशातील जनमाणसांवर ही संकल्पना रुजविण्याचा यशस्वी प्रयत्न लोकप्रतिनिधी करताना दिसतात. वरवर वाटत असली तरी ही संकल्पना संकुचित स्वरुपाची आहे. या संकल्पनेने कळत-नकळत आपण गुलामीच्या व्यवस्थेशी जोडले जातो. श्रेष्ठ, कनिष्ठ, उच्च-नीच अशी ही भावना



असमानतेचा पुरस्कार करते. ही असमान व्यवस्था ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अतिशूद्र अशी असल्यामुळे ती व्यवस्था वरच्या वर्गांच्या लोकांचे पोषण आणि शूद्र, अतिशूद्र लोकांचे मानसिक, आर्थिक, शारीरिक शोषण करते. वरच्या तीनही वर्णांची सेवा शूद्र, अतिशूद्राने करावी, असा मनुस्मृतीचा कायदा सांगतो आणि हा कायदा मानणारी

माणसेच हिंदू राष्ट्र या संकल्पनेला मान्यता देणारी आहेत. हिंदुस्थानात शूद्रातिशूद्र माणसाला प्राण्यापेक्षाही हीन दर्जाची वागणूक दिली जात होती हे सर्वश्रुत आहे. भारतीय संविधानाने शोषित, पीडित, वंचित माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला.

भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर भारताचे स्वतंत्र संविधान लिहिले गेले. ब्रिटिशांचा अंमल या देशावर १५० वर्षे होता; पण तत्पूर्वीही फ्रेंच, डच, मोगल, पोर्तुगीज, ग्रीक अशा अनेकांनी या देशावर राज्य केले. एकूण १,२५० वर्षे या देशाला गुलामीत काढावे लागले. (संदर्भ : 'मराठोंका इतिहास हारो की दास्तान' लेखक - ओशा) त्याला कारणच या देशातील वर्ण, जातीव्यवस्था आहे. गांधीजींच्या 'भारत छोडो' या आंदोलनास (१९४२) भारतीय माणसाने (सर्वच जाती, धर्म, पंथाचे लोक) पाठिंबा देऊन त्या आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग घेतला, हे सर्वांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. जनरेट्यामुळे आणि गांधीजींच्या कणखर नेतृत्वाने ब्रिटिशांना इथली सत्ता सोडावी लागली; पण या देशातून जाताना त्यांनी देशाची फाळणी करावी यासाठी बॅरिस्टर जिना आणि सावरकर आग्रही होते. या फाळणीचे दुष्परिणाम काय भोगावे लागले, हा इतिहास कोणीही विसरणे शक्य नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र म्हणून जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविला गेला. त्या स्वतंत्र भारताचे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले. या देशात बाबासाहेब आंबेडकरांना अगदी बालवयापासून जातीयतेचे चटके सहन करावे लागले. उच्चविद्याविभूषित असतानाही जातीव्यवस्थेने त्यांचा अमानुष छळ केला. Mr. Gandhi I have no motherland असे जेव्हा डॉ. बाबासाहेब म्हणत यावरून जातीव्यवस्था मानणाऱ्या माणसांनी त्यांचा किती छळ केला असेल, याची कल्पनाही आपण करू शकत नाही. डॉ. आंबेडकरांसाठी संविधान सभेची दारे-खिडक्या बंद करण्याची भाषा करणाऱ्या तत्कालीन राज्यकर्त्यांना मात्र संविधान लिहिण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच पाचारण करावे लागले. ही गोष्ट प्रत्येक भारतीय माणसाला विचार करायला लावणारी आहे. हा इतिहास खूप मोठा आहे. त्यामुळे तो इथे नमूद करता येणार नाही आणि ते शक्यही नाही.



भारत देशाची राज्यघटना लिहून दि. २६ नोव्हेंबर १९४९ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला अर्पण केली. (ही राज्यघटना संसदीय पद्धतीची आहे.) 'आम्ही भारताचे लोक' या प्रस्तावनेसह स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या चतु:सूत्रीत भारतीय नागरिकांना एकत्र गुंफण्यात आले. शिवाय श्रद्धा, उपासना, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, दर्जाची व संधींची समानता या उदात्त विचारांचा अंतर्भाव भारतीय राज्यघटनेत आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याने भारतीयांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणला आणि आनंदी गीतांचे सूरही वातावरणात घुमू लागले. हजारो वर्षे जाती, धर्म, पंथांच्या रुढीत बांधला गेलेला शोषित माणूस मुक्तपणे श्वास घ्यायला लागला. स्वतंत्र देशात भारतीयांची विकासाकडे वाटचाल सुरू झाली. स्वातंत्र्याचा खरा अर्थ लोकांना समजू लागला.

श्रद्धा आणि उपासनेच्या धार्मिक स्वातंत्र्याचा अर्थ व्यक्तीगत स्वरूपाची उपासना असा आहे. सार्वजनिक ठिकाणी मात्र पूजाअर्चा करण्यास संविधानाने मज्जाव केला आहे. असे असतानाही संविधानाने दिलेल्या निवडणूक प्रक्रियेतून मतदारांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी मात्र शासकीय पूजा करताना दिसतात. याचा अर्थ ते गुन्हा करीत असतात. गुन्हा करणाऱ्या या लोकांना भारतीय संविधान समजलेले नाही किंवा त्यांना ते मान्य नाही, असे खेदाने म्हणावे लागते. संविधानाच्या उद्देशिकेतील शब्दांचा मूळ अर्थ बदलवून गैरवापर करणे सुरू आहे. हा राष्ट्रद्रोह नव्हे का? ज्या-ज्या महापुरुषांनी स्वातंत्र्यासाठी प्राणांचे बलिदान दिले, त्यांच्या प्रामाणिक कर्तव्याशी बेईमानी करून 'भारतीय माणूस' स्वस्थ कसा राहू शकतो? आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा मनमुराद आनंद कसा घेऊ शकतो?

**भारत की हिंदुस्थान?**

'भारतीय' ही आपली ओळख जगात 'भारत देश' या नावासोबत जोडलेली आहे, की 'हिंदुस्थान' या शब्दासोबत? हिंदू हा शब्द कोणत्याही धर्मग्रंथात नाही. तो मुळात पर्शियन शब्द आहे असे अनेक विचारवंत, इतिहासकार यांचे मत आहे. तेव्हा हिंदुस्थान हा शब्दप्रयोग करणे मुळातच चुकीचे आहे. ज्याला हिंदू धर्म म्हणतात तो वैदिक धर्म म्हणजे वर्णव्यवस्थेतील वरच्या वर्णाच्या लोकांचा आहे. कालांतराने सिंधू संस्कृतीमधील द्रविड लोकांवर, अनार्यांवर तो धर्म लादला गेला आणि मग हिंदू धर्म या अर्थाने तो रुढ झाला आणि त्याच अनुषंगाने देशाला हिंदुस्थान म्हटले गेले. हिंदुस्थान किंवा हिंदू राष्ट्र जेव्हा संबोधले जाते, तेव्हा आपला संबंध येतो तो मनुस्मृतीशी, मनुस्मृतीमधील असमान कायद्यांशी, चातुर्वर्ण्य

व्यवस्थेशी, त्यातील श्रेष्ठ-कनिष्ठ या भावनेशी म्हणजेच मालक आणि गुलाम यांच्याशी जोडणाऱ्या असमान व्यवस्थेशी, अमानवी कायद्यांशी. एकाच गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या वर्ण, जातीच्या लोकांना वेगवेगळी शिक्षा आहे. म्हणजेच असमानता, जातव्यवस्था वृद्धींगत करणारी ही व्यवस्था आहे, हे सुजाण नागरिकाला सांगण्याची गरज नाही. 'ब्राह्मण कितीही असला भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ' असं गुणगान करणारी ही व्यवस्था. म्हणूनच प्रश्न पडतो, की भ्रष्ट माणूस कसा काय श्रेष्ठ होऊ शकतो? विवेकवादी माणसाने यावर विचार करणे अधिक योग्य राहील. तथाकथित वरच्या वर्णाला सौम्य शिक्षा; पण त्याच गुन्ह्यासाठी शूद्र-अतिशूद्र माणसाला कठोर शिक्षेची तरतूद हिंदू धर्मप्रणित मनुवादी व्यवस्थेत आहे. मग या व्यवस्थेत मानवी मूल्यांचं काय?

भारतीय संविधानाने एका गुन्ह्यासाठी सर्वच माणसाला सारख्या शिक्षेची तरतूद केली आहे. ही आहे समान न्यायाची योग्य व्यवस्था जी समतेचा पुरस्कार करते. मात्र, हिंदू धर्म जो चातुर्वर्ण्यप्रणित आहे, तो असमानतेचा पुरस्कार करतो. सर्वच माणसे एकाच ईश्वराची लेकरे आहेत, असे सांगणारा धर्म आणि तो मानणारी माणसे प्रत्यक्ष आचरणाने शूद्रांना नीच मानतात. ही आहे असमानता, चातुर्वर्ण्यप्रणित, मनुस्मृतीप्रणित. हेच उद्दिष्ट आहे, हेच अपत्य आहे हिंदू राष्ट्र संकल्पनेचे. जर हिंदू हा शब्द भारतीयांना नाही आणि या शब्दाचा अर्थ जर आपण समजून घेतला तर आपण स्वतःला कधीही हिंदू म्हणवून घेणार नाही. मग गर्व से कहो...... असं म्हणण्याचा प्रश्नच येत नाही. ''मी प्रथम भारतीय आणि शेवटीही भारतीय असं अभिमानाने म्हणणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आम्हाला अभिमान असावा; पण तसं होत नाही. कारण जातव्यवस्था, धर्माची शिकवण आम्हाला तसं म्हणण्याची परवानगी देत नाही, ही शोकांतिका आहे, हे दुर्दैव आहे या देशातील लोकांचं.''

ज्या भारतीय संविधानाने लोकशाहीमूल्ये प्रस्थापित करून प्रत्येकाला समान अधिकार दिले. त्याचबरोबर नागरिकांची जबाबदारी आणि कर्तव्येही सांगितली, त्याच भारत देशातील नागरिक बेजबाबदारीने वागतात. अलीकडे होणाऱ्या, घडवून आणलेल्या घटनांनी संवेदनशील माणसाचं मन सुन्न होते, त्याच्या मनाच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या होतात हे वास्तव आहे. नागरिकांच्या आहारविहार, आचार, पोशाख यांवरही बंदी घातली जात आहे. अमुक एक जात गोमांस भक्षण करते म्हणून त्याच्यावर प्राणघातक हल्ले होतात. यज्ञामध्ये गाईंचा बळी देऊन ते मांस भक्षण करणारे वैदिक लोक उच्चवर्णीय होते? मग आज त्यासाठी अमानुष हल्ला करण्याचं काय कारण? हासुद्धा जातीय अन्यायाचा, राजकीय षड्यंत्राचाच एक भाग आहे. हल्ली आंतरजातीय विवाह करणाऱ्या तरुण-तरुणीच्या अंगावर पेट्रोल टाकून त्यांना जाळले जाते, तरुणींची विटंबना केली जाते. लग्नप्रसंगी बॅण्ड वाजवून घोड्यावरून मिरवणूक काढणाऱ्या नवरदेवाला मारहाण केली जाते आणि बघ्यांचा एक समूदाय तो आनंदोत्सव साजरा करतो, हे दृश्य समाजमाध्यमांवर पाहायला मिळते. प्रियंका भोतमांगे ते मनिषा वाल्मिकीवर झालेला अत्याचार, त्यांच्यावर झालेला अन्याय, जातीव्यवस्थेचे एक लक्षण आहे. निर्भयाला वेगळा न्याय आणि प्रियंका, मनिषा वाल्मिकी यांच्यावर सामाजिक आणि राजकीय अन्याय होतो. न्यायदेवतेच्या दरबारातसुद्धा अन्यायच, हे सुदृढ सामाजिक मानसिकतेचं लक्षण नाही. धर्मनिरपेक्ष देशातल्या माणसाचे मानसिक स्वास्थ्य जातीय रोगाने ग्रासलेले असल्याचे एक उदाहरण आहे. ही देशाच्या सामाजिक एकतेला लागलेली कीड आहे. म्हणूनच अशा घटनांमध्ये वारंवार वाढ होताना दिसते. हिंगणघाटमध्ये झालेला तरुणीवरचा अन्याय, मुंबईतल्या पत्रकार मुलीवर झालेला अन्याय, सहा वर्षे वयाच्या आसिफा या बालिकेवर बीजेपीच्या लोकांनी केलेला बलात्कार आणि तोही कृष्णाच्या मंदिरात? देव जागृत असतो असं सांगणाऱ्यांना प्रश्न विचारावासा वाटतो, की त्यावेळी कृष्ण अर्जित रजेवर होता का? काय दर्शवितात या घटना? पाणी निसर्गाने निर्माण केले. त्यावर सृष्टीवरील प्रत्येक जीवाचा अधिकार आहे. पाणी पिण्यासाठी मंदिरात गेलेल्या आसिफ नावाच्या शाळकरी मुलावर हल्ला केला जातो. हे भारतीय माणसाची मानसिकता रोगट असण्याचे लक्षण नव्हे काय? पाण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करावा लागला, हा इतिहास साक्षी आहे. एका विशिष्ट जातीच्या माणसांवर हल्लेच होत राहावेत आणि हा देश पुन्हा विभाजित व्हावा असेच राज्यकर्त्यांचे मनसुबे असावेत, हीच तर संकल्पना आहे हिंदू राष्ट्राची.

**सबका विनाश!**

जगातील अनेक देश आपल्या नागरिकांच्या प्रगतीसाठी, त्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी देशाच्या प्रगतीचा, विकासाचा आलेख उंचावण्यास सतत प्रयत्नशील असतात. मात्र माझ्या स्वतंत्र 'भारत' देशात 'सबका साथ सबका विकास' म्हणत देशाला भकास केलं जात आहे. देशातील सार्वजनिक उद्योग भांडवलदारांना विकले जात आहेत. नोटाबंदी, जी.एस.टी.च्या नावाखाली सामान्य माणसाचं जगणं मुश्किल केलं जात आहे. कृषीप्रधान असलेल्या देशात शेतकऱ्यांना कृषी बिलाविरोधात संप करावा लागतो आणि त्यांच्यावरही हल्ले केले जातात. काय हा देश, इथली माणसं खरच स्वतंत्र आहेत? १९४५ साली जपान देशात हिरोशिमा, नागासाकी या शहरांवर बॉम्ब टाकून त्या देशाला उद्ध्वस्त केले. तरी तो देश ७५ वर्षांत नव्याने उभा राहिला. इतकेच नव्हे, तर जगाची बाजारपेठ काबीज केली आणि आर्थिकदृष्ट्या पुन्हा तो संपन्न झाला, हे लक्षात घेण्यासारखे आहे. या नेत्रदीपक यशामागे तिथल्या राज्यकर्त्यांचा दुर्दम्य आशावाद दिसून येतो. प्रत्येक माणूस समान आहे, त्याला समान अधिकार आहेत, हे सूत्र या यशामागे आहे. याचा विचार भारतीय राज्यकर्त्यांनी कधी करावा? फिनलॅन्डसारख्या देशात तिथल्या मुलांच्या शिक्षणाचा सर्व खर्च सरकार करते. इथे मात्र मूलभूत हक्कांपासूनही नागरिकांना वंचित राहावे लागते, शिक्षणावर बंदी घातली जाते. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होतो, देश प्रगत होतो, हे सूत्र आहे विकासाचं. महात्मा फुलेंपासून तर शाहू महाराज, पेरियार रामस्वामी, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज यांनी शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादीत केलेले आहे. या देशात मात्र त्यांच्या नावाचा वापर करीत शिक्षणालाच सुरुंग लावला जात आहे. ज्यांचा शिक्षणाशी काहीही संबंध नाही किंवा जे नावापुरते शिकलेले असतात, ते शिक्षण सम्राट होतात! हीच निर्मिती आहे हिंदू राष्ट्र संकल्पनेची. मराठी भाषेचा आग्रह धरणारे महाभाग स्वतःच्या

मुलांना इंग्रजी शाळेत घालतात आणि सामान्य, गरिबांच्या मुलांना मराठी शिकण्याचा आग्रह करतात, नव्हे तशी बंधने घातली जातात. ही आहे संकल्पना हिंदू राष्ट्राची.

चातुर्वर्ण्यवस्थेतील वरच्या वर्णाची मुले परदेशात जाऊन शिक्षण घेतात, नोकरी करतात आणि सुखाने आपले जीवन व्यतीत करतात. शूद्र आणि अस्पृश्यांची मुले मात्र देवाधर्माच्या नशेत असतात. नव्हे, त्यांना ती अफू जाणीवपूर्वक दिली जाते. मग ही मुले/माणसे, जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था, देवधर्म श्रेष्ठ असल्याचे गुणगान करतात. शिवाय लोकप्रतिनिधी यात भर घालण्याचे काम करतात आणि त्यात ते यशस्वी होतात. चौथा वर्ग शिकलेला उच्चवर्णीय अल्पशिक्षित माणसाचे भविष्य ठरवितो आणि बहुजन समाजातील माणसे याचा बळी ठरतात. बहुजनांनी स्वतःचा मेंदू उच्चवर्णियांकडे गहाण टाकलेला आहे. त्यांच्या हातचे बाहुले बनण्यास त्यांना अपमान वाटत नाही. हे सारे असेच अव्याहत राहण्यासाठीच तर आहे हिंदू राष्ट्राची संकल्पना?






**धर्मग्रंथांची चिकित्सा महत्त्वाची**

बहुजन समाजातील बुद्धीजीवी वर्गाने धर्म आणि धर्मग्रंथ यांची चिकित्सा करावी; पण तसे होत नाही. कारण धर्म सांगतो नदीचं मूळ आणि ऋषीचं कूळ विचारू नये. हीच आहे बौद्धिक मानसिक गुलामी. बुद्धिजीवी माणसं प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करतात. व्यवस्थेला प्रश्न विचारतात आणि त्यांनी प्रश्न विचारू नयेत, म्हणूनच ज्येष्ठ साहित्यिक आदरणीय वरवरा राव, आनंद तेलतुंबडे, सुधा भारद्वाज या साहित्यिकांना कैदेत ठेवले जाते. सरकारी यंत्रणा हे काम चोखपणे करते, हीच तर उत्पत्ती आहे हिंदू राष्ट्र संकल्पनेची.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे, त्याची गळचेपी होत आहे. वेदपूर्व काळातसुद्धा याज्ञवल्क्य ऋषींनी गार्गी आणि मैत्रायणी या विदुषीची मुस्कटदाबी केली. त्यावेळी जनमाणसं कदाचित निद्राधीन असेल; पण आज तर लोक उच्चविद्याविभूषित आहेत. असे असतानाही संविधानाने दिलेला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्कही हिरावून घेतला जातो. २०१९ मध्ये यवतमाळमध्ये झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनामधून नयनतारा सहगल या ज्येष्ठ साहित्यिकेला भाषण देण्यास मनाई केली, हे जगजाहीर आहे. या घटनेचा साहित्यकांनी निषेधही नोंदविला. त्याच काळात अनेक साहित्यिकांनी शासनाचे पुरस्कार नाकारले. तुलसीदासांच्या म्हणण्याप्रमाणे, 'ढोर, गवार, पशु, शूद्र नारी सब ताडन के अधिकारी' अशी अवस्था आजही आहे. माथेफिरू माणूस संविधानाची प्रत संसदेसमोर जाळतो आणि सगळा गोदी मीडिया शांत असतो. देशाचे जबाबदार प्रधानमंत्री यावर अवाक्षरही काढत नाहीत. कारण ते संघप्रणित व्यवस्थेचे गुलाम आहेत. या देशातील प्रथम नागरिक राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना २ जुलै २०१८ ला जगन्नाथपुरी मंदिरात प्रवेश नाकारला जातो. काय दर्शवितात या घटना? (कोविंद वर्णव्यवस्थेनुसार शूद्र जातीचे आहेत) इथे प्रश्न आहे तो समानतेचा, नव्हे की मंदिरातील देवाच्या पूजेचा.

ज्यांना संविधानाचा गंधही नाही, जे कधीही संविधान वाचत नाहीत, ते संविधानप्रेमी कसे होऊ शकतात? या देशाचे 'भारत' हे नाव आदराने घेतले जाते. कारण हा देश बुद्ध, महावीर, सम्राट अशोक, शिवाजी महाराज, संत तुकाराम, महात्मा फुले, शाहू महाराज, संत तुकडोजी, संत गाडगे महाराज, पेरियार रामस्वामी यांचा देश आहे. याच महामानवांनी या देशाला जगात सर्वोच्च स्थानी नेले. बुद्धाने विज्ञाननिष्ठ धम्म या देशाला दिला. बुद्धाचं तत्त्वज्ञान जगाने स्वीकारलं. मात्र, याच देशातील संरक्षणमंत्री राफेल या लढाऊ विमानाला लिंबू मिरची बांधतात. यज्ञ केल्याने देशाचे संरक्षण होते, अशी या देशातील लोकप्रतिनिधींची विज्ञाननिष्ठा? कोरोनाच्या संक्रमण काळात आरती केल्याने, दिवे लावण्याने, थाळ्या वाजविल्याने कोरोना नष्ट होतो, असे सांगणारे भारताचे प्रधानमंत्री? मेंदूचा वापर न करता अकलेचे तारे तोडतात, ते विज्ञाननिष्ठ कसे काय होऊ शकतात? विज्ञान माणसातील अंतर्गत शक्तीचा वापर करते, नवी दृष्टी देते, नवीन शोधण्याच्या दृष्टीने वाटचाल करायला शिकविते; पण इस्टेटीसाठी नरबळी देणारी उच्चशिक्षित माणसेही या देशात आहेत. एलम्मा देवीच्या यात्रेत उच्चशिक्षित माणसाची उच्चशिक्षित मुलेही देवीची विवस्त्र पूजा करतात. हीच तर आहे उत्पत्ती हिंदू राष्ट्राची.

हिंदू राष्ट्र ही संकल्पना रुजविणाऱ्या माणसाचे मेंदू कुजत आहेत. त्यातून येणारी दुर्गंधी सामान्य माणसाचे जगणेही कठीण करित आहे. एका विशिष्ठ वर्गाची, उच्चवर्णियांची सत्ता पूर्ण देशावर असावी, हा उद्देश आर.एस.एस. प्रणित लोकांचा आहे. तेव्हा संविधानप्रेमी लोकांनी हे ओळखून सावध राहणे गरजेचे आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची हत्या करणाऱ्या गोडसेचे समर्थन केले जाते. सनातन संस्थेचे लोक ज्यांनी नरेंद्र दाभोलकर, कलबुर्गी, पानसरे, गौरी लंकेश यांची हत्या केली आणि खुनी अजूनही सापडत नाहीत, हे कशाचे लक्षण आहे? ज्या संघटनेवर अनेक वर्षे बंदी होती, त्याच संघटनेच्या प्रमुखांच्या इशाऱ्यावर देश चालत असेल, तर देश भकासच होणार ना? असमानता, गुलामीला जन्म देणारी हिंदू राष्ट्र ही संकल्पना संविधानप्रेमी नागरिकांना मान्य आहे का?




**स्त्री स्वातंत्र्याची आवश्यकता**

ज्या देशात स्त्रीची देवी म्हणून पूजा होते, त्याच देशात तिची विवस्त्र धिंड काढली जाते आणि लोक ते बघत असतात. भारतमातेचा जयजयकार करणाऱ्या माणसांनो एका जीवंत आईला विवस्त्र केले जाते तरी आपण शांत बसावे, हा षंढ्पणा नव्हे काय? या देशातील शूरवीरांना, या देशातील शोषितांना न्याय द्या, त्यांचे संरक्षण करा. ओबीसी, अनुसूचित जाती जमाती, मागास भटके या देशाचे भूमिपूत्र आहेत हे विसरू नका. ज्या मनुस्मृतीने माणसा-माणसात भेद निर्माण केला, जी मनुस्मृती या देशाला विभाजित करते, अशा जाती-धर्माच्या उच्च-नीचतेच्या नावाखाली देशाला विभाजित करणाऱ्या मनुस्मृतीचं पुन्हा एकदा दहन करा. (२५ डिसेंबर १९२७ ला महाड या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती दहन केली.) शिवाजी राजेंच्या देशात असे होत असेल, तर आपण त्यांचे अनुयायी कसे म्हणता येईल? या महान देशातील शूरवीरांनो हिंदू राष्ट्र संकल्पनेला फाटा द्या आणि करा दहन मनुस्मृतीचं. देशाचं विभाजन जातीच्या, धर्माच्या नावाखाली केले जाते, त्या शक्तीचा नायनाट करा. भारताच्या स्वातंत्र्यासाठी, हा देश बलशाली करण्यासाठी अहोरात्र परिश्रम करणाऱ्या महापुरुषांचे स्मरण करा. त्यांच्या कार्यांचे स्मरण करा आणि त्यांनी आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीचं कर्तव्यनिष्ठतेने पालन करा.

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा हा महाराष्ट्र आहे. शिवाजी राजे शूद्र आहेत म्हणून त्यांचा राज्याभिषेक नाकारणारे कोण होते? त्यांचा खजिना लुटणारे कोण होते? डाव्या पायाच्या अंगठ्याने त्यांच्या कपाळावर तिलक लावणारे कोण होते? शाहू महाराजांना कुणबट म्हणणारे कोण होते? महात्मा फुलेंना मारायला मारेकरी पाठविणारे कोण होते, हे आठवा. करा इतिहासाचे स्मरण. या विनाशक प्रवृत्तीचा नायनाट करा. ही जबाबदारी या देशातील सुबुद्ध नागरिकांची, तरुणांची आहे.

**समरसता नको समता हवी!**

तरुणांनो तुम्हाला बेरोजगार कोणी केले? तुमचा शैक्षणिक, मानसिक आणि आर्थिक विकास कोणी थांबविला? तर याचे एकच उत्तर आहे. भारतीय संविधान मान्य नसणाऱ्या लोकप्रतिनिधींनी. आर.एस.एस.प्रणित मानसिकता असणाऱ्या लोकांनी. कारण त्यांना तुम्हाला गुलामीत ढकलायचे आहे. मनुस्मृती लादून वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेची श्रृंखला घट्ट करायची आहे. Smart India, Digital India ही केवळ स्वप्नं आहेत, तुम्हाला नागविण्यासाठी, संविधान विरोधात जाण्यासाठी. उच्चवर्णियांनी अनेक वर्षे शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक आरक्षणाचा लाभ घेतला. मात्र, आता तेच आरक्षणविरोधी घोषणा देतात. गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उमटवितात. कशासाठी? समरसता या गोंडस नावाखाली तुम्हाला गुलामी मान्य करायला लावणारी ही व्यवस्था अप्रत्यक्षपणे तुमचं शोषण करून तुमच्या मानगुटीवर बसली आहे. २०१८-२०१९ या वर्षांत एम.पी.एस.सी.ची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या ३४७ मुलांना शासकीय सेवेत रुजू करून घेण्यास नकार दिला. कारण ते वर्णव्यवस्थेने शूद्र आहेत म्हणून. काय दर्शवितात या घटना? काय तुम्ही गुलाम आहात या स्वतंत्र देशात? नाही ना? मग करा उद्ध्वस्त ही असमान व्यवस्था, जी तुमची वैचारिक शक्ती नष्ट करू पाहते. देवाधर्माच्या नादी लावून तुमचे शोषण होत आहे, तुमचा विकास थांबलेला आहे. त्यातच तुम्हाला गुंतवून ठेवलं आहे. मंदिरं माणसाला गुलामीकडे नेतात. वाचनालये तुम्हाला विकासाचा मार्ग दाखवितात. ठरवा तुम्हीच, कोणता मार्ग योग्य आहे? राम मंदिराच्या उभारणीसाठी करसेवेत (अयोध्या) किती आणि कोणती माणसे मारली गेली? ज्योतिषशास्त्राशी तुमचे काहीही घेणे देणे नाही. जगातले शास्त्रज्ञ भकंस ज्योतिषाच्या मागे लागत नाहीत. कारण मेंदू गुलाम ठेवण्याची ही व्यवस्था आहे. वाचा क्रांतीसूर्य महात्मा फुले यांचे ब्राह्मणांचे कसब, त्यांचे समग्र वाङ्मय. भारत देश गुलामीपासून वाचविण्याचं काम तुम्हांला करायचं आहे, उद्ध्वस्त होत असलेल्या भारताला बलशाली बनवायचं आहे, पुन्हा सर्वोच्च स्थानी विराजमान करायचं आहे. इतिहास तुमचा कृतज्ञ राहील.

हिंदू राष्ट्र संकल्पना ही शोषणव्यवस्थेचे दुसरे नाव आहे. वरवर व्यापक वाटणारी ही संकल्पना बहुजनांचे जगणे मातीमोल करणारी आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार शूद्र-अतिशूद्र, तेली, माळी, कुणबी, चांभार, सोनार, लोहार इ. अनेक अठरापगड जाती शिवाजी महाराजांच्या सैन्यात होत्या. अष्टप्रधान मंडळात बहुतांश मुस्लिम होते. धर्म आणि जातीच्या नावाखाली या देशाचे विभाजन करण्याचं काम संविधान मान्य नसणाऱ्या लोकांकडून होत आहे. बहुजन समाजाने सुज्ञ व्हावे. तुम्हाला गुलाम होणं मान्य आहे का? नाही ना! तर मग करा संरक्षण संविधानाचं, करा पुनर्निर्माण बलशाली भारत देशाचं आणि करा जयघोष सर्व मिळून 'भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत.' •••

**(लेखिका ज्येष्ठ विचारवंत आहेत.)**


# भ्रष्ट राज्यकर्ते - धनदांडगे - व्यावसायिकांना कोण आवणार?



प्रा. एच. एम. देसरडा

**आता स्वत: होऊन सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी समता व शाश्वतता (इक्विटी ॲन्ड सस्टेनेबिलिटी) या दोन मौलिक संविधानात्मक मूल्ये व निकषांच्या आधारे नैसर्गिक, वित्तीय, राजकोषीय, तंत्रज्ञान, संसाधने तसेच श्रम, मानवी कौशल्य या संसाधनांचा वापर वसुंधरा व मानवजातीच्या रक्षणासाठी, संवर्धनासाठी करण्याचे नवन्यायशास्त्र (न्यू ज्युरीसप्रुडन्स) विकसित करत गरीब-गरजूंना तत्परतेने न्याय दिला पाहिजे. २१ व्या शतकाचा हा युगधर्म असून न्यायसंस्थेने हे आव्हान जाणीवपूर्वक स्वीकारले तर स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात न्यायसंस्थेचे भरीव योगदान ठरेल.**

१५ ऑगस्ट २०२१ रोजी भारताने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांत पदार्पण केले आहे. १३८ कोटी लोकसंख्येच्या बहूभाषिक, बहूजातधर्मिय, बहूसांस्कृतिक भारताची आजची सामाजिक-आर्थिक-शैक्षणिक-आरोग्यविषयक स्थिती काय आहे? स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशाने औद्योगिकरण, शहरीकरण, विद्युतीकरण, रस्ते-रेल्वेसह दळणवळण तसेच शिक्षण, आरोग्य, निवारा या सेवासुविधांचा लक्षणीय वाढविस्तार केला आहे. जेमतेम १२ टक्के असलेली साक्षरता ८० टक्क्यांपर्यंत वाढल्याचे आकडे दर्शवतात. गत ७४ वर्षात लोकसंख्या चौपट झाली; पण अन्नधान्य उत्पादन पाचपट झाले. दूध उत्पादन तर दसपट होत २० कोटी टन झाल्यामुळे भारत हा जगातील सर्वाधिक दूध उत्पादक देश आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठी भरारी घेतली आहे.




**१०० कोटी भारतीय दैन्यावस्थेत :**

आजमितीला भारताची अर्थव्यवस्था उणीपुरी ३ अब्ज डॉलर (२२५ लाख कोटी रुपये) एवढी असून क्रयशक्ती समानतेच्या मोजमापाने ती जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे; परंतु भारताची राष्ट्र म्हणून जगाच्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये गणना होत असताना, सामान्य भारतीयांची, श्रमजीवी जनतेची अवस्था अत्यंत दयनीय आहे. तब्बल शंभर कोटी भारतीय मूलभूत गरजांच्या पूर्तीपासून वंचित आहेत. त्यांना शुद्ध हवा, पाणी, विषमुक्त सकस अन्न, आरोग्यदायी निवारा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्राथमिक आरोग्यसुविधा आणि सामाजिक सुरक्षा प्राप्त होत नाही. हे ढळढळीत वास्तव नाकारण्यात काय हशील?

शासकीय तसेच गणमान्य संशोधन संस्थांच्या अहवालानुसार, किमान ३० टक्के भारतीयांना दरदिवशी दरडोई पन्नास रुपयांपेक्षा कमी खर्चात गुजराण करावी लागते. ४० टक्के बालके कुपोषित, वाढ खुंटलेली आहेत. ७५ टक्के कुटुंबे फक्त एका खोलीच्या घरात राहतात. गोरगरिबांच्या शिक्षणाची व आरोग्याची स्थिती अत्यंत गलितगात्र आहे. मानव विकासात भारताचा १३१ वा क्रमांक याचे ठळक उदाहरण आहे. भूक निर्देशांक, हवापाण्याची शुद्धता व गुणवत्ता यात आपण जगात अगदी तळाशी आहोत. मानव अधिकारांचे हनन, लिंगभेद, धार्मिक असहिष्णुता, नागरी स्वातंत्र्याचा अभाव या बाबी नीट लक्षात घेतल्यास भारताची स्थिती नकारात्मक आहे.

तात्पर्य, उत्तरोत्तर रुंदावणारी आर्थिक विषमता, दिवसेंदिवस आक्रमक व हिंसक होत असलेला सामाजिक विसंवाद, सर्वव्यापी प्रदूषण, पर्यावरणीय-परिस्थितीकी विध्वंस या भारताच्या ज्वलंत राष्ट्रीय समस्या असून त्याचे निवारण, निराकरण व निर्मूलन करणे हे शासनसंस्थांचे संविधानात्मक दायित्त्व आहे. सबब, विधायिका, कार्यपालिका व न्यायपालिकांनी व्यापक जनहितार्थ

कार्य करण्यास सर्वोच्च अग्रक्रम असावयास हवा. किंबहुना तेच त्यांचे स्वतंत्र संस्थात्मक अस्तित्वकारण नि आद्यकर्तव्य होय. मात्र, आज वस्तुस्थिती काय आहे? केंद्र व राज्य सरकारे, नेते, अभिनेते, तंत्रशहा, नोकरशहा, व्यावसायिक, बुद्धिजीवी, पोलीस व अन्य तपास यंत्रणा, न्यायसंस्था व माध्यमजगत जनतेच्या चरितार्थ-रोजगार-उत्पन्न जगण्यामरण्याच्या समस्यांची सोडवणूक करण्याऐवजी त्यांच्या सत्ता-संपत्तीच्या खेळात मश्गुल आहेत.

**विचारा संपत्तीचा स्त्रोत अन् करा जप्त :**

हे उघड सत्य आहे, की बहुसंख्य लोकप्रतिनिधी व अधिकारी गत काही दशकांत प्रचंड मालामाल झाले आहेत. लखपती, करोडपती आता जुनी गोष्ट झाली. त्यांची घोषित (निवडणूक कायद्यातहत) संपत्ती अब्जाच्या संख्येत मोजावी लागते. दृश्य जमीनजुमला, बंगले, इमारती, सोने, हिरे, व्यापार व अन्य उद्योगधंदे हॉटेल, मद्यालये, रिसॉर्ट इत्यादी दरएक गाव-शहरात, देशपरदेशात फोफावलेली आहेत. ही सर्व बोकडकमाईची मालमत्ता आजी-माजी लोकप्रतिनिधी, अधिकारी, त्यांचे व्यापारी पार्टनर, पंटर यांच्या नावे दस्तुरखुद्द अथवा बेनामी असल्याचे सर्वज्ञात आहे. भ्रष्टाचाराच्या महाउद्योगातून जमवलेल्या मायापुंजीच्या रक्षण व वाढीसाठीच सत्ताटोळके अहोरात्र युक्त्या-क्लृप्त्या करत राहते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत लहानमोठ्या कचेरीपासून मंत्रालयाच्या सर्व मजल्यांवर समस्त यंत्रणा यातच आकंठ बुडालेली असते. जनता, लोकहित हे फक्त विधिमंडळे व संसदेतले वाक्‌प्रचार (डॉयलॉग) झाले आहेत. बकासुरांचे हे राज्य सर्व काही फस्त करत आहे. भ्रष्टाचाराचा हा राक्षस सर्व लोकशाही संस्थांना अंकित ठेऊन स्वातंत्र्य चळवळीची तमाम नीतिमूल्ये व आदर्श नेस्तनाबूत करत आहे.

ही सर्व वस्तुस्थिती नीट ध्यानी घेऊन विद्यार्थी-युवक, श्रमजीवी जनतेने अहिंसक मार्गाने याविरुद्ध शंकनाद करणे, अवैध संपत्तीचे स्त्रोत विचारणे, भ्रष्ट मंडळींना सळो की पळो करणे हाच एक संविधानात्मक उपाय-पर्याय आहे. देश व दुनिया बर्बाद करायला निघालेल्या या बकासुरांना आवर घालण्यासाठी आताच निश्चय व संघटन केले, तरच गांधी-आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत निर्माण करता येईल. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे नि अपेक्षित कर्तव्याचे पालन करणे ही खरी देशभक्ती, निसर्ग व मानवसेवा आहे. कहर म्हणजे सरंजामी खुलंखली जात-धर्म-वंशवर्चस्ववादी भांडवली व तथाकथित समाजवादी व्यवस्थेची ही बांडगुळी गोळाबेरीज आहे. निवडणुकांच्या धूर्त खेळीद्वारे कोणताही पक्ष व पक्षांची युती वा आघाडी सत्ताधीश बनली तरी केवळ गडी बदलतात, सत्ता-संपत्ती खेळ मात्र तोच जारी राहतो.

**महाराष्ट्राची अधोगती :**

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक औद्योगिकृत व शहरीकरण झालेले राज्य असून मुंबई महानगरपालिकेला आगळेवेगळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वलय आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या भारताच्या दहा टक्के आहे. मात्र, राष्ट्रीय उत्पन्नात आपल्या राज्याचा हिस्सा पंधरा टक्के आहे. अर्थात, राज्यात कमालीची आर्थिक विषमता असून कुपोषण, झोपडपट्टीत राहणारी लोकसंख्या, शेतकरी व शेतमजुरांची




**नीतिमूल्ये अन् आदर्श होताहेत नेस्तनाबूत**

भ्रष्टाचाराच्या महाउद्योगातून जमवलेल्या मायापुंजीच्या रक्षण व वाढीसाठीच सत्ताटोळके अहोरात्र युक्त्या-क्लृप्त्या करत राहते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत लहानमोठ्या कचेरीपासून मंत्रालयाच्या सर्व मजल्यांवर समस्त यंत्रणा यातच आकंठ बुडालेली असते. जनता, लोकहित हे फक्त विधिमंडळे व संसदेतले वाक्‌प्रचार झाले आहेत. बकासुरांचे हे राज्य सर्व काही फस्त करत आहे. भ्रष्टाचाराचा हा राक्षस सर्व लोकशाही संस्थांना अंकित ठेऊन स्वातंत्र्य चळवळीची तमाम नीतिमूल्ये व आदर्श नेस्तनाबूत करत आहे.

आत्महत्या यात महाराष्ट्राची संख्या व टक्केवारी सर्वाधिक असणे ही अत्यंत नामुष्कीची व शरमेची बाब आहे. कितीही अप्रिय वाटले, तरी हे कटू सत्य आहे.

महाराष्ट्रातील जमीनव्यवहार, गृहनिर्माण, सिंचन-रस्ते व अन्य प्रकल्प, बांधकामे, व्यापारी संकुलांच्या उभारणीची महाकाय बांधकामे, त्याची कंत्राटे, परवाने, परवानग्या, शासकीय निमशासकीय नोकऱ्या, बदल्या हा एक अगडबंब महाव्यवहार आहे. त्यातील भ्रष्टाचारही तेवढाच प्रचंड मोठा आहे. आता सध्या आपल्या राज्यात मंत्री व नोकरशहा, आजी-माजी राज्यकर्ते यांच्यात जो जोरदार कलगीतुरा चालला आहे, तो या हिमनगाचा दृश्य भाग आहे. केंद्र व राज्यात सध्या वेगवेगळ्या हितसंबंधांची (पक्षीय व धनिक) सरकारे असल्यामुळे दररोज नवनवीन, अधिकाधिक गंभीर घोटाळे प्रगट होत आहेत, हेही नसे थोडके! खरं तर, या सुरस व चमत्कारिक भ्रष्ट व्यव्हार व लाग्याबांध्यांची ही मालिका न संपणारी आहे. कोळशाच्या खाणीत संगमरवर शोधण्याचा हा प्रकार नाही का?

यासंदर्भात मुख्य प्रश्न हा आहे, की याचे कूळ-मूळ नक्की कोण व केव्हा शोधणार? या सर्व भ्रष्ट व्यवहारांतील मालमत्ता व माणसे देशपरदेशात पलायन करणार, की सर्व चोर बिनबोभाट तडजोड करून नवी युती व आघाडी करत जनतेला मुर्ख बनवत राहणार? विधायिका (संसद व विधिमंडळे) आणि कार्यपालिकांची सध्याची अवस्था महाभ्रष्ट पेंढाऱ्यांची प्रभावळ अशी आहे.

**न्यायसंस्थेचे विशेष दायित्त्व :**

न्यायपालिकेत काही निष्पक्ष, सुज्ञ न्यायाधीश आहेत. मात्र, ते फक्त व्यासपीठावरून 'सत्तेला सत्य सांगा' असे आवाहन जनतेला करत आहेत! त्यांच्या कक्षेतील न्यायिक अधिकारांचा निर्भयपणे वापर करण्यास ते कचरतात... अन्यथा राफेल, निवडणूक रोखे, नागरिकत्व कायदे, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण, मानव अधिकार याबाबत त्यांनी शिघ्रतेने पुढाकार घेऊन संविधानातील समता, स्वातंत्र्य, व्यापक लोकहित, रोजगार, उत्पन्न, संपत्ती व संसाधनांचे केंद्रीकरण रोखणे या संविधानाच्या मूलभूत संरचनेचे (बेसिक स्ट्रक्चर) निष्ठेने जतन केले असते. पॅगसेसप्रकरणी घेतलेल्या भूमिकेने काही आशा जाणवते... खरं तर प्रगल्भ न्यायिक सक्रियतेला भरपूर वाव व संधी आहे. आता स्वत: होऊन सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी समता व शाश्वतता (इक्विटी ॲन्ड सस्टेनेबिलिटी) या दोन मौलिक संविधानात्मक मूल्ये व निकषांच्या आधारे नैसर्गिक, वित्तीय, राजकोषीय, तंत्रज्ञान, संसाधने तसेच श्रम, मानवी कौशल्य या संसाधनांचा वापर वसुंधरा व मानवजातीच्या रक्षणासाठी, संवर्धनासाठी करण्याचे नवन्यायशास्त्र (न्यू ज्युरीसप्रुडन्स) विकसित करत गरीब-गरजूंना तत्परतेने न्याय दिला पाहिजे. २१ व्या शतकाचा हा युगधर्म असून न्यायसंस्थेने हे आव्हान जाणीवपूर्वक स्वीकारले तर स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात न्यायसंस्थेचे भरीव योगदान ठरेल. न्या. भगवती, न्या. कृष्णा अय्यर, न्या. ओ. चिन्नरप्पा रेड्डी आणि अन्य काही न्यायमूर्तींनी सत्तर व ऐंशीच्या दशकात चाकोरीबाहेर जाऊन केले, ते आता नव्या संदर्भात करणे ही काळाची गरज आहे.

**माध्यमांची भूमिका :**

माध्यमांनी विशेषत: वृत्तपत्रे व नियतकालिकांनी सरपंच, नगरसेवकांपासून मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधानांच्या तसेच औद्योगिक उत्पादने व अन्य वस्तू व सेवांच्या पानभर जाहिराती छापण्यापेक्षा जनतेचे ज्वलंत प्रश्नांवर प्रबोधन, लोकशिक्षण करण्यावर भर द्यावा. भ्रष्टाचार, अनागोंदी व अकार्यक्षम कारभाराबाबत बातम्या व भूमिका मांडण्याचे काम सध्याच्या व्यापारी गर्तेतही काही निवडक वृत्तपत्रसमूह निष्ठेने व धैर्याने करत आहेत. अर्थात, राजकारणाचे तसेच शिक्षण व्यवस्थेचे सुमारीकरण-व्यापारीकरण-विकृतीकरण झाल्यामुळे वृत्तपत्रांनी अधिक नेटाने काम केले तरच लोकशाहीव्यवस्था तग धरू शकेल. खेदाची बाब म्हणजे, बहुसंख्य माध्यमे ही विकासाच्या गोंडस नावाने नैसर्गिक संसाधनांच्या बर्बादीकडे डोळेझाक करत आहेत. हवामान अरिष्ट लक्षात घेऊन वाढविस्तारवादी विकास प्रारूपाला तत्काळ सोडचिठ्ठी देणे अत्यावश्यक आहे. वृत्तपत्र असो की अन्य माध्यमे, हा मनमानी नफेखोरीचा सुरक्षित धंदा नाही; तर ती वसुंधरा व मानवहित रक्षणसेवा आहे, हे या बड्या आसाम्यांना केव्हा कळेल नि वळेल?

**लोकशक्तीचा आसूड :**

शेवटी जो काही वांछीत बदल हवा आहे तो लोकशक्तीद्वारेच घडू शकेल. त्यासाठी आवश्यक ते जाणीवजागृतीचे काम समाजधुरीण व सार्वजनिक विचारवंत यांच्या पुढाकाराने गतिमान होऊ शकेल. विद्यार्थी-शिक्षक-सामाजिक कार्यकर्त्यांनी आपापल्या गाव, मोहल्ला, सामाजिक व सार्वजनिक कार्यक्षेत्रात 'वसुंधरा बचाव, मानव बचाव' अभियान राबवले पाहिजे. रस्तोरस्ती भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन करणे हाच अहिंसक मार्ग आहे.




**व्यवस्था परिवर्तनाचा संकल्प हवा**

आज देशात इमानदार पुढाऱ्यांऐवजी पेंढाऱ्यांचा, मस्तवाल धनदांडग्यांचा, भ्रष्ट नोकरशाही, भाडोत्री व्यावसायिक व पोटभरू विद्वजनांचा सुळसुळाट असल्यामुळे मरगळ झटकून जनतेने केवळ सत्ता नव्हे तर व्यवस्था परिवर्तनाचा संकल्प करणे, हाच एक पर्याय आहे.

गुटखा, मद्य, अमली पदार्थ, बकासुरी उपभोग, चैनचंगळवाद याविरुद्ध कृती करून हवामान अरिष्टावर मात करण्यासाठी पर्यावरणस्नेही जीवनशैली व निसर्गाविषयीचा पूज्यभाव वृद्धींगत करण्यास व्यक्तिगत व सामाजिक जीवनात सर्वोच्च अग्रक्रम दिला, तरच आज जी नैसर्गिक संसाधने शिल्लक आहेत त्याचा विनियोग आजच्या व येणाऱ्या पिढ्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी करता येईल. खरं तर, हे सर्व दायित्त्व देशाचे नेते, धोरणकर्ते, प्रशासनयंत्रणा, शिक्षणसंस्था, न्यायसंस्था यांचे आहे. मात्र, आज देशात इमानदार पुढाऱ्यांऐवजी पेंढाऱ्यांचा, मस्तवाल धनदांडग्यांचा, भ्रष्ट नोकरशाही, भाडोत्री व्यावसायिक व पोटभरू विद्वजनांचा सुळसुळाट असल्यामुळे मरगळ झटकून जनतेने केवळ सत्ता नव्हे तर व्यवस्था परिवर्तनाचा संकल्प करणे, हाच एक पर्याय आहे.


**(लेखक विख्यात अर्थतज्ज्ञ व महाराष्ट्र महात्मा गांधी मिशन विद्यापीठात सुप्रसिद्ध प्राध्यापक असून महाराष्ट्र नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत)**

# पृथ्वी आणि माणूस



सुधीर फाकटकर

**माणसाचा 'क्षमाशीलता' हा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म आहे. हा गुणधर्म अन्य प्राण्यांमध्ये आढळत नाही. तसेच 'कृतज्ञता' हेही एक महत्त्वाचे गुणवैशिष्ट्य सांगितले जाते. नेहमीच्या परिस्थितीत किंवा संकटमय काळात दुसऱ्या माणसाने केलेल्या मदतीबद्दल त्याच्याविषयी आदरभाव बाळगत कृतज्ञ राहणे हा माणसाचा खास स्वभावधर्म आहे.**

एकविसाव्या शतकातून पुढची वाटचाल करत असताना, तुम्हा-आम्हाला आता केवळ स्वतःपुरता म्हणजे; कुटुंब-सोसायटी-गल्ली-गाव-प्रभाग-तालुका-शहर ते राज्य किंवा देशापुरता विचार न करता थेट पृथ्वीवासीय म्हणून व्यापकता वाढवावी लागेल. याचं एकमेव कारण म्हणजे आमुलाग्र बदल घडवलेल्या विज्ञान-तंत्रज्ञानाने सगळं जग एक केलय.



सर्वप्रथम आपल्या पृथ्वीबद्दलच जाणून घेऊ या. आजपर्यंत संशोधन झालेल्या विज्ञानानुसार, सुमारे ४५० ते ४६० कोटी वर्षांपूर्वी महाकाय व्यासाचा म्हणजे साधारण २,४०० कोटी किलोमीटर गोलाकार धुळीचा गोल खगोलीय अवकाशात स्वतःभोवती फिरायला लागला. हा धुळीचा गोल म्हणजे मुख्यत्वे हायड्रोजन मूलद्रव्य असलेला प्रचंड महाकाय असा ढग होता. या ढगाच्या फिरण्यातून त्यातील कण एकत्र यायला तसेच आकुंचन पावायला लागले. यातल्याच ९९.९ टक्के वस्तूमानाचा सूर्य तयार झाला आणि उर्वरित वस्तूमानाच्या द्रव्यातून अन्य गोलाकार व इतर घटक आकाराला येत गेले. आपली पृथ्वी त्यातलीच एक!

पृथ्वी आकाराला येत असताना साधारण ४४० कोटी वर्षांपूर्वी मंगळाच्या आकाराची एक वस्तू पृथ्वीवर येऊन आदळली. त्यातून पृथ्वीचा एक टवका उडाला आणि त्या द्रव्यापासून चंद्र निर्माण झाला. पृथ्वीचे तापमान पुन्हा वाढले.

पुढे पृथ्वी थंड होत होत, पृथ्वीचा वरचा भाग म्हणजे भूपृष्ठ तयार झाले. यादरम्यान हायड्रोजन, हेलियम अशी उर्वरित हलकी मूलद्रव्ये भूपृष्ठाभोवती वातावरणाच्या स्वरुपात वेढून राहिली. अर्थात, ते वातावरण आजच्यापेक्षा खूपच वेगळं होतं. त्यापुढेही कित्येक कोटी वर्षे पृथ्वीवर धुमकेतू, लघुग्रह आदळत होते. त्यानंतर सतत पाऊस, पावसाच्या वाफेचे ढग, पुन्हा पाऊस अशा चक्रांमधून जलसंचय होत समुद्र आकाराला आले. या समुद्रांच्या पाण्यामध्ये तापमान, हवेचा दाब, हवेतील आणि पाण्यातील वायू, खनिजं आणि रसायनांच्या एकमेकांवरील परिणाम-प्रक्रियेतून पहिला जीव निर्माण झाला. ही २०० ते २५० कोटी वर्षांपूर्वीची घटना आहे. अर्थात, यानंतर उत्क्रांतीच्या असंख्य पायऱ्या पार पडत त्या जीवातून जलचर, भूचर, उभयचर असे प्राणी आकाराला येत गेले. या उत्क्रांती नाट्याच्या शेवटच्या अंकातील शेवटच्या प्रवेशात त्या प्राण्यांपैकी एका प्राण्याच्या उत्क्रांतीतून आजचे तुम्ही-आम्ही साकारलो आहोत. तो प्राणी म्हणजे कोण हे सांगायची आवश्यकता नसावी!

अर्थात, आजच्या स्थितीतील तुमचं-आमचं साकारणं सहज घडलेलं नाही. पृथ्वीच्या आयुष्याच्या हिशेबाने, अलीकडे म्हणजे २० कोटी वर्षांपूर्वी आदिमानव आकाराला येण्याची प्रक्रिया सुरू झाली. आदिमानव म्हणजे मागील पायांवर उभे राहून दूरवर पाहू शकणारा, हसू शकणारा, एक चतुष्पाद सस्तन प्राणी! साधारण चौदा ते पंधरा लाख वर्षांपूर्वी आदिमानवांमधून आधुनिक किंवा बुद्धीमान मानव (होमो सेपियन) निर्माण झाला. याचं जन्मस्थान आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याजवळील गवताळ प्रदेशातील सांगितलं जातं. इथून त्याचा जगभर संचार होत गेला. आजच्या आधुनिक स्थितीला येण्यासाठी आपल्या आद्यपूर्वजांकरिता अजून कित्येक सहस्त्रकांचा कालावधी लोटायचा होता.

सुमारे दीड लाख वर्षांपूर्वी आपल्या पूर्वजांना अग्नीचे ज्ञान झाले. ही घटना योगायोगाने किंवा अनपेक्षितपणे जाणून घेण्यातून घडली. यामुळे मानव कृत्रिमरित्या अग्नी निर्माण करण्यास तसेच अग्नीचे नियंत्रण करण्यास शिकला. यातून तो मांस भाजून खाऊ लागला. या कालावधीपर्यंत मानव शिकार करत आणि कच्चे मांस खात भटकत होता. यानंतरही मोठ्ठा कालखंड गेला. साधारण ३५ हजार वर्षांपूर्वी त्याला अंगाभोवती संरक्षणासाठी काहीतरी गुंडाळण्याचे ज्ञान झाले. यातून तो मृत प्राण्यांची कातडी अंगाभोवती गुंडाळू लागला. १८ हजार वर्षांपूर्वी मानवाला हाडांच्या सुया करून शिवण्याचे ज्ञान प्राप्त झाले. मग तो मासे पकडू लागला. विविध प्रकारची दगडी हत्यारे शोधली गेली ती याच कालखंडात. या पाषाण युगातून पुढे-पुढे ताम्र, लोह, कास्य अशा काही युगांची स्थित्यंतरं होत गेली आणि माणूस एक-एक पायरी समृद्धतेकडे चालू लागला.

आजच्या कालखंडाचा संदर्भ घेता, साधारण ८ हजार वर्षांपूर्वी मानव शेती करू लागला. मग त्याचं अन्नाच्या शोधात भटकणं थांबलं

आणि तो एकाच जागी स्थिरावू लागला. त्याने घरे बांधली. यातून मग हळूहळू मानवी संस्कृती आकाराला येत विकसित होत गेली. मानवी संस्कृती बहरली आणि लयासही गेली. पृथ्वीतलावर उदयास आलेल्या, बहरलेल्या आणि लयासही गेलेल्या मानवी संस्कृतींची एकूण संख्या तब्बल ४,३०० पर्यंत असल्याचे अभ्यासक सांगतात. (आता बोला!)

मानवी संस्कृती विकसित होत असताना निसर्गातील घटितांमागील विज्ञानाचे आकलन होऊ लागले. या आकलनाच्या जोरावर माणूस निसर्गनियम जाणून घेत तंत्रज्ञान विकसित करू लागला आणि दिवसेंदिवस माणसाची वाटचाल आश्वासक होऊ लागली. या प्राचीन-अर्वाचीन काळाच्या मोजपट्टीवर आधुनिक विज्ञान, औद्योगिक क्रांती, महायुद्ध, उद्योग-व्यवसाय, दळणवळण, अवकाशशास्त्र आणि संगणक हे सगळं-सगळं अगदी अलीकडचं, मागच्या काही शतकातलं. तर आदिमानवाचा माणूस झाला तो असा!

मग यथावकाश पुढे जाता जाता मानवी संस्कृतीचा विकास होत असतानाच माणसांकडून मग देव, धर्म, पंथ, संप्रदाय इत्यादींचीही निर्मिती झाली.

सजीवांच्या सृष्टीत आणि प्राणीजगतात माणसाचे स्थान एकमेवाद्वितीय असेच आहे. अन्य प्राण्यांशी त्याचे अनेक बाबतीत साम्य असले, तरीही तो अनेक अंशी त्यांच्यापेक्षा भिन्न-वेगळा आहे. माणसाचं विशेष वैशिष्ट्य त्याच्या वागण्यात, आचार-विचारांमध्ये जाणवते. महत्त्वाचे म्हणजे, माणूस अक्षरे आणि शब्द निर्माण करून बोलू शकतो. या बोलण्यातून त्याने भाषा निर्माण केल्या. असंख्य भाषांसाठी लिहिण्याची माध्यमे म्हणजे लिपी जन्माला घातल्या. सभोवतालचा निसर्ग-घटना त्याने चित्रात मांडल्या. माणसाने तो वास्तव्य करत असलेल्या वातावरणाला साजेशी आणि अनुकूल अशी निवाऱ्याची व्यवस्था निर्माण केली.

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता होत असतानाच माणूस मोजमापन शिकला. त्यातून कालमापन साध्य करत हवामानाची नियमितता जाणून घेतली. याचा फायदा प्रथम शेतीसाठी झाला. शेतीच्या जोडीला पशूपालन आले. अन्य प्राण्यांच्या मदतीने दळणवळण अधिक सुलभ झाले. माणूस पाण्यावर स्वार झाला आणि त्याने हवेतही झेप घेतली ते वेगळेच. तर दळणवळणातून देवघेव सुरू झाली. यातून माणूस जगभरातल्या दुसऱ्या माणसांशी संबंधित झाला. यातून अन्नधान्य, खाद्यपदार्थ आणि अन्य वस्तूंचा व्यापारविनिमय वाढीस लागला. याच्या बरोबरीने मूलभूत गरजांच्या घटकांपासून दैनंदिन व्यवहारांसाठी साधने-यंत्रे, संपर्क-संदेशांची उपकरणे निर्माण केली आहेत.

माणसाने कितीतरी कला निर्माण केल्यात. आपल्या आवाजाची किमया साधत तो गायन करतो. काही अन्य सजीव गातात; पण माणसाएवढे प्राविण्य त्यांच्यात नाही. शिवाय माणसाने गायनाच्या जोडीला वाद्ये निर्माण केली. ही सगळी कमाल ठरत गेली त्याच्या चिकित्सक स्वभाव आणि बुद्धीमत्तेची, विकसित होत गेलेल्या तंत्रविज्ञानाची तसेच माणसाच्या परिश्रम आणि चिकाटीची.

माणसाचा 'क्षमाशीलता' हा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म आहे. हा गुणधर्म अन्य प्राण्यांमध्ये आढळत नाही. तसेच 'कृतज्ञता' हेही एक महत्त्वाचे गुणवैशिष्ट्य सांगितले जाते. नेहमीच्या परिस्थितीत किंवा संकटमय काळात दुसऱ्या माणसाने केलेल्या मदतीबद्दल त्याच्याविषयी आदरभाव बाळगत कृतज्ञ राहणे हा माणसाचा खास स्वभावधर्म आहे. माणूस हसतो, पृथ्वीवर हसण्याचे अद्वितीय गुणवैशिष्ट्य असलेला केवळ माणूस आहे.

असा हा माणूस. त्याचा पूर्वज काही कोटी वर्षांपूर्वी कळत नकळत दोन पायांवर उभा राहिला, यातून त्याला दूरचे दिसू लागले आणि त्याचा आजच्या स्थितीला येण्यासाठी प्रवास सुरू झाला. हा प्रवास सहजसोपा नव्हताच मुळी. निसर्ग सृष्टीतील असंख्य आव्हाने आणि संकटांना तोंड देत देत तो इथपर्यंत आलाय आणि पुढेही चाललाय. या मजल दरमजलीच्या वाटचालीत माणसाने जाणून घेतलेल्या, विकसित केलेल्या एकेका मुद्याचा सखोलात विचार करत गेलो तर थक्क व्हायला होतं. तसा माणूस इतर प्राण्यांच्या तुलनेत अतिशय दुबळा. ना त्याला वेगाने पळता येतं, ना अवजड वजन उचलता येतं, ना हवेत उडता येतं. शिवाय हिंस्त्र, विषारी प्राण्यांसमोर तर तो एकदम असहाय्य; पण त्याने या सगळ्यांवर मात केली आणि तो कणभर तरी श्रेष्ठ ठरलाच. नैसर्गिक आपत्तींनाही तो सक्षमपणे तोंड देतोय.

जनन आणि पालनपोषण ही जीवनपरंपरा अखंड ठेवणारी मूलभूत साधने प्रत्येक प्राणीमात्र वापरतो. अनुवंशिक अंतःप्रेरणा प्रत्येक सजीवात नकळत स्वाभाविक आणि सहज दिसून येते. तथापि, बुद्धी, विचार, चिकित्सा, कार्यकारणमीमांसा यांचे स्थान माणसात उच्चस्थानी आहे. अन्य प्राणीमात्रांमध्ये समूहजीवन असले तरी समाजजीवन नाही. समाजजीवनाची उभारणी, विस्तार हे माणसाचे कर्तृत्व आहे. सभोवतालचा निसर्ग जगण्यासाठी कसा वापरावा तसेच निसर्गापासून मिळणारे फायदे सर्वांसाठी कसे मिळवावेत या विचारांचा आरंभ झाला, तीच मानवी संस्कृतीची सुरुवात झाली.

मानवी संस्कृतीच्या अनुषंगाने 'विवाह' हे एक उदाहरण घेतल्यास पृथ्वीतलावरील सजीवांमधील माणसाच्या वैचारिक प्रगल्भतेचा दाखला दिसेल. याखेरीज न्याय, समानता, कायदे किंवा नियम अशीही इतर उदाहरणे आहेत. निसर्ग-सृष्टीत हंस किंवा गरूड वर्गातील काही पक्षी वैवाहिक जीवनसदृश्य एकत्र आयुष्य व्यतीत करतात किंवा काही माकडे अथवा रानकुत्र्यांच्या समूहजीवनात काही नियम-कायदे आढळतात. माणूस वगळता इतर सजीवांसंदर्भात ही अपवादात्मक उदाहरणे असली तरी त्यांचा विस्तार खूपच कमी आहे. संस्कृती-समाजजीवनात माणूस परमोच्च स्थानी आहे!

माणसाच्या कर्तृत्वाची एकेक पायरी जाणून घ्यायची ठरल्यास, एका आयुष्याचा कालावधी अपुरा पडावा एवढी ही अलौकीक कामगिरी आहे. कधी काळी अगदी साधे तंत्र विकसित करताना माणूस कसा झगडला आणि आजच्या युगात येताना त्याच तंत्राला त्याने किती सुलभ आणि अद्ययावत केले आहे, याचा आढावा विस्मयजनक आहे. मग याच अनुषंगाने अग्नीनियंत्रण, हत्यारे, चाक, वस्त्र वापरणे, निवारा या प्रारंभीच्या गरजांपासून, कालमापन, शेती, आरोग्य, गणित, धातू, भाषा, विज्ञान-तंत्रविज्ञान, दळणवळण, संदेशवहन, कृत्रिम पदार्थ, इंधन अशा अनेक मुद्यांची चर्चा आपण करू या पुढील लेखापासून...

●●●

**(लेखक विज्ञान विषयाचे अभ्यासक आहेत.)**

# विद्यापीठ नामांतर आणि पँथर



ॲड. मिलिंद सर्पे

**कोणत्याही चळवळीला चढ-उतार असतातच. आमचे काम हे चळवळीच्या चढावरील काम होते. कोणत्याही चळवळीचा पाया रचणे फारच अवघड असते; परंतु त्यावर इमारत बांधणे सोपे असते. आम्हाला अभिमान व गर्व आहे, की फुले-आंबेडकरी चळवळीच्या पायाचे दगड म्हणून आम्ही काम केले व आजही जमेल तसे व जमेल त्या पद्धतीने काम करीत आहोत. नामांतराचा लढा हा आमच्यासाठी स्वाभिमान शिकवणारा होता.**

दलित पँथरची स्थापना जरी १९७२ ची असली तरी आमच्या किनवटला पोहचली ती १९७४ साली. शहरातील हनुमान मंदिराला लागूनच आमची गल्ली आहे. जी पूर्वी ईनकर गल्ली म्हणून ओळखली जायची. गावातील सर्वजण आम्हाला ईनकरोलू म्हणायचे. नंतरच्या काळात भीमजयंती आमच्या गल्लीत साजरी करण्यात येऊ लागली. त्यानंतर मात्र आमची गल्ली बौद्धवाडा, म्हणून ओळखली जाऊ लागली. किनवटला रेल्वे कर्मचारी असलेले बळखंडे हे रेल्वे कर्मचाऱ्यांना एकत्र करून भीमजयंती साजरी करत असत. यामुळे त्यांच्या प्रेरणेने आमच्या गल्लीतही छोट्या प्रमाणात का होईना भीमजयंती साजरी होऊ लागली. माझ्या आठवणीप्रमाणे तो काळही १९७० नंतरचाच. त्या काळात आमच्या वार्डाचे नगरसेवक होते भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पुंडलिक कावळे. त्यांना सर्व मेंबर कुंडलिक म्हणूनच ओळखायचे. दुसरे एक कम्युनिस्ट पक्षाचे कट्टर कार्यकर्ते होते गंगाराम दगडू भरणे. त्यानंतर पुंडलिक कावळे यांचे छोटे भाऊ वामन कावळे हेही सुरुवातीच्या काळात कार्यकर्तेच होते. त्यांच्या पुढाकाराने गल्लीत भीमजयंतीची सुरुवात झाली.

१९७४-७५ साली बळीराम पाटील महाविद्यालयात समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून पी. एस. धन्वे हे रुजू झाले. ते आमच्या गल्लीतच राहायला आले. त्यांनी नियोजित बुद्ध विहाराजवळील रामा कावळे यांची रुम भाड्याने घेतली. त्यांच्या आधी पोस्ट ऑफिसमध्ये असलेले पी. जी. गायकवाड हे कर्मचारी आमच्या गल्लीत माझ्या घरासमोरच्या रामा कावळे यांच्या रूममध्ये किरायाने राहायला आले. त्यांच्यासोबत त्यांचा लहान भाऊ सुरेश गायकवाड हेही राहत असत. धन्वे व गायकवाड हे आमच्या गल्लीत राहायला आल्यापासून आमच्या गल्लीचे वातावरण पार बदलून गेले. आमच्या गल्लीत महाराष्ट्रातील दलितांची परिस्थिती व भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या कार्याची चर्चा मोठ्या प्रमाणात होऊ लागली. मी ४ थी, ५ वीत असूनही मला बऱ्यापैकी समज असल्याने मी या चर्चा अगदी मन लावून ऐकत असे.

याच काळात एक घटना घडली. पुढे चालून ती पँथर स्थापनेचे निमित्त ठरली. कॉस्मापॉलिटन विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.जे. कांबळे यांना संस्था पदाधिकाऱ्यांनी कामावरून कमी केले होते. त्यांना कामावर घ्यावे म्हणून त्यावेळी दादाराव कयापाक व रामराव भरणे यांनी उपोषण केले होते. परिस्थिती वाईटच होती. येणाऱ्या काळात दलितांवरील अन्याय, अत्याचाराला तोंड देण्यासाठी प्रा. धन्वे यांनी 'दलित पँथर'ची स्थापना करण्यास सांगीतले. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली नियोजित बुद्ध विहाराच्या जागेवर रात्री एक बैठक झाली व त्यात 'दलित पँथर'ची स्थापना करण्यात आली. या बैठकीला मोजकेच; पण अत्यंत निष्ठावान व जिवाला जिव देणारे कार्यकर्ते उपस्थित होते. हे वर्ष होते १९७६ चे. अध्यक्ष म्हणून दादाराव कयापाक एकमताने निवड झाली. या बैठकीस माझ्या आठवणीप्रमाणे कॉस्मापॉलिटन विद्यालयाचे कर्मचारी डी.टी. कदम, दादाराव कयापाक, सुखदेव मुनेश्वर, मनोहर भगत, जी.एस. रायबोळे, रामराव भरणे, माधव कावळे, यादव नगारे, नितिन कावळे, रघुनाथ कावळे, लक्ष्मण कांबळे, प्रकाश नगराळे, मी (मिलिंद सर्पे), माझे बाल मित्र प्रकाश पाटील व कहीजण उपस्थित होतो.

१९७६ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणिबाणी जाहीर केली. यानंतर 'दलित पँथर'चे तत्कालीन नेते राजा ढाले यांनी पँथर बरखास्त केल्याचे जाहीर केले व 'मास मुव्हमेंट' या संघटनेची स्थापना केली. याच काळात आमच्या तालुका नेतृत्वानेही कोठारी (चि.) येथे मास मुव्हमेंटची पहीली शाखा काढली व तिचे अध्यक्षपद हरिप्रसाद सर्पे यांना दिले; परंतु नंतरच्या काही घडामोडीनंतर आम्ही एस.एम. प्रधान, गंगाधर गाडे व प्रा.अरुण कांबळे यांच्या दलित पँथरमध्येच काम करू लागलो. १९७८ मध्ये सुरेश गायकवाड हे बळीराम पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थी संसदेचे सचिव म्हणून बिनविरोध निवडून आले होते, तर दुसऱ्या वर्षी ते विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष झाले. यामुळे महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी हे 'दलित पँथर'मध्ये सहभागी झाले होते.

पुढे चालून २७ जुलै १९७८ साली नामांतराचा ठराव विधिमंडळात पारित झाला; परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. नामांतराच्या सर्वच लढाईत किनवट तालुका 'दलित पँथर' अग्रभागी होती. याबरोबरच तालुक्यातील दलितांचे रक्षण करण्यातही 'पँथर' अग्रभागी होती. या काळातील एक खंत आम्हाला नेहमीच सतावते ती म्हणजे, आमचे मार्गदर्शक प्रा.पी.एस. धन्वे यांना ऐन नामांतर

विरोधी चळवळीत संस्थेने फुले-आंबेडकरी चळवळीचा विचारवंत आहे म्हणून कामावरून कमी केले. आम्ही 'पँथर'नी त्यांना कामावर घेण्यात यावे, यासाठी आंदोलन केले; परंतु त्यात आम्हाला यश आले नाही; पण म्हणतात ना जे काही होते ते चांगल्यासाठीच होते. प्रा.धन्वे हे एल.एल.बी. करून होते. त्यांनी किनवटला वकिली सुरू केली. त्यांना चांगलेच यश आले. पुढे चालून ते वकिली व्यवसाय करण्यासाठी नांदेडला गेले. तेथेही त्यांना अपार यश आले. नंतर ते औरंगाबादला गेले तेथेही त्यांनी व्यवसायात चांगलाच जम बसविला. पुढे चालून ते ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारिपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष झाले, तर निलम गोरे या प्रदेश सरचिटणीस झाल्या. या दोघांनी त्या काळात संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला होता.

त्या काळातील एक-एक घटना सांगितल्या तर त्याचा एक प्रेरणादायी इतिहास होईल. कोणत्याही चळवळीला चढ-उतार असतातच. आमचे काम हे चळवळीच्या चढावरील काम होते. कोणत्याही चळवळीचा पाया रचणे फारच अवघड असते; परंतु त्यावर इमारत बांधणे सोपे असते. आम्हाला अभिमान व गर्व आहे, की फुले-आंबेडकरी चळवळीच्या पायाचे दगड म्हणून आम्ही काम केले व आजही जमेल तसे व जमेल त्या पद्धतीने काम करीत आहोत. नामांतराचा लढा हा आमच्यासाठी स्वाभिमान शिकवणारा होता. आता कार्यकर्ते तयार होताना दिसत नाहीत. दीड दमडिच्या लोभापायी समाजाला विकणारे कार्यकर्ते गावोगावी तयार झाले आहेत, ही आमची खंत आहे, तेही नामांतर दिनानिमित्त... यावर येत्या काळात काही विचार होईल काय?.... •••

**(लेखक पँथरमधील सक्रिय कार्यकर्ते आहेत.)**

# राज्यपालांच्या गडबडी

**प्रतिनिधी**

देशात भाजप सुडाचे राजकारण करत आहे, हे लपून राहिलेलं नाही. सत्ता मिळवणे आणि त्यासाठी जे जे शक्य आहे, त्या त्या मार्गाने विरोधकांना संपवणे, ही भाजपच्या राष्ट्रीय राजकारणाची निती असल्याचे देशाच्या लक्षात आले आहे. कर्नाटक, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या राज्यांत भाजपने किती गलिच्छ राजकारण करून ईडी, सीबीआय, सीआडी या स्वायत्त संस्थांचा प्रचंड गैरवापर करत विरोधकांना सळो की पळो करून सोडले, हे देशाने पाहिले आहे. जिथे जिथे भाजपला सर्व साधनांचा, सत्तेचा, सरकारी यंत्रणांचा हवा तेवढा वापर करून राज्य काबीज करता आले नाही, त्या त्या ठिकाणी भाजपने केंद्रात असलेल्या बहुमताच्या बळावर राज्यपालांच्या नियुक्त्या करून आपलं उपद्रवी मूल्य सिद्ध केलं आहे. कधी नव्हे ते पहिल्यांदाच महाराष्ट्राला राज्यपालाच्या अविवेकी अधिकाराचे प्रदर्शन भगतसिंग कोश्यारींनी करून दिले. छत्रपती शिवरायांची बदनामी करत महाराष्ट्राविषयीचा द्वेषही जगजाहिर केला. महाविकास आघाडीच्या सरकारला रोज राजभवनाची आठवण करून दिली. तेच कोश्यारी भाजपची सत्ता आल्याबरोबर हरवल्यागत झाले आहेत. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश, नागालँड, बिहार इत्यादी बिगर भाजप राज्यात भाजपनियुक्त राज्यपालांनी आपल्या अधिकाराची सरकारला रोज जाणिव करून दिली आहे. जो राज्यपाल अधिक आक्रमकपणे भाजप विरोधकांना अंगावर घेईल, त्यांना जगदीप धनकड यांच्यासारखी पदोन्नती मिळेल, असा संदेशही दिला आहे. ममता बॅनर्जींच्या सत्तेला थेट आवाहन देऊन जगदीप धनकड यांनी ज्या पद्धतीने आपले उपद्रवी मूल्य सिद्ध केले, तसेच काहीसे करण्याची स्पर्धाच इतर बिगरभाजप राज्यात राज्यपालांनी चालवली आहे. उत्तर भारतात विशेषतः तामिळनाडूमध्ये द्रविडी राजकारणात अण्णा दुराई, पेरियार ई.व्ही रामसामी, के. कामराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यांदी महापुरुषांना विशेष महत्त्व आहे. त्यांच्या विचारांवर चालणाऱ्यांची



राज्यपाल भगतसिंग कोशारी



राज्यपाल रवींद्र नारायण रवि


संख्या सर्वाधिक आहे. धर्म, जात, परंपरा, अंधश्रद्धा याला झुगारून या नेत्यांनी संपूर्ण आयुष्य समाज उद्धारकाचे काम केले आहे. त्या समाज उद्धारकांना तामिळनाडूत राज्यपाल रवींद्र नारायण रवि यांनी आपल्या अभिभाषणात काडीचेही स्थान न देता, त्यांना वगळून ज्या पद्धतीने सभात्याग करत एका नव्या वादाला तोंड फोडले ते मोठ्या षड्यंत्राचा भाग असावे. बिगरभाजप राज्यात राज्यपाल रोज तिथे निवडून आलेल्या सरकारला आपले महत्त्व अधोरेखित करण्यासाठी व भाजपला सत्ता सोपानाचा मार्ग सुकर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करताना दिसत आहेत. राज्यपाल हे पद घटनात्मक असून त्याची रोज पायमल्ली राज्यपालच करत आहेत. यावर नैतिकतेचे धडे देणारी भाजप किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी मात्र सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात. मतांच्या राजकारणासाठी हवे तेव्हा महापुरुषांच्या नावांचा गौरव करणे आणि हवे तेव्हा त्याच महापुरुषांच्या विचारांना तिलांजली देणे, त्यासाठी सर्व सरकारी यंत्रणांचा वापर करणे भाजपच्या रक्तात मुरले आहे. हे वेगळे सांगण्याची गरज नसावी. •••



नागसेन बागडे

# बौद्ध संस्कृतीचा परिचय देणारा ग्रंथ

आपण सर्व तथागत बुद्धांना ओळखतो. नव्हे सर्व जगंच ओळखतं. भारताच्या प्राचीन इतिहासाचे अवलोकन केल्यास संपूर्ण भारतीय उपमहाद्वीप बौद्धमय होता, असे आपणास पहावयास मिळते. संपूर्ण उपमहाद्वीपातील बौद्ध धर्म स्वत:च्या जन्मस्थळातच लोप पावला व मध्ययुगीन काळानंतर त्याच्या खाणाखुणासुद्धा नष्ट करण्यात आल्या. आज आपण सर्वत्र बौद्ध धर्माचा प्रचार-प्रसार होताना बघत आहोत. मात्र, लोप पावलेल्या या धर्माचे पुनरुज्जीवन कसे झाले? याचा इतिहास बघणेदेखील मोठे रंजक ठरेल.




युरोपमधील पुनर्जागरण (Renaissance) नंतर त्या लोकांनी जगभर आपले राज्य पसरवण्यास सुरुवात केली. अगदी श्रमिकांपासून ते विद्वान, इंजिनिअर, अभ्यासक, धर्मगुरु ते सैनिकांपर्यंत हे लोक जगाच्या कानाकोपऱ्यात पसरले. पुनर्जागरण (Renaissance) आणि औद्योगिक क्रांतीसोबत मिळालेली चिकीत्सा करण्याची कला या बहुमूल्य भेटीने यापैकी काहींना ज्या ज्या देशात किंवा प्रांतात ते गेले, तेथील इतिहास, संस्कृती इत्यादींचा अभ्यास करण्यास प्रवृत्त केले. त्यापैकी काहींचे लक्ष लोप पावलेल्या बौद्ध धर्माच्या अभ्यासाकडे गेले आणि एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत गौतम बुद्ध हे एक हाडामांसाचे व्यक्ती होते, हे निश्चित करण्यात आले. त्यापूर्वी बुद्धाला एक मिथकीय स्वरुप प्राप्त होते. यासोबतच हिंदु धर्माने त्यांना विष्णुचा नववा अवतार म्हणून जनमाणसाच्या स्मृतित ठसवले होते. भगवान बुद्ध हे ऐतिहासिक पुरुष होते, हे निश्चित झाल्यावर त्यावर अभ्यास करण्याची प्रचंड चढाओढ निर्माण झाली. यात ब्रिटीश, फ्रेंच, जर्मन व इटालियन लोकांचा जास्त भरणा होता. या देशातील विद्वानांनी भारतास भेटी दिल्या, भ्रमण केले व अपार कष्ट उपसून या ज्ञानशाखेचा विस्तार केला. आपण या लोकांना यासाठीच धन्यवाद देणे पर्याप्त नसून त्यांनी आपणास वैज्ञानिक अभ्यासपद्धतीचीदेखील ओळख करुन दिलेली आहे, यासाठीही त्यांचे आपण कृतज्ञ असले पाहिजे.

भारतात बौद्ध धर्माचा अभ्यास सुरू झाल्यावर त्याचा आधुनिक काळात जगभर प्रचार-प्रसार करण्याचे श्रेयदेखील याच युरोपियन/अमेरिकन लोकांना जातं. यासाठी सुरुवातीच्या काळातील एका प्रभावशाली व्यक्तीची मदत झाली. त्याचं नाव होतं सर एडवीन अर्नाल्ड.

अर्नाल्ड जमीनदार कुटूंबातून आलेले होते. ऑक्सफोर्डमधून शिक्षण घेतलेल्या अर्नाल्ड यांनी पुणे येथे नोकरी केली. त्याच दरम्यान त्यांना भारतीय इतिहास, तत्त्वज्ञान, धर्म यांचा अभ्यास करण्याची संधी प्राप्त झाली व त्यांनी १८७९ मध्ये प्रथम भगवान बुद्धांच्या जीवनावर दीर्घ काव्य लिहीलं. त्याचं नाव होतं 'The Light of Asia'. या चरित्रानं स्वामी विवेकानंदांपासून ते लिओ टॉलस्टॉयपर्यंत अनेक दिग्गजांवर खोलवर प्रभाव टाकला. या भगवान बुद्धाच्या अत्यंत प्रभावशाली चरित्रास युरोप-अमेरिकेतील लोकांपर्यंत पोचविण्यास मदत करणाऱ्या कवितेवर अत्यंत संशोधनात्मक व प्रचंड मेहनत घेवून विस्तृत व विवेचनात्मक ग्रंथ जयराम रमेश यांनी लिहीलेला आहे. जयराम रमेश केंद्रीय मंत्री होते व त्यांची कारकीर्द पर्यावरण मंत्री म्हणून खूप गाजली होती. काँग्रेसचा वरिष्ठ नेता असलेल्या या माणसाचे अप्रतिम ग्रंथ लिहील्याबद्दल कुणीही कौतुक केल्याशिवाय राहणार नाही. राजकारणी म्हटला, की फार कमी अभ्यास असलेला व्यक्ती असा आजकालचा समज आहे. मात्र, शशी थरूर वा जयराम रमेश यांसारखे राजकारणी या समजास अपवाद आहेत. शशी थरूर यांचे ग्रंथ वाचले, की त्यांच्या चौफेर वाचन आणि समज याबद्दल अचंबा वाटल्याशिवाय राहवत नाही.

जयराम रमेश यांच्या ग्रंथात ते प्रथम अर्नाल्ड यांचा जन्म, शिक्षण, नोकरी या विषयी आपणांस परिचय करून देतात. त्यांनी पुणे येथे घालविलेल्या जीवनाविषयी ते विस्तृत चर्चा करतात. दुसऱ्या प्रकरणात अर्नाल्ड यांचा भारतीय सभ्यतेशी झालेला परिचय याबाबत सांगतात. टी.डब्ल्यू. रेसडेविड्स, मॅक्समुलर, अलेक्झांडर कनिंगहॅम, मोनीर-मोनीर विल्यम्स यांच्या प्रभावाविषयी सांगतानाच अर्नाल्ड यांच्या 'The Light of Asia' निर्मितीमागील पार्श्वभूमी उकलत

जातात. ग्रंथाचे मूळ नाव ‘The Gospel of Asia’ होते. रमेश यांनी संपूर्ण ग्रंथात भरपूर चित्रे व फोटो प्रकाशित केलेले आहेत. त्यात अर्नाल्ड यांनी लिहीलेल्या मूळ प्रतिच्या हस्तलिखीताचा फोटोदेखील आहे. अर्नाल्ड यांची वाङ्‌मयीन कारकीर्द आपल्यासमोर ठेवत असतांना त्यांनी लिहीलेल्या इतर ग्रंथाबाबतसुद्धा यात महाभारतावरील The song celestial चादेखील समावेश आहे, अशी रमेश आपल्याला माहिती देतात.

‘The Light of Asia’ प्रसिद्ध झाल्यावर ते प्रचंड लोकप्रिय झाले. अमेरिकेत या ग्रंथाने मोठी खळबळ माजवून दिली. याचा एक फायदा असा झाला, की बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी प्रचंड मोठी उत्सुकता निर्माण होवून खूप मोठ्या प्रमाणावर साहित्य निर्मिती आणि संशोधनास चालना मिळाली.

‘The Light of Asia’ वर जशी प्रसिद्धी मिळून स्तुतिसुमने उधळली गेली, तशीच टीकासुद्धा करण्यात आली. टीकात्मक लिखानाचा आढावासुद्धा रमेश विस्तृतपणे घेतात.

बुद्धगया येथील सर एडवीन यांची भेट व त्यांनी केलेल्या कामाचे वर्णन केल्यावर पुढील भागात ‘The Light of Asia’ ची विविध भाषांमध्ये झालेल्या भाषांतरावर प्रकाश टाकण्यात येतो. दक्षिण भारतातील आयोथी थास व पी.लक्ष्मी नरसू यांनीदेखील या महाकाव्यातून प्रेरणा घेतली होती. गांधीजीदेखील यापासून अत्यंत प्रभावित झाले होते. डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथसंग्रहात या ग्रंथाच्या दोन प्रती होत्या. त्याचा फोटो रमेश यांनी या ग्रंथात दिलेला आहे.

जयराम रमेश यांचा ग्रंथ विकत घेतल्यावर मी त्यांना जेव्हा मेल केला तेव्हा अगदी तासाभराच्या आत त्यांनी मला उत्तर दिले. व्यस्त असतानादेखील अभ्यासाबाबत आणि अभ्यासकांबाबत असलेल्या आस्थेचे हे उदाहरण आहे, असे माझे मत आहे.

जयराम रमेश यांनी ‘The Light of Asia’ वर ग्रंथ साकारताना तत्कालिन संशोधने, मिमांसा यावर विस्तृत प्रकाश टाकलेला आहे. त्यांनी केवळ सर एडवीन यांच्या दीर्घ काव्यावर एक अप्रतिम ग्रंथच लिहीलेला नाही, तर त्या अनुषंगाने रमेश यांनी इतिहास व धर्मावरील आपल्या ज्ञानात फार मोठी भर घातलेली आहे.

भारताचा इतिहास, संस्कृती, बौद्ध तथा हिंदू धर्म, विविध अधिकारी व्यक्तींपासून ते बौद्ध साहित्यातील अभ्यास पर्वाचे सखोल विवेचन करून अत्यंत अप्रतिम ग्रंथ वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात रमेश यशस्वी झालेले आहेत, यात शंकाच नाही. प्रत्येक अभ्यासकाच्या संग्रही असावा, असा हा ग्रंथ आहे. •••

**(लेखक इंग्रजी ग्रंथाचे अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ९८८११ ४६००५**

The Light of Asia
The poem that defined the Buddha

**लेखक :– जयराम रमेश**

**प्रकाशक :– पेंग्वीन**

**मुल्य :– रु.७९९/–**


समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
द पीपल्स पोस्ट
डिजीटल स्वरुपात!

www.peoplespost.in
नवे लेख, नवी सदरे, नवा अंक याशिवाय दैनंदिन विषयांवर
नामवंत साहित्यिक, लेखक, विचारवंत यांचे भाष्य!

# पांढऱ्या हत्तीसाठी समाजानं एवढं थोडं करायलाच हवं...

पांढरे हत्ती म्हणजे नोकरशाही, बाबूशाही, नोकरशाहीच्या नावानं तयार झालेली शोषकशाही, जबाबदारीचं तत्त्व नसलेली; पण लोकांसाठीच तयार झालेली यंत्रणा. खालपासून वरपर्यंत ती पसरली आहे. जनतेची सेवा करण्यासाठी ती सशक्त असावी म्हणून तिला लाखोंत पगार मिळतो. शरीराच्या आत-बाहेर शस्त्रक्रिया करण्यासाठी सवलती मिळतात. एवढ्या साऱ्या रजा, गाड्या, सेवक मिळतात. शोषक नेहमी एकसंघ असतात. तसंच या पांढऱ्या हत्तीचे आहे. स्वतःच्या संघटना बळकट करून त्या लोकांच्या संघटनांवर लाठ्या-काठ्या चालवतात. बिचारे पिचलेले लोक त्यांना मालक, देव, राजे आणि नशिबकर्ते म्हणून हाक मारतात. नोकर एसीत बसतात आणि मालक बाहेर शिपायाला चिरीमिरी देत बसतात. मालक बनलेल्या नोकरानं कागदाचा एक तुकडा घ्यावा एवढीच लोकांची अपेक्षा असते; पण मालकांना वेळच नसतो. तो उशिरा कार्यालयात येतो. लवकर जातो. मध्ये वेळ मिळाला तर पुढाऱ्यांची चमचेगिरी करत फिरत राहतो. त्याच्याकडे कागद घ्यायला वेळ असतोच कुठं? काय करेल बिचारा! स्वतःचं बघेल की पुढाऱ्याचं? या चक्रातून दूर होण्यासाठी तो संघटित होतो. स्वतःच्या मागण्या एका झटक्यात मान्य करून घेतो. आदिवासींना आपल्या मागण्यांचे गाठोडे डोक्यावर घेऊन मुंबईपर्यंत लॉंग मार्च काढावा लागतो. टाचा रक्तबंबाळ करून घ्याव्या लागतात. पांढरे हत्ती त्याची समजूत काढतात. लोकशाहीच्या मार्गानं जा म्हणतात. पांढरे हत्ती बलवान असल्यानं त्यांची भूकही मोठी असते. कोणत्याही नंबरचा आयोग लावा, त्यांची भूक भागतच नाही. ज्यांची भूक भागत नाही, ते तर पांढरे हत्ती असतात. ज्यांना भूक लागूच दिली जात नाही, जाणवूच दिली जात नाही ते कुपोषित दुर्बल मालक लोक असतात. जनता असते. आपल्या देशातला नागरिक कसा आहे, याचे एक चित्र काढून म. फुल्यांनी इंग्लंडच्या राणीला पाठवले होते. हाडे दिसत असलेला एक माणूस, त्याचे पोट पाठीला लागले आहे. त्याच्या डोक्यावर, खांद्यावर सावकाराची कर्जे आहेत. त्याला पिळणाऱ्या धर्माचे ओझे आहे आणि एवढे सारे कायदे आहेत. हे सारे ओझे घेऊन तो वाकला आहे. कोणत्याही क्षणी कोसळेल अशी त्याची अवस्था आहे. हे चित्र पांढऱ्या हत्तींना त्यांच्या स्पर्धा परीक्षेत, प्रशिक्षण काळात आणि मालक होण्याच्या काळात कधीच दिसत नाही किंवा दाखवले जात नाही. कारण तो समृद्ध देशाचा मालक होणार असतो. समृद्ध म्हणजे अर्थातच दारिद्र्याने, भुकेने, पिळवणुकीने समृद्ध असलेला भारत. मालकांसाठी इंडिया आणि नोकर, याचक बनवल्या गेलेल्यांसाठी भारत. जय हो... किती भारी आहे हे सारं...

पांढऱ्या हत्तींची कूळकथा आणि त्यांचं वर्तमान, भविष्य



आठवायचं कारण तसं साधं, सरळ आहे. चाळीस आमदारांचा गट घेऊन, त्याला झाडी-गाडी दाखवत आणि आसामच्या देवीचा आशीर्वाद घेऊन कारभारी बनलेल्याकडे नाशिकमध्ये सहा जानेवारीला नागरिकांनी शासकीय खात्यातील भ्रष्टाचाराचा पाढा वाचला. पैशाशिवाय सात-बारा नोंदच होत नाही, ही मुख्य तक्रार. तलाठी बाबूपासून आयुक्तापर्यंत सर्वांना ती लागू होणार होती. कोणी तलाठी बाबूच्या मागं ईडी लावून बघावी. पुढाऱ्यापेक्षा जास्त चमत्कार दिसतील. तर लोक छाती पिटून तक्रारींचा पाढा वाचत होते. कारभारी ऐकत होते. जो फक्त ऐकत राहतो, करत काहीच नाही. कारण करण्याचे नैतीक बळ नोकरशाही आणि सत्ताधारी या दोघांनीही गमावलेले असते. तर भ्रष्टाचाराची घुस कुठे, कशी-कशी पोखरते आहे, हे शेतकऱ्यांनी सांगितले. कारभाऱ्यांनी ऐकले. सामान्य माणसाचं एक बरं असतं, की कोणी आपलं ऐकलं, की त्याला आपलं कामच झाल्यासारखं वाटत असतं. मालकाविरुद्ध ब्र काढण्याची इच्छा नाही. कारण तो कुठंही घालून कुणालाही धुतो. सात-बाराचा उतारा असो, गाळण्यासाठी उसाचं चिपाड असो, पाटाचं पाणी असो, ये-जा करणारी वीज असो, जातीचा दाखला असो, थाळी असो किंवा नैसर्गिक विधी असो, तो धुऊ शकतो. पिळू शकतो. लोकांना कधीच कळलं नाही, की आपण मालकाचे गुलाम कसे झालो, हात पसरणारे कसे झालो आणि नोकरांना एवढंच कळतंय, की आपलं पांढऱ्या हत्तीचं रुप सातत्यानं टिकवून कसं ठेवायचं. लोकशाहीत सर्वच ठिकाणी लोक मालक असतात; पण घडायला लागते वेगळेच. तर कारभारी लोकांच्या तक्रारी ऐकत होते, तेव्हा आणखी एक गोष्ट घडत होती ती म्हणजे लाचलुचपतीच्या आरोपाखाली पकडण्यात आलेल्या शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नावे अथवा फोटो जाहीर करू नयेत. तसं झालं तर

कर्मचाऱ्यांची मानहानी होते, त्यांच्या कुटुंबाला पश्चाताप होतो. कोर्टात गुन्हा सिद्ध होण्यापूर्वीच नावे जाहीर झाल्याने बदनामी होते. क्षणभर पांढऱ्या हत्तींच्या नेत्यांचे हे मान्य केले, तर मग हाच न्याय सर्व संशयित गुन्हेगारांना का लावायचा नाही. त्यांनाही नाव असते, कुटुंब असते आणि कोर्टात निर्णय होण्याची शक्यता असते.

कोर्टात निकाल लागण्यापूर्वी कोणीही संशयित गुन्हेगार असतो. दोन-सात वर्षे जामिनासाठी कोर्टात अडकलेले लोक आपल्याकडे आहेत. ते छोटे-मोठे आहेत. खून करणारा आहे, कोंबडा चोरणारा आहे, सात-बाऱ्यात पैसे मुरवणारा आहे, रस्ता आणि भूखंड खाणारा आहे. या सर्वांनाच हा न्याय द्यावा लागेल. कारण कायद्यासमोर सारे समान असतात. सरकारी कर्मचाऱ्यांची बदनामी होत असेल, तर ती तशी इतरांचीही होते. बलात्कार, बाल गुन्हेगारी यांच्यात अडकलेल्यांची नावे प्रसिद्ध करू नयेत, अशी सध्या तरतूद आहे. बालकाचे एक दीर्घ आयुष्य पुढे येणार असते आणि बलात्कारित महिलांना याच व्यवस्थेत पुन्हा प्रतिष्ठेने जगता यावे यासाठी काही घटकांना अशा नावांपासून मुक्त करण्यात आले आहे. बाकी पंतप्रधानांपासून ते ग्राम सेवकांपर्यंत ज्यांच्यावर आरोप होतो तेव्हा त्यांचे नाव प्रसिद्ध केले जाते. न्यायालयात ते निर्दोष सुटण्याची शक्यता असेल म्हणून लाचखोरांची संशयित लाचखोरांची नावेच जाहीर करू नयेत, म्हणजे पांढऱ्या हत्तींनी स्वतःसाठी कायदे बदलून घेणे होय. नोकरशाही जेव्हा अन्य घटकांवर आरोप करते, नोटीस बोर्डावर नावे लावते, जप्ती करते, पाणीचोरीचा, करचोरीचा आळ घेते तेव्हा हे पांढरे हत्ती स्वतः कॅमेऱ्यासमोर येऊन आपला पराक्रम कसा सांगत असतात, हे सर्वच जण पाहत आलो आहोत. नोकरशाही कोणी पवित्र गाय नसते, तिला इतरांप्रमाणेच सर्व कायदे लागू असतात. एखादा पुढारी होताना कसा असतो आणि नंतर तो कसा होतो, तसेच पदावर जाताना पांढरा हत्ती किती अशक्त असतो आणि नंतर मालक बनून तो कसा सशक्त होतो, याची चौकशी करण्यासाठी आयोग नेमावा, अशी मागणी अधिकाऱ्यांनी केली पाहिजे. खात्री आहे, की ते तसे करणार नाहीत. कारण तसे केल्यास त्याचे रुपांतर नोकरात होईल. कोणत्याही शाळेसमोर जा, मॉलसमोर जा तेथे लाल दिव्यांच्या आणि बिनलाल दिव्यांच्या सरकारी गाड्या किती आणि का उभ्या असतात, याचं उत्तर मिळाल्याशिवाय राहणार नाही. हिंमत असेल तर अधिकाऱ्यांनी सरकारी गाड्यांचा बिनसरकारी वापर कसा होतोय, हे जाहीर करून टाकावे. मोठ्या हत्तीच्या घरात झाडलोट करणारेही शासकीय कर्मचारीच असतात. ते नेमलेले असतात वेगळ्या कामासाठी आणि हे वर्षानुवर्षे धुणीभांडी करत निवृत्त होतात.


वा रे पांढरे हत्ती! तुमच्या नावाला प्रतिष्ठा आहे आणि इतरांच्या नावांना नाही. खरंच बदनामीची भीती असेल, तर आपल्या संघटनेचा कोणीही छोटा-मोठा घटक लाच घेणार नाही किंवा देणार नाही, अशी प्रतिज्ञा करा. शोषक असे कधी करत नाहीत. कारण आठ-आठ सोंडांनी शोषण करण्यासाठीच त्यांचा जन्म असतो. अर्थात, सगळीच व्यवस्था अशी बरबटलेली आहे असा निष्कर्ष उताविळपणे कोणी काढता कामा नये. तसे असते, तर सगळा काळोख झाला असता. अधिकारी महासंघ असो किंवा कर्मचारी असो, कुळथे असोत अथवा वाटाणे असोत, या सर्वांनी आपण नोकर आहोत, हे समजून घ्यावे. मालक कसा जगतो आहे हे पाहावे. मालक अंधारात आणि नोकर शायनिंग मारत, असे चित्र तयार करणे बरोबर नाही आणि लोकांनी ते करू देऊ नये. नोकरशाही कोठून आभाळातून किंवा पृथ्वीचे पोट फोडून येत नसते. नोकरशाही काय किंवा नोकरशाहीच्या कुशीत ऊब घेणारे सत्ताधारी काय, हे सारे लोकांच्या वासनेतून जन्माला येतात. लोकांच्या गर्भाशयातच नोकरशाहीचा जन्म होतो. म्हणून हे गर्भाशय कुरतडणे किंवा स्वतःला वेगळे ठरवून वेगळा मलिदा मागत राहणे गैर तर आहेच शिवाय अनैतिकही आहे. लोकशाहीच्या पायाला अशी वाळवी किंवा विकृती लागली, तर लोकशाहीचा पाया ठिसूळ व्हावा लागतो. सबब पांढऱ्या हत्तीच्या नव्या मागणीचा दाही दिशांतून निषेध झाला पाहिजे. जी व्यवस्था भ्रष्टाचार कायमचा संपवण्याऐवजी अनेकदा भ्रष्टाचारमुक्त पंधरवडा साजरा करते, कायम सेवा देण्याऐवजी सेवासप्ताह करते, फायल्यांचा निचरा करण्यासाठी त्यांचाही पंधरवडा साजरा करते, भ्रष्टाचाऱ्यांची नावे कळवा असेही तीच सांगते. कायम निर्धोक प्रवास देण्याऐवजी अपघातमुक्त सप्ताह साजरा केला जातो. त्यामुळेच गोऱ्यांची नोकरशाही परवडली, असे जुने लोक म्हणतात. गोरे काही झाले तरी बांधील होते आणि हे स्वतःशीच बांधील व्हायला निघाले आहेत. पोरे नापास झाली काय आणि पास झाली काय, कुणाच्या पगारावर परिणाम होत नाही आणि आठ महिने काम करून बारा महिन्यांचा पगार घेताना कुणाला संकोच वाटत नाही. लोक जेव्हा गुलाम होऊन जगण्याचा प्रयत्न करतात तेव्हा नोकरशाही जबाबदारीचे तत्त्व विसरते आणि लोकांत जाण्याऐवजी लोकदरबार भरवते. पांढरे हत्ती आपला रस्ता बदलायला आणि खाद्य बदलायला तयारच नसेल, तर सरकारने लाचखोरांची म्हणजे संशयित लाचखोरांची नावे प्रसिद्ध करण्याचे बंद करावे. निदान कागदोपत्री तरी, छुप्या पद्धतीने तरी, भ्रम म्हणून तरी, आपला महाप्रदेश भ्रष्टाचारमुक्त झाल्याचे वांझोटे समाधान मिळेल.

प्रश्न एवढाच आहे, की सगळेच संशयित गुन्हेगार अशी मागणी करू लागले तर? कदाचित भ्रष्टाचाराच्या बातम्या होणे बंद होईल. लाच घेणाऱ्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक एकवर गेला आहे. त्यानंतर राजस्थान आणि तामिळनाडूचा नंबर येतो. महाराष्ट्रात २०२० मध्ये लाच घेण्याच्या ३,१२३ घटना घडल्या होत्या. त्यात सुमारे वीस टक्क्यांनी वाढ होऊन २०२१ मध्ये लाच खाणाऱ्यांची संख्या ३,७४५ वर गेली आहे. यातील ६७ टक्के गुन्हेगारांना सापळा टाकून पकडण्यात आले आहे. अर्थात, असे नव्हे की सापळ्याचे धागे मऊ होत नाही किंवा त्यांनाही वाळवी लागत नाही. तसे घडते म्हणून तर शिक्षा होण्याचे प्रमाण कमी असते. ते कमी असते म्हणून लाचखोरी कमी असते, असा निष्कर्ष काढता येणार नाही. निकाल साक्षी-पुराव्यांवर असतो आणि आपल्याकडे गुन्ह्याच्या वेळी जे ठळक साक्षी-पुरावे असतात, ते न्यायालयात प्रवास करेपर्यंत ठिसूळ होतात. अदृश्य होतात, काही वेळा फितूर होतात. सबब, शिक्षा होण्याचे प्रमाण कमी राहते. गल्लीबोळात हातभट्ट्या चालतात; पण शिक्षा होण्याचे प्रमाण खूप कमी असते. संशयित गुन्हेगारांची नावे जाहीर न करणे म्हणजे कायद्याचा वचक कमी करणे, संशयित गुन्हेगाराला पुन्हा बेभान आणि प्रतिष्ठित बनवणे, कायदा गुंडाळून

ठेवण्याची वृत्ती तयार करणे होय आणि अधिकारी कोण आहेत, की ज्यांना वेगळ्या पारड्यात ठेवावे. तलाठ्याने केलेल्या गैरकृत्याचा परिणाम तसा मर्यादित असतो; पण मोठ्या पांढऱ्या हत्तीने केलेल्या गैरकृत्याचा परिणाम मोठा असतो. सर्वांना भोगावा लागतो. जेव्हा एक मोठा पांढरा हत्ती भाकरीऐवजी लाच खाण्याची सवय लावून घेतो तेव्हा याच मार्गाने जाणारे अनेक छोटे पांढरे हत्ती तयार होतात. हे सर्व दुष्टचक्र थांबवण्यासाठी मुळात गैरआहार घेणे बंद करायला हवे.

# कवाडेंची पाखरं निघाली चाऱ्याच्या शोधात

महाराष्ट्रात आणखी एका आघाडीचा जन्म होईल, अशी धुसफूस चालू होती आणि ती खरी ठरली. बंडोबा बनून मुख्यमंत्री झालेल्या शिंदेंच्या गटात स्वतःला महाविद्रोही, अतिजहाल, अतित्यागी, अतिलढाऊ समजणाऱ्या कवाडे मास्तरांनी प्रवेश केला आहे. पूर्वी अशा आघाड्यांविषयी समाज आणि समीक्षक खूप गांभीर्याने चर्चा करायचे. आता कोणी करत नाही. कारण एका ठिकाणचा चारा संपला, की पक्षी चाऱ्याच्या शोधात कुठंही जाणार, हे लोकांनी गृहीत धरलं किंवा त्यांना ते उशिरा कळलं. परिणाम, आता चर्चा-बिर्चा होत नाही. कोण कुणाच्या उबेला गेला आणि कोण लोडशेडींग सुरू झालं म्हणून बाहेर पडला, हे कुणाला कळत नाही. हे सारं असंच चालणार. कारण ते राजकारण आहे. राजकारणात कोणी साधू-संत नसतात, नैतिकतेचे धनी नसतात, तर सत्तेचा खेळ खेळणारे व्यवहारी असतात. लोकांची स्मृती खूप तात्कालिक असते, म्हणून त्यांना इतिहास नीट आठवत नाही आणि आता तर तो आठवला, की वाद होतो म्हणून सामान्य माणूस इतिहासाच्या नादाला लागत नाही. वास्तव सांगणारा, खरे बोलणारा इतिहास कुणाला आवडतो? तर कवाडे मास्तरांचा गट पहिल्यांदाच कुणाशी तरी आघाडी करतोय असंही समजण्याचं कारण नाही. सर्वप्रथम तो ऐक्य प्रक्रियेत आला. मृगजळ ठरलेल्या या प्रक्रियेतून स्वतःच्या पायावरच उभा राहण्याचा प्रयत्न केला. काही दिवसांनी त्यांनी दलित-मुस्लिम आघाडी तयार केली. खूप मोठा स्मगलर म्हणून गणल्या गेलेल्या हाजी मस्तान याच्याबरोबर ती आघाडी होती. या आघाडीनंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या. धर्मनिरपेक्ष आंबेडकरवादी आणि कट्टर धर्मवादी मुस्लिम यांच्यात आघाडी कशी होईल, असा तो प्रश्न होता. आघाडी फार काळ टिकली नाही आणि प्रश्नही विस्मरणात गेला. पुढे काही वर्षांनी प्रकाश आंबेडकर यांनी हाच प्रयोग केला. ओवैसी यांच्या पक्षाबरोबर दिलजमाई केली; पण तीही निवडणूक निकालानंतर तुटली. इकडे रामदास आठवले यांनी काँग्रेस ते भाजप असा प्रवेश केला. नामदेव ढसाळ, अर्जून डांगळे शिवसेनेत गेले. प्रकाश आंबेडकर यांनी भरभक्कम वाटावी अशी वंचित बहुजन आघाडी काढली आणि अनेक पक्ष या आघाडीकडे आकर्षित झाले. कवाडे मास्तरांनी काँग्रेसमध्येच राहायचे ठरवले. त्याबद्दलचे बक्षिसही त्यांनी मिळवले होते. ते आमदार झाले होते. त्यांची दाढी वाढली होती. आता निवडणुका तोंडावर आल्याने अनेक घटकांचे स्थलांतर सुरू झाले आहे. पक्षीही स्थलांतर



करतात आणि पक्षही. दोघांसाठी चारा हे समान वैशिष्ट्य असते. स्वतःच्या ताकदीवर चारा निर्माण करण्याची आणि एव्हेंटमध्ये तो घेऊन जाण्याची क्षमता नसली, की मग तडजोडी होतात. अर्थात, विचार वगैरे गोष्टी त्यामागे नसतात. तसे असते तर भगवी शक्ती आणि भीमशक्ती, शिवशक्ती आणि भीमशक्ती, भीमशक्ती आणि हाजीशक्ती, भीमशक्ती आणि पांढरी टोपी शक्ती, भीमशक्ती आणि शिंदेशाही अशा विचित्र वाटाव्यात अशा जोड्या जुळल्या नसत्या किंवा तसा प्रयत्न कोणी केला नसता.

शिंदेंनी चाळीस आमदारांच्या जोरावर थेट मुख्यमंत्रिपदाला हात घातला. ते स्वतः एक सत्ताकेंद्र बनले. या सत्तेचा आणि हिंदुत्वाचा काही संबंध नाही. कारण हिंदुत्वाचा अभ्यास केल्याचे प्रमाणपत्रही त्यांच्याकडे नाही. तसे ते अल्पशिक्षित. रिक्षाचालक ते मुख्यमंत्री अशी कर्तृत्वाची एक हनुमान उडी त्यांनी मारली आहे. शिवसेनेच्या शाळेतील या गुणी आणि स्कॉलरशिपच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याचे कवाडे मास्तरांना कौतुक न वाटल्यास नवल म्हणावे लागेल. शिंदे हे महाराष्ट्राला पुढे नेत आहेत. ते कार्यक्षम आहेत, लढाऊ आहेत वगैरे अनेक प्रमाणपत्रे एका दणक्यात कवाडे मास्तरांनी देऊन टाकली. परीक्षा घेण्याची किंवा वर्गात बोट वर करून उत्तर देण्याची संधीही कवाडे मास्तरांनी घेतली नाही. अलीकडे तर बिनतासाचे वर्ग चालतात. खिचडी मिळते म्हणून विद्यार्थी येतात. परीक्षाही नसल्यातच जमा. कवाडे मास्तर पुरोगामी असल्याने त्यांनी नव्या कारभाऱ्याला परीक्षा देण्याची संधीही दिली नाही. परीक्षेशिवाय निकाल जाहीर केला. तसे अलीकडचे शिक्षक पेपर न वाचता सैल हाताने मार्क देतात. मुक्त विद्यापीठाकडे पाहावे तेथे एकच अभ्यासक्रम अनेक वर्षे प्रामाणिकपणे चालवला जातो आणि कुणाचेही नुकसान होऊ नये म्हणून प्रवेश घेईल त्याला घसघशीत मार्कांनी पास केले जाते. मनू शिकवायलाही हयगय केली जात नाही. आता कवाडे मास्तरांनी तेच केले. शिंदेशाहीला कदाचित ते जय भीम बोलायला शिकवतील किंवा त्यांची एखादी घोषणा आत्मसात करतील. नामांतराच्या लढाईत आपण कसा प्रखर भीम सांगत होतो, तेही विसरतील. कारणही नैसर्गिकच आहे आणि ते म्हणजे मास्तरांना विस्मरणाची सवय जास्त असते. एक लक्षात ठेवावे, की आता पूर्वीप्रमाणे एकसंघ भीमशक्ती नाहीय. ती गटातटात विभागण्यात आली आहे. तसे झाले तर नव्या चाऱ्यासाठी नवे प्रयत्न करता येतात. बाबासाहेबांचा विचार नव्हे, तर प्रतिमा आणि श्रद्धा मिरवण्याच्या काळात हे सारे असेच घडत राहणार.

**- पंक्चरवाला**

# आणि वाघ शेपूट हलवू लागले



आणि वाघ शेपूट हलवू लागले
पाळीव होऊ लागले प्राणी ते
माणसांसारखे
वागू लागले

वस्त्याच माणसांच्या पोहोचल्या
त्यांच्या घरापर्यंत
जंगलांतून जळत्या निघू लागला सतत
महानगरांचा धूर

पाण्याचे साठेही
आटू लागले
माणसांनी दिले तरच
वाघ पाणी पिऊ लागले

या नव्या आवृत्तीला
माणसाच्या
ते
घाबरू लागले

आधी वाघ
मारून दाखवत ती
शूर समजली जात
माणसे

वाघही
माणसे मारून दाखवत
जंगलाचे राज्य
टिकवत

आता
राज्यच
खालसा झाले
त्यांचे

वाघ पाळणारे आता
शूर समजले जातात
वाघही रोज त्यांचे
गुणगान गातात

खाल्ल्या मिठाला
जागू लागले
आता वाघही
शेपूट हलवू लागले

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

# नोंदणी

अनुल्लेखाने मारल्यावर...
कितीतरी समाधानी झाले नोंदणी बहाद्दर
ज्यांच्या हाती नोंदणी वही
ते ठरवणार किती काळ कुणाची नोंदवणूक/ नांदवणूक

समृद्ध इतिहासाचं 'संवर्धन' म्हणूनच होऊ शकलं नाही
अडगळीत पडलेल्या गोष्टी केवळ अडगळ नसतात

चालत गेलेल्या पाऊलखुणा पुसल्या गेल्या नाहीत
मातीने घेतलीच शेवटी नोंद
पाऊलवाटेवरच्या वडाला क्रांतीची पारंबी जन्मली
तेव्हा मातीच्या नावाने बोंब ठोकली
तिसऱ्या मजल्यावर असलेल्यांनी

एकच प्रश्न छळत राहिला त्यांना
संदर्भाला सत्याचा गर्भ राहिला, तर काय करायचं?

वाड्या-वस्त्या जाळल्या
दफ्तरखाने जाळले
इतकंच काय पिढ्यान्‌पिढ्यांचे बहरसुध्दा जाळले
मोहोर आलेला आंबा डोळ्यादेखत कोळसा होऊन कोसळला

सगळे सृजनशील पुरावे जमिनीत पुरावे
असे तोंडी आदेश निघाले

उत्खननात सापडलेल्या गोष्टीला शोकांतिका म्हणतात
मातीत गाडून घेणं अन् गाडलं जाणं
यात जमीन-अस्मानच अंतर आहे.
वाईट दिवसांचे समूह जेव्हा दांडे झाले
तेव्हा कुऱ्हाड तर तयारच होती कत्तलीसाठी

कुऱ्हाडीचा एक सनातन प्रश्न होता
पोटावर अन् पाठीवर एकदम मारलं तरी ते ताठ कसे उभे राहतात?

आजही तोच इतिहास.... वर्तमान बनून
माझ्यासमोर शस्त्र घेऊन उभा आहे
आणि
मी वीणा घेऊन उभा आहे
वीणेच्या तारेच्या ठिकाणी माणसाची आतडी लावून वाजवतोय

**– देविदास सौदागर**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2021-23
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

